CMYK


आजचा सामना
हैद्राबाद वि. लखनौ
वेळ : सायं.३.३० वाजता
ठिकाण : हैद्राबाद

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

आजचा सामना
बंगळुरु वि. चेन्नई
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : बंगळुरु

लातूर | रविवार, ५ एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक २८ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आपल्याला विश्वात बंधुभाव प्रस्थापित करायचा असेल, तर सर्वप्रथम आपला हिंदू समाज संघटित करावा लागेल, ज्यात एकतेची आशा आणि आकांक्षा फलदायी होण्याची शक्यता निहित आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हेच कार्य करीत आहे. आपले कार्यक्रम सुद्धा आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास सहायक आणि प्रेरक आहेत.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# होर्मुझमधून अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीस मुभा

**अमेरिका-इस्रायल वगळता सर्व राष्ट्रांसाठी इराणचा निर्णय ● पुरवठा साखळी कायम ठेवण्याचा उद्देश ● पेट्रोलियम पदार्थांवरील निर्बंध कायम**

◆ **तेहरान, ४ एप्रिल**

अमेरिका-इस्रायलने सुरू केलेल्या युद्धाला प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळवत या भागातील जलवाहतुकीवर बंदी घातली आहे. पर्यायाने जगभरातील व्यापारी जहाजे आणि तेल टँकर आखाती देशांच्या बंदरावर अडकले. कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि अत्यावश्यक वस्तूंची पुरवठा साखळी खंडित झाल्याने इंधनाची टंचाई निर्माण झाली. युद्धाच्या ३४ व्या दिवशी इराणने नरमाईची भूमिका घेत होर्मुझमधून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या जहाजांना मार्ग देण्याचा निर्णय घेतला. अमेरिका-इस्रायलला वगळता सर्व देशांच्या जहाजांना मार्ग दिला जाणार आहे, मात्र तेल आणि वायूच्या वाहतुकीसाठी निर्बंध कायम आहे.

इराण सरकारच्या प्रवक्त्या फातिमेह मोहजेरानी यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये सरकारी आदेशाचा उल्लेख करीत म्हटले की, इराणी बंदरांकडे अत्यावश्यक सामुग्री घेऊन जाणाऱ्या जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी आहे. तथापि, या जहाजांना संबंधित इराणी अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करणे आवश्यक आहे. या जहाजांमध्ये ओमानच्या आखातातील जहाजांचाही समावेश असेल. औषधी, धान्य, कापड, दररोज वापरात येणाऱ्या आवश्यक वस्तूंची वाहतूक करणारी जहाजांना होर्मुझमधून मार्ग दिला जाणार आहे.

अमेरिका-इस्रायलच्या जहाजांना वगळता इतर राष्ट्रांसाठी हा आदेश आहे. तथापि, कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या वाहतुकीसाठी आधीचे निर्बंध लागू राहतील. मित्र राष्ट्रांच्या जहाजांसाठी हे निर्बंध लागू राहणार नाही. (वृत्तसंस्था)



### दोन हजार जहाजे अडकली

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद आहे. इराणने केवळ अशाच जहाजांना या सागरी मार्गातून जाण्याची परवानगी दिली आहे, जी इराणी सरकारची सहयोगी आहेत किंवा युद्धात तटस्थ आहेत. या बंदीमुळे दोन हजारांपेक्षा अधिक जहाजे आखाती देशात अडकली आहेत. ■

### देशभरात ३,७०० ठिकाणी छापे

पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांविरोधात सातत्याने कारवाई सुरू आहे. आतापर्यंत ३,७०० पेक्षा जास्त ठिकाणी छापे टाकण्यात आले. एक हजार एलपीजी वितरकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या. याशिवाय आतापर्यंत २७ वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मागणी पूर्ण करण्यासाठी केरोसिन आणि कोळसा यासारख्या पर्यायी इंधनाचा वापर केला जात आहे. ■

# काँग्रेसला हवे आखाती देशांसोबत वैर

**पंतप्रधान मोदींचा घणाघात ● राजकीय फायद्यासाठी अफवा ● भारतीयांच्या सुरक्षेला सरकारचे प्राधान्य**

◆ **पथनमथिट्टा, ४ एप्रिल**

काँग्रेस नेते राजकीय द्वेषापोटी आखाती देशांसंदर्भात चिथावणी देणारे वक्तव्य करीत आहे. यामुळे या देशात राहणाऱ्या लाखो भारतीयांची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. आखाती देशांसोबत वैर व्हावे, अशी विरोधकांची इच्छा आहे. केंद्र सरकार कोणत्याही परिस्थितीत भारतीयांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसचे आरोप फेटाळून लावले.

केरळच्या पथनमथिट्टा जिल्ह्यातील तिरुवल्ला येथे प्रचारसभेला संबोधित करताना काँग्रेस, लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट (एलडीएफ) आणि युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ) यांच्यावर हल्ला चढवताना मोदी म्हणाले, काँग्रेस पक्ष केवळ निवडणुकीतील फायद्यासाठी आखाती देशातील एक कोटी भारतीयांचा जीव धोक्यात आणणारे वक्तव्य करीत आहे. काँग्रेसचे हेतू अत्यंत धोकादायक आहेत. पश्चिम आशियातील देशांनी भारताला आपला शत्रू मानावे, अशी त्यांची इच्छा आहे.

देशात भीतीचे वातावरण निर्माण करणे आणि जनतेला रांगेत उभे राहण्यास भाग पाडणे त्यांचा हेतू आहे. आमच्यासाठी भारतीयांची सुरक्षा महत्त्वाची आहे, तर काँग्रेस राजकारणाला प्राधान्य देते. डावे आणि काँग्रेस केरळच्या महान संस्कृती आणि श्रद्धेला थेट लक्ष्य करीत आहे. या लोकांनी आधी शबरीमाला मंदिराला बदनाम करण्याचा कट रचला आणि आता ते त्यांच्या लुटीचे केंद्र बनले आहे. शबरीमालामध्ये जे काही घडले ते एका सुनियोजित कटाचा भाग होते, असा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला.

**दिशाभूल करणे त्यांचा स्वभाव**

प्रत्येक मुद्यावरून जनतेची दिशाभूल करणे काँग्रेस, डाव्यांचा स्वभाव आहे. जेव्हा आम्ही सीएए कायदा आणला, तेव्हा त्यांनी अफवा पसरविल्या. आज कायद्याची अंमलबजावणी झाली आहे आणि देशाला कोणतेही नुकसान झालेले नाही. सत्य समोर येताच विरोधी पक्ष त्याला खोट्या गोष्टींचा गठ्ठा म्हणू लागतात.




**महिला आरक्षणावर विधेयक आणणार**

नारी शक्ती वंदन कायद्यातून सरकारने लोकसभा आणि विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाचा मार्ग मोकळा केला. या कायद्याचे फायदे २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपासून मिळण्यास सुरुवात व्हावी यासाठी विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. या उद्देशाने १६ ते १८ एप्रिल दरम्यान विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. कायद्यात सुधारणा केल्याने दक्षिण भारतातील कोणत्याही राज्याच्या जागा कमी होणार नाहीत. उलट महिलांसाठी राखीव जागा अतिरिक्त जागा असतील. महिला प्रतिनिधींच्या संख्येत ऐतिहासिक वाढ सुनिश्चित करणे हा सरकारचा हेतू आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### भाजपा मुख्यालयावरील हल्ल्यामागे 'आयएसआय'

**चंदीगड :** चंदीगडमधील भाजपा मुख्यालयावरील ग्रेनेड हल्लाप्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. पंजाब पोलिस आणि चंदीगड पोलिसांनी संयुक्त कारवाईत पाच आरोपींना ताब्यात घेतले. या कटात सहभागी असलेल्या आरोपींमध्ये बलविंदर लाल उर्फ शम्मी, जसबीरसिंग उर्फ जस्सी, चरणजीतसिंग उर्फ चन्नी, रुबल चौहान आणि मनजीत उर्फ अभिजीत शर्माचा समावेश आहे. पाकिस्तानची पाताळयंत्री गुप्तचर संस्था आयएसआयचा या हल्ल्यात हात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपींकडून एक ग्रेनेड आणि काही काडतुसे जप्त करण्यात आली, अशी माहिती पंजाबचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. हल्ल्यातील दोन मुख्य सूत्रधारांची ओळख पटली असून, त्यांना जेरबंद करण्यासाठी छापेमारी केली जात आहे. हल्ल्याचा कट पाकिस्तानच्या आयएसआयने रचला होता, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोर्तुगाल आणि जर्मनीमध्ये असलेल्या विदेशी सूत्रधारांची ओळख पटली असून, त्यांच्या सांगण्यावरून हा हल्ला करण्यात आला होता. हा हल्ला करण्यासाठी अनेक मॉड्युल आणि नेटवर्कचा वापर करण्यात आला होता, असेही त्यांनी सांगितले. ■

### मिनीबस दरीत कोसळून १५ प्रवाशांचा मृत्यू

**मंडी :** हिमाचल प्रदेशातील कुलू येथे शनिवारी रात्री मिनीबस दरीत कोसळून १५ प्रवाशांचा मृत्यू झाला. हा अपघात सोझा आणि घ्यागी दरम्यान असलेल्या डोंगराळ भागात झाला. सर्व प्रवासी पर्यटक होते आणि जालोरी ज्योतला भेट देऊन परत येत होते. प्रतिकूल हवामान आणि निसरड्या रस्त्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटले. ज्यामुळे अपघात झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिला. स्थानिक नागरिकांकडून घटनेची माहिती मिळताच पोलिस अपघातस्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले. ■

# अमेरिकेची दोन विमाने, हेलिकॉप्टर पाडले

**इराणचा दावा, वैमानिक ताब्यात ● हवाई वर्चस्व मोडून काढले**

◆ **तेहरान, ४ एप्रिल**

मागील २४ तासांत अमेरिकेचे एक एफ-१५ ई स्ट्राइक ईगल आणि एक ए-१० वॉरहॉग लढाऊ विमानासह दोन हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा इराणने केला आहे. माजिद इन्फ्रारेड हवाई संरक्षण प्रणालीच्या अचूक हल्ल्यात दोन्ही विमाने नष्ट केल्याचे आणि वैमानिक ताब्यात असल्याचा दावा इराणने केला. यावर युद्धात अशा घटना होतच असतात अशी सावरासावर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केली. इराणने शुक्रवारी एफ-१५ई विमान पाडले आणि यातील वैमानिक सुखरूप परतला, तर दुसरा बेपत्ता होता. दोन ब्लॅक हॉक हेलिकॉप्टर वैमानिकाचा शोध घेत असताना इराणच्या हल्ल्यात नष्ट झाले. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस नेते शशी थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला

◆ **तिरुवनंतपुरम, ४ एप्रिल**

काँग्रेस खासदार शशी थरूर यांचे वाहन अडवून त्यांच्या सुरक्षेत असलेल्या बंदूकधारी आणि वाहनचालकावर हल्ला करण्यात आला. ही घटना केरळच्या वांडूर परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी पाच लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करून एकाला ताब्यात घेतले आहे.

काँग्रेस नेते शशी थरूर एका निवडणूक कार्यक्रमाला जात असताना शुक्रवारी सायंकाळी चेलिथोड परिसरात दोन वाहनांमधून आलेल्या पाच तरुणांनी वाहन आडवे लावून त्यांचा ताफा अडवला. थरूर यांचे सुरक्षा रक्षक रतीश केपी व कारचालक हे दोघे खाली उतरले आणि त्यांनी पुढे असलेल्या वाहनचालकाला रस्ता मोकळा करण्यासाठी वाहन बाजूला घेण्यास सांगितले. मात्र, त्या पाच तरुणांनी त्यांचे वाहन बाजूला न घेता सुरक्षा रक्षक व कार चालकाला शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली.

**एकास अटक, चार आरोपी फरार**

याप्रकरणी सुरक्षा रक्षकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी पाचही आरोपींवर गुन्हा दाखल करून रात्री उशिरा एकाला ताब्यात घेतले. उर्वरित संशयितांची ओळख पटली असून, त्यांना लवकरच अटक केली जाईल. (वृत्तसंस्था)

# सुनेत्राताईंना सर्वच पक्षांनी पाठिंबा द्यावा

**मुख्यमंत्री फडणवीस यांचे आवाहन**





◆ **मुंबई, ४ एप्रिल**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना सर्वच पक्षांनी मोठे मन करून पाठिंबा द्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केले.


माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या पोटनिवडणुकीची आठवण काढत देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, ती निवडणूक बिनविरोध झाली होती. त्यामुळे सर्वच पक्षांनी सुनेत्राताईंना पाठिंबा दिला पाहिजे. ही पोटनिवडणूक बिनविरोध झाल्यास महाराष्ट्राला साजेशा अशा पद्धतीची पुन्हा अनुभूती येईल. यापूर्वी अनेकदा महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणूक केलेली आहे. आर. आर. आबांचे निधन झाले, त्यावेळी आपण पोटनिवडणूक बिनविरोध केली होती. भाजपाने ठरवले होते की, निवडणूक लढणार नाही. त्यामुळे सर्वच पक्षांनी मन मोठे करून बिनविरोध निवडणूक करायला हवी, असेही ते म्हणाले.

**काँग्रेस देणार उमेदवार**

बारामती पोटनिवडणुकीबाबत काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाने दोन्ही जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. बारामतीत संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या. इच्छुकांची संख्या मोठी असल्याने अंतिम उमेदवार निवडताना पक्ष नेतृत्व काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. राहुरी मतदारसंघातही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. (वृत्तसंस्था)

### सुनेत्रा पवारांचा उद्धव ठाकरेंना फोन

या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार मैदानात उतरण्याची तयारी करीत आहेत. त्यांनी याआधी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. आता आमदारकीसाठी त्या बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पृष्ठभूमीवर त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क साधला. या संभाषणात सुनेत्रा पवारांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी शिवसेनेचा पाठिंबा मागितला तसेच ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठीही त्यांनी चर्चा केल्याची माहिती पुढे येत आहे. ■



चंद्राभोवती परिक्रमेसाठी पाठवलेल्या ओरायन अंतराळयानाचे कमांडर रीड वाईड यांनी टिपलेले पृथ्वीचे विहंगम दृश्य

# लखनौमधील बॉम्बस्फोटाचा कट उधळला

**एटीएसने केली चार अतिरेक्यांना अटक**

◆ **लखनौ, ४ एप्रिल**

येथे बॉम्बस्फोट घडवण्याचा कट उधळत उत्तरप्रदेश दहशतवादविरोधी पथक अर्थात् एटीएसने चार अतिरेक्यांना अटक केली. पाकिस्तानी सूत्रधारांच्या इशाऱ्यावर ते लखनौ, गाझियाबाद आणि अलिगडला लक्ष्य करणार होते, असे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणाचा तपास एनआयएकडे सोपवला असून, न्यायालयाने त्यांना पाच दिवस एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

या शहरांवर हल्ले करून भीती निर्माण करण्याचा आणि नंतर इतर शहरांना लक्ष्य करण्याचा कट या अतिरेक्यांच्या मॉड्युलने रचला होता. एटीएसच्या चौकशीदरम्यान आरोपींनी संपूर्ण कटाची कबुली दिली. आरोपींनी दिलेल्या माहितीच्या आधारे पुढील तपास सुरू आहे. या टोळीने राज्यातील अनेक प्रमुख नेत्यांना लक्ष्य करण्याचा कटही रचला होता.

लक्ष्य असलेल्या नेत्यांची नावे अटकेतील अतिरेक्यांनी एटीएसला दिली आहेत. यात अनेक महत्त्वाच्या पदांवरील नेत्यांचा समावेश आहे. आरोपींनी या सर्व नेत्यांची रेकी केली होती, असेही तपासात उघड झाले आहे.

### रुळावरून रेल्वे घसरविण्याचा कट

अतिरेक्यांचा देशभरातील रेल्वे सिग्नल बॉक्सला धडक देण्याचा किंवा रेल्वे रुळावरून घसरवण्याचा कट होता. ते गॅस सिलेंडर घेऊन जाणारे ट्रक आणि प्रतिष्ठित संस्थांना आग लावून मोठ्या प्रमाणावर नुकसान आणि गोंधळ निर्माण करण्याचा कट रचत होते. ■

**मेरठचा साकिब म्होरक्या**

मेरठ येथील साकिब उर्फ डेव्हिल हा या टोळीचा म्होरक्या आहे. तो टेलिग्राम, इंस्टाग्राम आणि सिग्नल यासारख्या समाज माध्यम मंचाद्वारे पाकिस्तानी सूत्रधार आणि कट्टरपंथी संघटनांच्या संपर्कात होता. त्याचा साथीदार अरबाबही मेरठ नेटवर्कमध्ये सक्रिय होता. त्यांनी गौतम बुद्धनगर येथील विकास आणि लोकेशला पैशांचे आमिष दाखवून जाळ्यात अडकवले. (वृत्तसंस्था)

# कार विहिरीत कोसळून नऊ ठार

**नाशिक :** चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळली. यात विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक व नातेवाईक अशा नऊ जणांचा मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी शहरातील शिवाजीनगर परिसरात शुक्रवारी रात्री घडली.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. इंदूर निवासी सुनील दत्तू दरगोडे हे कुटुंबीय आणि नातेवाईक, असे नऊ जण शुक्रवारी रात्री एका खाजगी क्लासच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमावरून घरी परतत होते.

यादरम्यान चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि कार रस्त्याबाहेर जाऊन पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळली. कार थेट पाण्यात बुडाल्याने कुणालाही बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. यात कारमधील सर्वांचा मृत्यू झाला.






# पुण्यात सापडली झुरळांची नवी प्रजाती

**भारतीय जैवविविधतेत ऐतिहासिक भर**

◆ **पुणे, ४ एप्रिल**

भारतीय उपखंडातील जैवविविधतेत महत्त्वाची भर घालणारी झुरळांची एक नवीन प्रजाती शोधण्यात संशोधकांना यश आले आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील नाथाची वाडी परिसरातील कृषी भागात ही नवी प्रजाती आढळली. भारतात प्रथमच 'डीएनए बारकोडिंग'च्या साहाय्याने शोधण्यात आलेली 'निओलोबोप्टेरा पेनिन्सुलारीस' ही प्रजाती आहे. भारतातील झुरळांच्या अभ्यासात हा एक मैलाचा दगड ठरला आहे.

ही संशोधन मोहीम झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (पुणे व चेन्नई केंद्र) आणि प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात आली. ए. शबनम, एम. सेनराज, साहिल शिकलगर, रश्मी मोरे आणि के. पी. दिनेश या संशोधकांनी हा अभ्यास केला असून, तो कोलकाता येथून प्रकाशित होणाऱ्या 'रेकॉर्ड्स ऑफ द झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे.



निओलोबोप्टेरा या वंशातील प्रजाती भारत, चीन आणि थायलॅण्डमध्ये आढळतात. यापूर्वी भारतात या वंशातील केवळ दोनच प्रजाती नोंदविण्यात आल्या होत्या. जागतिक स्तरावर साधारण पाच हजार झुरळांच्या प्रजाती नोंदल्या गेल्या असून, त्यापैकी १९० प्रजाती भारतात आढळतात. यातील जवळपास निम्म्या प्रजाती स्थानिक (एन्डेमिक) आहेत, म्हणजे त्या जगात अन्यत्र आढळत नाहीत.

झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या संचालक डॉ. धृती बॅनर्जी यांनी हा अभ्यास भारतीय कीटक वर्गीकरणाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे नमूद केले. तर, पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.बसुदेव त्रिपाठी यांनी 'डीएनए बारकोडिंग'च्या माध्यमातून भविष्यात आणखी महत्त्वपूर्ण शोध लागण्याची शक्यता व्यक्त केली आहे. प्रा. रश्मी मोरे यांनी सांगितले की, महाराष्ट्रासह डेक्कन पठार भागातील झुरळांच्या प्रजातींचा अभ्यास अद्याप मर्यादित असून, आतापर्यंत राज्यातून केवळ १३ प्रजातींचे मूळ वर्णन झाले आहे.. (तभा वृत्तसेवा)

### डीएनए बारकोडिंग' म्हणजे काय?

'डीएनए बारकोडिंग' ही प्रजाती ओळखण्यासाठी वापरली जाणारी एक पद्धत आहे. यामध्ये एका विशिष्ट जनुकातील किंवा जनुकांमधील 'डीएनए'च्या लहान भागाचा वापर करून प्रजाती ओळखली जाते आणि 'डीएनए'च्या विशिष्ट भागाचे विश्लेषण केले जाते. ■

> **"झुरळांकडे सामान्यतः कीड म्हणून पाहिले जाते; मात्र प्रत्यक्षात एक टक्क्यांपेक्षा कमी प्रजाती हानिकारक असून, बहुतेक झुरळे पर्यावरणात पोषक घटकांचे पुनर्चक्रण करून परिसंस्थेला महत्त्वाचे योगदान देतात. या शोधामुळे डेक्कन पठारासारख्या कमी अभ्यासलेल्या प्रदेशांमध्ये अजूनही अनेक अज्ञात प्रजाती दडलेल्या असल्याची शक्यता असून, जैवविविधतेच्या संवर्धनासाठी अशा नोंदी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत."**
> **- शबनम अन्सारी**
> **मुख्य संशोधक**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जावेद सिद्दीकीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



**नवी दिल्ली** : अल-फलाह ग्रुपचा अध्यक्ष जावेद अहमद सिद्दीकीला दिल्ली न्यायालयाने दिलासा नाकारला आहे. दिल्लीतील ४५ कोटी रुपयांच्या जमिनीच्या फसवणुकीने केलेल्या अधिग्रहणाशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाने सिद्दीकीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दहा दिवसांच्या कोठडीचा कालावधी संपल्यानंतर शनिवारी अतिरिक्त सत्र न्यायमुर्ती शीतल चौधरी प्रधान यांच्यासमोर सिद्दीकीला हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १७ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. ईडीने सिद्दीकीला २४ मार्चला बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत दुसऱ्या एका प्रकरणात अटक केली होती. तपासात असे आढळले की, आरोपीने फसवणुकीने जमीन मिळवण्यासाठी 'बनावट' कागदपत्रे तयार करून त्याचा वापर केला होता. तरबिया एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक व बहुसंख्य भागधारक असलेल्या सिद्दिकीने काही व्यक्तींसोबत फसवणुकीचा कट रचला होता.



एका व्यावसायिक कार्यक्रमात सहभागी झालेली अभिनेत्री काजोल

# इराणच्या बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला

## पाच नागरिक ठार, अनेक इमारती उद्ध्वस्त

◆ **तेहरान, ४ एप्रिल**

इस्रायल-अमेरिकेने शनिवारी इराणच्या बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पावर क्षेपणास्त्रांचा मारा केला यात प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले, तर पाच नागरिकांना जीव गमवावा लागला. प्रकल्पाच्या परिसरातील इमारती उद्ध्वस्त झाल्याचे इराण सरकारच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. युद्धादरम्यान या प्रकल्पावर झालेला हा चौथा हल्ला आहे.

अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असून, याला प्रत्युत्तर देणार असल्याचे इराणने म्हटले आहे. दक्षिण इराणमधील खुझेस्तान प्रांतातील महशहर पेट्रोकेमिकल विशेष आर्थिक क्षेत्राला लक्ष्य करीत अमेरिकेने हवाई हल्ले चढवले. हवाई संरक्षण प्रणालीने १६० हून अधिक ड्रोन, अनेक क्रूझ क्षेपणास्त्रे नष्ट केल्याचे इराणकडून सांगण्यात आले. हल्ल्याला प्रत्युत्तर देत इस्रायलची राजधानी तेल अवीव आणि यूएई, बहरीन आणि सौदी अरबच्या पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. एक क्षेपणास्त्र रियाध येथील अमेरिकन दूतावासाच्या कार्यालयावर आदळले. तथापि अमेरिकेच्या दूतावासावर हल्ला केला नसल्याचे इराणने म्हटले आहे. आयआरजीसीने सांगितले की, रियाधमधील अमेरिकी दूतावासावरील हल्ला इराणी सैन्याने केलेला नाही. हा हल्ला इस्रायलचे कृत्य असू शकते.

दरम्यान, या हल्ल्यात दूतावासाच्या इमारतीचे नुकसान झाले, शिवाय अमेरिकेची गुप्तचर संस्था असलेल्या सीआयएच्या केंद्रालाही याचा फटका बसला. (वृत्तसंस्था)



### सामुद्रधुनी कुठे आहे?

लाल समुद्र आणि एडनचे आखात यांना जोडणारा समुद्रमार्ग म्हणजेच बाब एल मंडेब सामुद्रधुनी. सौदी अरेबच्या यांबू बंदरातून या मार्गातून मोठ्या प्रमाणात खनिज तेल मार्गस्थ होते. या सामुद्रधुनीतून लाल समुद्र आणि सुएझ कालव्याच्या माध्यमातून भूमध्य समुद्र गाठता येतो. त्यामुळे आशिया आणि युरोप यांना जोडणारा अत्यंत मोक्याचा व्यापारी मार्ग या सामुद्रधुनीतून जातो. युरोपहून येताना आफ्रिकेला वळसा घालून आशियाकडे येण्याची गरज भासत नाही. येथून तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूकही मोठ्या प्रमाणात सुरू असते.

### बाब एल मंडेब सामुद्रधुनीवर ताबा मिळवणार

इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, होर्मुझशिवाय लाल समुद्रातील एडनजवळील बाब एल मंडेब सामुद्रधुनीवर ताबा मिळविण्याचा आमचा प्रयत्न आहे. जागतिक तेल, एलएनजी, गहू, तांदूळ आणि खतांची वाहतूक या जलमार्गाने सुरू आहे. या मार्गावर इराण लवकरच नियंत्रण मिळवेल.

# उद्धव ठाकरे देतील, त्या उमेदवाराला पाठिंबा

### शरद पवारांचा उबाठाला शब्द

◆ **मुंबई, ४ एप्रिल**

विधान परिषदेच्या नऊ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार आहे. या पृष्ठभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी शरद पवारांना पाठिंबा दिला होता. आता या पाठिंब्याची शरद पवार परतफेड करणार आहे. विधानपरिषदेसाठी उद्धव ठाकरे जे नाव देतील, त्याला आमच्या पक्षाचा पाठिंबा असेल, असा शब्द शरद पवार यांनी दिला आहे. या निर्णयामुळे विधानपरिषदेची एकमेव जागा महाविकास आघाडीत ठाकरे गटाच्या वाट्याला जाणार, असे संकेत आहे.

राज्यात विधानपरिषदेच्या नऊ जागांसाठी मे महिन्यात निवडणूक पार पडणार आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार महायुतीच्या वाट्याला आठ तर महाविकास आघाडीला केवळ एक जागा मिळण्याची शक्यता आहे. या एका जागेसाठी आघाडीत रस्सीखेच सुरू होती. मात्र, शरद पवारांच्या भूमिकेमुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. या एका जागेवरून आघाडीत ओढाताण सुरू असतानाच शरद पवार यांनी मोठे विधान केले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, माझ्या राज्यसभेच्या निवडीवेळी महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी मोलाची मदत केली. आता विधानपरिषदेसाठी उद्धव ठाकरे जे नाव देतील, त्याला आमचे पूर्ण सहकार्य राहील. (तभा वृत्तसेवा)

### विधान परिषदेत कोणाची शक्यता?

शरद पवार यांच्या विधानामुळे ही एकमेव जागा आता ठाकरे गटाच्या पदरात पडण्याची दाट शक्यता आहे. पुढील महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपत आहे. ते स्वतः मैदानात उतरणार की एखाद्या निष्ठावान सहकाऱ्याला संधी देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### मविआतील तिन्ही पक्ष एकत्रित निर्णय घेतील

महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्रितपणे निर्णय घेतील. कोणताही निर्णय सामूहिक पद्धतीने घेतला जाईल, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले.



भाजपा स्थापना दिनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी भाजपा युवा मोर्चाच्या वतीने भाजपा ध्वज प्रदान करून तो फडकवण्यात आला. या वेळी भाजपा महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, महामंत्री श्रीकांत आगलावे, रितेश गावंडे, विष्णू चांगदे, नगरसेवक वरेन्द्र कुकरेजा, युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे, महामंत्री रितेश पांडे, रिषभ अरखेल व युवा मोर्चाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# मुख्यमंत्रिपद सलग दहा वर्षे भूषवणारे पी. विजयन् एकमेव

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

भारत सरकारच्या राज्य पुनर्गठन कायद्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी केरळ राज्याची स्थापना झाली. कोचीन आणि त्रावणकोर या दोन संस्थानांना एकत्र करत केरळ राज्य स्थापन करण्यात आले.

१९५७ मध्ये केरळमध्ये विधानसभेची पहिली निवडणूक झाली. त्यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाला बहुमत मिळाले. ई. इम. एस. नंबुद्रीपाद केरळचे पहिले मुख्यमंत्री झाले. केरळ हा सुरुवातीपासूनच डाव्यांचा गड होता. केरळमध्ये सुरुवातीला कधी भाकपचा तर कधी माकपचा मुख्यमंत्री होत असे. त्यानंतर काँग्रेसनेही राज्यात आपला प्रभाव निर्माण केला.

देशातील दोनच राज्यांत डाव्यांची सत्ता राहात होती. त्यात पहिले राज्य केरळ तर, दुसरे पश्चिम बंगाल होते. पश्चिम बंगालमधील डाव्यांची प्रदीर्घ राजवट २०११ मध्ये संपुष्टात आली. केरळमध्ये मात्र आलटून-पालटून डाव्यांची सत्ता राहात आहे. राज्यात कधी माकपच्या नेतृत्वातील डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) सत्तेवर येते तर, कधी काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडी



(यूडीएफ). २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत डाव्यांनी सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. राज्यातील हा एक प्रकारचा विक्रम होता.

१९५७ पासून राज्यात एकूण २३ मुख्यमंत्री झाले, यात प्रजा सोशालिस्ट पक्ष आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग या दोन पक्षांचा अपवाद वगळता सर्व मुख्यमंत्री डावी आघाडी वा काँग्रेसचेच राहिले. भाकपचे ई. एम. एस. नंबुद्रीपाद हे ५ एप्रिल १९५७ ते ३१ जुलै १९५९ या काळात ते मुख्यमंत्री होते. पट्टम ताणू पिल्लई हे प्रजा सोशालिस्ट पक्षाचे मुख्यमंत्री होते. सी. एच. मुहम्मद कोया हे इंडियन युनियन मुस्लिम लीगचे मुख्यमंत्री होते.

आर. शंकर हे काँग्रेसचे राज्यातील पहिले मुख्यमंत्री होते. सप्टेंबर १९६२ ते सप्टेंबर १९६४ अशी दोन वर्षे ते मुख्यमंत्री होते. भाकपचे ई. एम. एस. नंबुद्रीपाद दुसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. मार्च १९६७ ते नोव्हेंबर १९६९ असे जवळपास अडीच वर्षे त्यांनी मुख्यमंत्रिपद भूषवले.

कम्युनिस्ट पक्षाचे सी. अच्युता मेनोन, पी. के. वासुदेवन् नायर, ई. के. नायनार, आणि व्ही. एस. अच्युतानंदन हे मुख्यमंत्री झाले. माकपचे पिनाराई विजयन हे राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री आहेत. भाकपचे सी. अच्युत मेनोन आणि काँग्रेसचे के. करुणाकरन् यांच्यानंतर सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होण्याचे भाग्य डाव्या आघाडीच्या सरकारमध्ये पी. विजयन् यांनाच लाभले. दोन कार्यकाळात सलग दहा वर्षे केरळचे मुख्यमंत्रिपद सांभाळण्याचा विक्रम राज्यात फक्त विजयन् यांच्या नावावरच आहे.

अच्युत मेनोन पहिल्यांदा १ नोव्हेंबर १९६९ ला राज्याचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रिपदाचा त्यांचा पहिला कार्यकाळ हा साधारणतः नऊ महिन्यांचा होता. मेनोन यांचा मुख्यमंत्रिपदाचा दुसरा कार्यकाळ मात्र सात वर्षांचा होता. १ ऑक्टोबर १९७० ला मेनोन दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. २५ मार्च १९७७ पर्यंत ते मुख्यमंत्री होते. सलग सात वर्षे मुख्यमंत्रिपद उपभोगणे हाही एक राजकीय चमत्कार म्हटला पाहिजे.




# काँग्रेसचे के. करुणाकरन् सर्वाधिक म्हणजे चार वेळा होते मुख्यमंत्री

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

काँग्रेस नेते के. करुणाकरन् यांनी सर्वाधिक म्हणजे चार वेळा तर माकपचे ई. के. नायनार आणि काँग्रेसचे ए. के. ॲण्टोनी यांनी तीन वेळा केरळचे मुख्यमंत्रिपद भूषवले. गंमत म्हणजे करुणाकरन यांचा मुख्यमंत्रिपदाचा पहिला कार्यकाळ फक्त एक महिन्याचा होता.

२५ मार्च १९७७ ते २५ एप्रिल १९७७ असे एक महिना करुणाकरन् मुख्यमंत्री होते. २८ डिसेंबर १९८१ रोजी करुणाकरन् दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रिपदाचा त्यांचा दुसरा कार्यकाळही फक्त तीन महिन्यांचा होता. २४ मे १९८२ रोजी करुणाकरन तिसऱ्यांदा केरळचे मुख्यमंत्री झाले. यावेळी मात्र त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. माकपचे ई. के. नायनार यांच्यानंतर करुणाकरन मुख्यमंत्री झाले होते. २५ जानेवारी १९८० ते २० ऑक्टोबर १९८१ या काळात नायनार मुख्यमंत्री होते. करुणाकरन मुख्यमंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतर नायनार पुन्हा केरळचे मुख्यमंत्री झाले. २६ मार्च १९८७ ते १७ जून १९९१ या काळात नायनार मुख्यमंत्री होते. गंमत म्हणजे, नायनार यांच्यानंतर



करुणाकरन चौथ्यांदा केरळचे मुख्यमंत्री झाले. २४ जून १९९१ ते १६ मार्च १९९५ या काळात ते मुख्यमंत्री होते. २० मे १९९६ ला नायनार तिसऱ्यांदा केरळचे मुख्यमंत्री झाले, १३ मे २००१ पर्यंत ते मुख्यमंत्री होते. यावेळी पहिल्यांदा त्यांनी मुख्यमंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. १९८० ते २००१ अशी सलग २१ वर्षे यात ए. के. ॲण्टोनी यांच्या मुख्यमंत्रिपदाचा १४ महिन्यांचा कार्यकाळ वगळता केरळचे मुख्यमंत्रिपद नायनार आणि करुणाकरन यांच्याकडे होते.

२७ एप्रिल १९७७ ते २७ ऑक्टोबर १९७८ या काळात काँग्रेसचे ए.के. ॲण्टोनी पहिल्यांदा केरळचे मुख्यमंत्री झाले. २२ मार्च १९९५ ते ९ मे १९९६ या काळात ॲण्टोनी केरळचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. १७ मे २००१ ते २९ ऑगस्ट २००४ या काळात ॲण्टोनी यांनी तिसऱ्यांदा केरळचे मुख्यमंत्रिपद भूषवले. पण, ॲण्टोनी यांना एकदाही मुख्यमंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही.

केरळचे मुख्यमंत्रिपद काँग्रेसचे ओमन चांडी यांनीही दोन वेळा भूषवले. ३१ ऑगस्ट २००४ ला चांडी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. १८ मे २००६ पर्यंत ते मुख्यमंत्री होते. १८ मे २०११ चांडी दुसऱ्यांदा केरळचे मुख्यमंत्री झाले. २५ मे २०१६ पर्यंत ते मुख्यमंत्री होते. यावेळी पहिल्यांदा त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला.

ओमन चांडी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दोन कार्यकाळाच्या मध्ये १८ मे २००६ ते १४ मे २०११ माकपचे व्ही. एस. अच्युतनंदन केरळचे मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्रिपदाचे पाच वर्षांचे सलग दोन कार्यकाळ पूर्ण करणारे माकपचे पिनाराई विजयन् हे राज्यातील एकमेव नेते आहेत. केरळमध्ये सलग दोनदा मुख्यमंत्रिपद भूषवण्याचे भाग्य भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सी. अच्युत मेनोन आणि काँग्रेसचे के. करुणाकरन यांना मिळाले. पण या दोघांना सलग दहा वर्षे मुख्यमंत्रिपद भूषवता आले नाही. (तभा वृत्तसेवा)

# अजित पवारांच्या अपघाताची सखोल चौकशी करा : रामदास आठवले यांची मागणी

## बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचाही आग्रह

**पुणे, दि. ४ एप्रिल-**

केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे प्रमुख रामदास आठवले यांनी बारामती येथील पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, अशी मागणी केली आहे. तसेच, अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आठवले यांनी सांगितले की, बारामतीमधून सुनेत्रा पवार निवडणूक अर्ज दाखल करणार आहेत. त्यांनी मला प्रचारासाठी आमंत्रित केले असून, मी बारामतीला जाणार आहे. काँग्रेस पक्षाने अजित पवार यांचे योगदान लक्षात घेऊन ही जागा बिनविरोध निवडून द्यावी. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी बारामतीमध्ये उमेदवार देऊ नये, अशी आमची भूमिका असल्याचे आठवले म्हणाले.

अजित पवार हे राज्यातील एक मोठे नेते होते. त्यांच्या विमान अपघाताची सीबीआयमार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आठवले यांनी केली.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र पाठवले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

आठवले यांनी त्यांच्या राज्यसभा खासदारकीच्या तिसऱ्या कार्यकाळाबद्दल सांगितले. मला मिळालेल्या खासदार पदाचा उपयोग देशभरात पक्ष वाढवण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार रुजवण्यासाठी करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी मला पाठबळ दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले.




### खरात प्रकरणाचा सखोल तपास व्हावा

नाशिकचे अशोक खरात त्यांच्या चुकीमुळे गजाआड गेले आहे. मी कोणत्या ही भोंदूबाबाकडे जात नाही तरी मला राजकारणात सर्व पदे मिळत आहे. राजकारणी यांनी कोणत्याही अंधश्रद्धावर विश्वास ठेवू नये. पारदर्शक तपास याप्रकरणाबाबत सुरू असून सखोल तपास या गुन्ह्याचा झाला पाहिजे . चौकशी पूर्ण झाल्यावर सत्य बाब समोर येईल. अनेक जणांचे फोटो खरात यांच्या सोबत असले तरी प्रत्येकाचा त्यांच्याशी घनिष्ट संबंध असे म्हणता येणार नाही, असे मत आठवले यांनी यावेळी व्यक्त केले.

## हिमाचलने लपेटली पांढरी चादर

◆ **मनाली, ४ एप्रिल**

हिमाचल प्रदेशातील अटल बोगद्यावर दक्षिण प्रवेशद्वारापासून सोलांग नाल्यापर्यंत बर्फाची पांढरी चादर पसरली आहे. रस्त्यावरील बर्फाच्या थरामुळे शनिवारी सकाळी लाहौलच्या दिशेने जाणारी शेकडो वाहने अडकली होती. सायंकाळी उशिरा बर्फवृष्टी वाढल्याने वाहने घसरू लागली.

मनाली पोलिसांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून वाहने बाहेर काढण्यास सुरुवात केली. शनिवारी बर्फवृष्टी सुरूच असल्याने पोलिसांनी सर्वसाधारण वाहनांसाठी अटल बोगदा बंद केला. मात्र, सकाळी सिसू आणि कोक्सरला गेलेले पर्यटक सायंकाळी बर्फवृष्टी वाढल्याने परत येऊ लागले. वाहने घसरत असल्यामुळे अटल बोगद्याच्या आत शेकडो वाहने अडकली आहेत. बोगद्यापासून हॉकी ब्रिजपर्यंत वाहतूक कोंडी झाली आहे. त्यामुळे वाहने मनालीच्या दिशेने पाठवली जात आहेत. अटल बोगद्याच्या दक्षिण प्रवेशद्वारापासून धुंडीपर्यंत झालेल्या हिमवृष्टीमुळे पर्यटकांसमोर अडचणी वाढल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# तेल टँकर चीनकडे वळविल्याची अफवा

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

तेल व्यापारात जहाजांचा मार्ग बदलणे ही एक सामान्य प्रथा आहे. व्यावसायिक अनुकूलन आणि परिचालन लवचिकतेच्या आधारावर, सागरी मालवाहू जहाजे अनेकदा प्रवासादरम्यान आपले गंतव्यस्थान बदलतात, असे नमूद करीत पैशाच्या अडचणीमुळे इराणहून निघालेले तेल टँकर चीनच्या दिशेने वळवल्याचा दावा केंद्र सरकारने फेटाळून लावला.

कच्चे तेल आणि एलपीजीचा पुरवठा पैशांच्या समस्येमुळे विस्कळीत झाल्याचे दावे पेट्रोलियम मंत्रालयाने निराधार असल्याचे म्हटले आहे. इराणहून भारताकडे येणारा तेल टँकर चीनकडे वळवण्यात आल्याचे वृत्त दिशाभूल करणारे आहे. आंतरराष्ट्रीय तेल व्यापारात जहाजांचा मार्ग बदलणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. याचा पुरवठ्याशी संबंध जोडणे चुकीचे आहे. इराणकडून येणाऱ्या तेलासाठी कोणत्याही प्रकारची पैशांची अडचण नाही. भारत ४० पेक्षा जास्त देशांकडून तेल आयात करतो. तेलशुद्धीकरण कंपन्यांना त्यांच्या सोयीनुसार तेल खरेदीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. इराणी एलपीजी घेऊन आलेले सी बर्ड जहाज २ एप्रिल रोजी मंगळूर बंदरात सुखरूप पोहोचले.

दरम्यान, कॅप्लर या प्रसिद्ध ट्रॅकिंग कंपनीने पिंग शुन नावाचा अफ्रामॅक्स टँकर भारताऐवजी चीनला पाठवण्यात आल्याचे म्हटले होते. सुरुवातीला या जहाजाचे गंतव्यस्थान गुजरातचे वाडीनार बंदर असल्याचे सांगण्यात आले होते आणि ४ एप्रिल ही पोहोचण्याची अंदाजित वेळ होती. मात्र, जहाजाच्या रडारने गुजरातऐवजी थेट चीनमधील डोंगयिंग हे ठिकाण दाखवल्याने चर्चेला उधाण आले होते. (वृत्तसंस्था)

# संसद शिवीगाळ अन माईक तोडण्यासाठी नसते

### राघव चड्ढांचे 'आप'ला प्रत्युत्तर

◆ **लुधियाना, ४ एप्रिल**

आम आदमी पार्टीमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. आपच्या नेत्यांकडून खासदार राघव चड्ढा यांच्यावर आरोप करण्यात येत आहे.

या आरोपांना प्रत्युत्तर देण्यासाठी खा. चड्ढा यांनी शनिवारी समाज माध्यमावर पोस्ट करत लिहिले, मला बोलायचे नव्हते. पण, मी गप्प राहिलो असतो तर वारंवार बोललेले खोटेही खरे वाटू लागले असते. आपने केलेल्या तीन आरोपांमध्ये सत्यता नाही, असे ते म्हणाले.

राघव यांनी व्हिडीओमध्ये पुढे म्हटले की, माझ्याविरोधात एक स्क्रिप्टेड मोहीम चालवली जात आहे. तीच भाषा, तेच बोलणे, तेच आरोप. हा काही योगायोग नाही तर एक समन्वित हल्ला आहे. आधी मला वाटले की, मी याला उत्तर देऊ नये. मग वाटले की, एक खोटे शंभर वेळा बोलले तर, लोक ते खरे मानतात. म्हणून, मी विचार केला की उत्तर द्यावे.

माझ्यावर तीन आरोप केले आहेत. ज्यामुळे मला संसदेत बोलण्याची संधी दिली जाणार नाही. मी संसदेत गोंधळ घालण्यासाठी, ओरडण्यासाठी, माईक तोडण्यासाठी किंवा शिवीगाळ करण्यासाठी गेलो नाही, तर जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी गेलो, असेही त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### जखमी आहे, म्हणून घातक आहे

राघव यांनी 'धुरंधर' चित्रपटातील मी जखमी आहे, म्हणून घातक आहे, हा संवाद म्हणत आपला इशारा दिला. आपने २ एप्रिलला राघव चड्ढा यांना राज्यसभेच्या उपनेते पदावरून हटवले होते. यासोबतच, राज्यसभा सचिवालयाला लिहून दिले की, त्यांना पक्षाच्या कोट्यातून बोलण्यासाठी वेळ देऊ नये. यानंतर राघव चड्ढा यांनी व्हिडीओ जारी करून म्हटले होते की, मला शांत केले, मी हरलो नाही. मी ती नदी आहे, जी पूर बनून येते. यानंतर आप नेते अनुराग ढांडा, आतिशी मार्लेना, सौरभ भारद्वाज आणि मुख्यमंत्री भगवंत मान यांनी प्रत्युत्तर दिले होते.

## बनावट टूथपेस्ट कारखान्याचा भंडाफोड

**नवी दिल्ली, ४ एप्रिल**

दिल्ली पोलिसांनी निकृष्ट दर्जाच्या केमिकल्सचा वापर करुन बनावट टूथपेस्ट बनवणाऱ्या कारखान्याचा भंडाफोड केला. पोलिसांनी या कारखान्यात छापा टाकून प्रसिद्ध सेन्सोडाइन ब्रँडच्या नावाखाली बनावट टूथपेस्ट तयार करणारे रॅकेट उघडकीस आणले आहे.

पोलिस कारवाईत या कारखान्यात आरोपी स्वस्त आणि निकृष्ट दर्जाच्या केमिकल्सचा वापर करून बनावट टूथपेस्ट तयार करत होते. हे उत्पादन अगदी मूळ कंपनीच्या पॅकेजिंगसारखेच दिसेल अशा पद्धतीने तयार केले जात होत. त्यामुळे सामान्य ग्राहकांना खरी टूथपेस्ट आणि बनावट यामधील फरक ओळखणे कठीण जात होते, असेही तपासात उघड झाले आहे.

# अनेक राज्यांमध्ये गारपीट, मुसळधार पावसाचा इशारा

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

सध्या देशातील हवामान पूर्णपणे बदलले आहे. अचानक झालेल्या या बदलामुळे लोकांच्या अडचणी वाढल्या आहेत. भारतीय हवामान विभागाने अनेक राज्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागानुसार, पुढील २४ तासांत अनेक राज्यांमध्ये जोरदार वादळ, गारपीट आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ६० ते ७० किलोमीटरपर्यंत असू शकतो, अशीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाने उत्तर ते मध्य भारतापर्यंत अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पंजाब, हरयाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तरप्रदेश, पूर्व राजस्थान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. या सर्व भागांतील लोकांना सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, जम्मू-काश्मीरसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दक्षिण भारतात तामिळनाडू आणि केरळच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने देशाच्या इतर अनेक भागांमध्ये यलो अलर्ट जारी केला आहे. पश्चिम राजस्थान, गुजरात, पश्चिम मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, किनारपट्टीवरील आंध्रप्रदेश, ओडिशा, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा येथेही वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)



संजय राऊत यांनी त्यांच्या संपर्कातील आमदार सांभाळून ठेवावे. आपले आमदार आणि खासदार कसे टिकून राहतील, याकडे लक्ष द्यावे. तुम्ही तुमचा पक्ष सांभाळून ठेवा. येत्या काळातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीकडे लक्ष द्या.

**गिरीश महाजन**, जलसंपदा मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

रविवार, ५ एप्रिल २०२६ ३




ठाणे जिल्ह्यातील शिवसेनेचा इतिहास सांगायचा झाला तर पहिले जिल्हाप्रमुख म. धा. जोशी, सतीश प्रधान, साबीर शेख त्याच्यानंतर मी आणि माझ्यानंतर आनंद दिघे होते. नंतर बरेच जण झाले. मी बऱ्याच जणांच्या नावांची मालिका सांगत नाही.

**गणेश नाईक**, शिवसेना नेते

# मोहरा जलविद्युत प्रकल्प पुन्हा होणार सुरू

### पाकिस्तानला जम्मू-काश्मीर सरकारचा दणका ● नूतनीकरणासाठी कंत्राट काढण्यास मंजुरी

◆ **श्रीनगर, ४ एप्रिल**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार अनिश्चित काळासाठी स्थगित केला आहे. यामुळे पाकिस्तानला आधीच धक्का बसला असताना, आता जम्मू-कश्मीरमध्ये जलविद्युत प्रकल्पांना गती देण्याचे काम जोमाने सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून १२० वर्षे जुना ऐतिहासिक मोहरा जलविद्युत प्रकल्प पुन्हा सुरू करण्याची योजना जम्मू-काश्मीर सरकारने आखली आहे. प्रकल्पाच्या नूतनीकरणासाठी कंत्राट जारी करण्यास सरकारने मंजुरी दिली.

मोहरा हायड्रोइलेक्ट्रिक प्रोजेक्ट हा भारतातील सर्वांत जुन्या जलविद्युत प्रकल्पांपैकी एक मानला जातो. हा प्रकल्प १९०५ मध्ये सुरू करण्यात आला होता. सुरुवातीला या प्रकल्पाची क्षमता पाच मेगावॅट होती आणि तो झेलम नदीवर बांधण्यात आला आहे. हा प्रकल्प १९९० पासून बंद आहे. या प्रकल्पातून अनेक वर्षे श्रीनगर, काश्मीर खोरे आणि आसपासच्या भागांना वीज पुरवठा केला जात होता.

विशेष म्हणजे, १९५० पर्यंत हा काश्मीर खोऱ्याचा प्रमुख वीज स्रोत होता. १९९२ मध्ये आलेल्या भूकंपामुळे या प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर हा प्रकल्प हळूहळू बंद पडला. आता जम्मू-कश्मीर सरकारने या प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनाचा निर्णय घेतला आहे. जम्मू-कश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. 'जम्मू-कश्मीर स्टेट पॉवर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'ने कंत्राट काढण्यास मंजुरी दिली आहे.



#### प्रकल्पाची क्षमता वाढवली जाणार

सरकारने या प्रकल्पाचे नूतनीकरण, आधुनिकीकरण आणि क्षमता वाढवण्यासाठी 'ट्रान्झॅक्शन ॲडव्हायझर' नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाची क्षमता पाच मेगावॅटवरून १०.५ मेगावॅट करण्याची योजना आहे. प्रकल्प पुन्हा सुरू झाल्यानंतर जम्मू-कश्मीरमध्ये वीज उपलब्धता वाढण्यास मदत होईल.

**ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रयत्न**

मोहरा प्रकल्प पुन्हा सुरू करणे हे केवळ वीज निर्मितीसाठी नसून, काश्मीरच्या इंजिनीअरिंग वारशाचा एक महत्त्वाचा भाग जपण्याचा प्रयत्न मानला जात आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक वीज उपलब्धता वाढेल, ऐतिहासिक इमारतीचे जतन होईल आणि स्थानिक रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. भारताने सिंधू जल करार स्थगित केल्यानंतर जम्मू-कश्मीरमधील जलविद्युत प्रकल्पांना गती देण्यात येत आहे. (वृत्तसंस्था)

# आखाती देशात दररोज २० भारतीयांचा मृत्यू

### केंद्र सरकारची माहिती, ● विदेशात पाच वर्षांत ३७,७४० नागरिकांनी गमावला जीव

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

२०२१ ते २०२५ या काळात विदेशात एकूण ३७,७४० भारतीय कामगारांचा मृत्यू झाला, तर आखाती देशात मृत झालेल्या नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे. या देशात सरासरी दररोज २० भारतीय नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी दिली.

पाच वर्षांत, ३७,७४० भारतीय कामगारांचा मृत्यू झाला. यापैकी ८६ टक्क्यांपेक्षा जास्त मृत्यू आखाती देशांमध्ये झाले. २०१२-२०१८ दरम्यान आखाती देशांमधील मृत्यूंची सरासरी संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये सर्वाधिक १२,३८० मृत्यू झाले, त्यानंतर सौदी अरब, कुवेत, ओमान आणि कतारचा क्रमांक लागतो. २०१२ ते २०१८ च्या मध्यापर्यंत आखाती देशात दररोज १० भारतीय कामगारांचा मृत्यू झाला. आग्नेय आशियामध्ये मृत्यूंची संख्या कमी होती, परंतु तक्रारींची संख्या जास्त होती. म्यानमारमध्ये शून्य मृत्यूंची नोंद झाली, परंतु २,५४८ तक्रारी नोंदवण्यात आल्या. एकूण तक्रारींची संख्या २०२१ मधील ११,६३२ वरून २०२५ मध्ये २२,४७९ पर्यंत वाढली. भारतीय दूतावास भारतीय नागरिकांना मदतीसाठी तत्पर आहे आणि कामगार संरक्षणासाठी अनेक देशांसोबत करार करण्यात आल्याचे सिंह यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

#### पाच वर्षांतील आकडेवारी

| वर्ष | मृत्यू |
|---|---|
| २०२१ | ८,२३४ |
| २०२२ | ६,६१४ |
| २०२३ | ७,२९१ |
| २०२४ | ७,७४७ |
| २०२५ | ७,८५४ |
| एकूण | ३७,७४० |

#### आखातातील परिस्थिती

| देश | मृतकांची संख्या |
|---|---|
| यूएई | १२,३८० |
| सौदी अरब | ११,७५७ |
| कुवेत | ३,८९० |
| ओमान | २,८२१ |
| मलेशिया | १,९१५ |
| कतार | १,७६० |

**छळाच्या ८०,९८५ तक्रारी**

पाच वर्षांत विदेशातील भारतीय दूतावासांना भारतीय नागरिकांकडून गैरवर्तन, शोषण आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाबाबत ८०,९८५ तक्रारी प्राप्त झाल्या. यामध्ये वेतन न मिळणे, पासपोर्ट जप्त करणे, अतिरिक्त कामाचा बोजा, रजेचा अभाव आणि नोकरी गमावण्यासारख्या तक्रारींचा समावेश होता. संयुक्त अरब अमिरातीमध्ये सर्वाधिक १६,९६५ तक्रारींची नोंद झाली, त्यानंतर कुवेत (१५,२३४), ओमान (१३,२९५) आणि सौदी अरेबिया (१२,९८८) यांचा क्रमांक लागतो. (वृत्तसंस्था)

# अफगाणिस्तानमधील भूकंपात आठ जणांचा मृत्यू

◆ **काबुल, ४ एप्रिल**

अफगाणिस्तानमधील काबुलमध्ये शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या भूकंपात आठ लोकांचा मृत्यू आणि २० जण जखमी आहे. ६.३ तीव्रतेच्या या भूकंपाचे धक्के पाकिस्तानच्या अनेक भागांमध्येही जाणवले. मात्र, तेथे कोणत्याही नुकसानीची माहिती समोर आलेली नाही.

पाकिस्तान भूकंपशास्त्र विभागाने निवेदनात म्हटले की, शुक्रवारी रात्री ९:१३ भूकंपाची नोंद झाली. याचे केंद्र अफगाणिस्तानमधील हिंदूकुश प्रदेशात होते आणि खोली जमिनीपासून १९० किलोमीटर आत होती. भूकंपाचे धक्के खैबर पख्तुनख्वा, इस्लामाबाद, व्याप्त काश्मीर आणि पंजाबच्या काही भागांमध्ये जाणवले. अफगाणिस्तानच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सांगितले की, मजार-ए-शरीफ येथे झालेल्या ६.३ तीव्रतेच्या भूकंपात आठ नागरिकांचा मृत्यू आणि २० जण जखमी आहे. भूकंपामुळे शहरातील ऐतिहासिक ब्लू मशिदीचेही नुकसान झाले होते. ही मशीद मजार-ए-शरीफचे प्रमुख धार्मिक आणि पर्यटनस्थळ आहे. (वृत्तसंस्था)



केरळमधील नयट्टींकारा येथील भाजपाचे उमेदवार चेंकल राजशेखरन् यांच्या समर्थनार्थ आयोजित रोड शोमध्ये सहभागी झालेले केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा

## बारामती पोटनिवडणुकीसाठी अभिजित बिचुकलेंचा अर्ज; सुनेत्रा पवारांच्या विरोधात ठोकला शड्डू

बारामती : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे सुरू आहे. या निवडणुकीसाठी आतापर्यंत १२ जणांचे अर्ज आले आहेत. त्यात 'बिग बॉस' फेम आणि नेहमीच चर्चेत राहणारे अभिजित बिचुकले यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून, निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकला आहे.

बारामती पोटनिवडणुकीचा अधिकृत कार्यक्रमही जाहीर झाला असून अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल असून, अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ९ एप्रिल आहे. तर या निवडणुकीसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यात अभिजित बिजकुले यांनी देखील बारामती पोटनिवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

कोणतीही निवडणूक असो, उमेदवारी अर्ज भरण्यात अभिजीत बिचुकले नेहमीच आघाडीवर असतात. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेवर होणारी पोटनिवडणूक आपण पूर्ण ताकदीने लढवणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. 'मी अपक्ष अर्ज का भरला आणि माझी पुढील रणनीती काय असेल, हे लवकरच पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट करेन,' असे बिचुकले यांनी अर्ज भरल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

बारामतीच्या रिंगणात आतापर्यंत १२ अपक्ष उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये अभिजीत कांबळे, दादा एकनाथ थोरात, संकेत गावडे, अनिल तपे, रज्जाक उर्फ अब्दुलरौफ जफर मुलाणी, विलास होळकर, संदीप जनार्दन खरात, मिथुन सोपानराव आटोळे, अरुण नितुरे, दत्तात्रय रावसाहेब बेडरे, दिलीप प्रभाकर अलोनी, त्रिशला कांबळे, गजानान उत्तम गवळी, रघू येताळा घुटूकडे, सागर शरद भिसे आणि सतिश कदम यांचा समावेश आहे. दरम्यान, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ही निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे. आम्ही आमचा उमेदवार उभा करणारच. मी स्वतः उभा राहणार की अन्य कोणी, हे लवकरच स्पष्ट करू, असे त्यांनी सांगितले. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी पवार कुटुंबीयांवर टीकाही केली. निवडणुकीत आश्वासने दिली जातात, पण ती पाळली जात नाहीत.

# दोन अब्ज डॉलर्सच्या कर्जाची परतफेड करा

### यूएईचा पाकिस्तानला दणका

◆ **इस्लामाबाद, ४ एप्रिल**

अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणविरुद्ध छेडलेल्या युद्धामुळे सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या देशांमधून होणारा तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत झाला. याचा फटका त्यांच्या अर्थव्यवस्थांना बसत आहे. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी संयुक्त अरब अमिराती अर्थात् यूएईने पाकिस्तानला दिलेले दोन अब्ज डॉलर्सच्या कर्जाची तातडीने परतफेड करण्याचा निर्देश दिला. हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या पाकिस्तानसाठी हा मोठा दणका आहे.



युद्धामुळे निर्माण झालेली बिकट परिस्थिती पाहता, यूएईने इतर देशांना दिलेली कर्जे वसूल करण्यास सुरुवात केली आहे. मध्यपूर्वेतील अस्थिरतेमुळे यूएईने पाकिस्तानला दिलेले कर्ज तातडीने परत मागितले आहे. हे कर्ज पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी दिले होते. यूएईने दिलेली दोन अब्ज डॉलर्सची रक्कम स्टेट बँक ऑफ पाकिस्तानमध्ये ठेव म्हणून सुरक्षित ठेवण्यात आली होती, ज्यावर पाकिस्तान ६ टक्के व्याज देत होता. दरवर्षी यूएई या कर्जाची मुदत वाढवून देत असे.

यावेळी डिसेंबर २०२५ मध्ये केवळ दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. याची अंतिम मुदत १७ एप्रिल रोजी संपत आहे. मात्र, मुदतीपूर्वी कर्जाची रक्कम परत करावी असा निर्देश यूएईने पाकिस्तानला दिले. कर्जाची रक्कम परत केल्यामुळे पाकिस्तानच्या गंगाजळीत मोठी घट होईल. चालू आर्थिक वर्षात पाकिस्तानला सौदी अरबला पाच अब्ज डॉलर्स, चीनचे चार अब्ज डॉलर्सचे कर्ज परत करायचे आहे. (वृत्तसंस्था)



गुजरातमध्ये गांधीनगरजवळ असलेल्या अडालज येथील पुरातन रुदाबाईच्या विहीर पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. रखरखत्या उन्हात येथे विहीर पाहण्यासाठी आलेले पर्यटक

# रॉबर्ट वढेरांवरील खटल्याची सुनावणी पूर्ण

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने रॉबर्ट लढेरा यांना मनी लॉड्रिंग प्रकरणात आरोपी म्हणून समन्स बजावण्याच्या मुद्द्यावर निर्णय राखून ठेवला आहे. विशेष न्यायाधीश सुशांत चांगोत्रा यांनी याप्रकरणी १५ एप्रिलला निकाल देण्याचा आदेश दिला आहे.

माझ्याविरोधात मनी लॉड्रिंगचा कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही, असे रॉबर्ट वढेरा यांनी सुनावणीदरम्यान सांगितले. ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल न्यायालयाने घेऊ नये, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलाने केला. २ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायालयाने वढेरा यांच्यासह या प्रकरणातील दहा आरोपींना समन्स बजावले होते. १७ जुलै २०२५ रोजी ईडीने हरयाणातील शिकोहपूर जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वढेरा आणि इतर १० जणांची नावे घेऊन आरोपपत्र दाखल केले होते. यात त्यांची कंपनी मे. स्काय लाईट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. चाही समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# वॉशिंग्टनच्या महापौर निवडणुकीत भारतीय वंशाच्या रिनी उमेदवार

◆ **वॉशिंग्टन, ४ एप्रिल**

अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनच्या महापौरपदाच्या निवडणुकीसाठी भारतीय वंशांच्या ३१ वर्षीय रिनी संपत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या पदासाठी निवडणुकीत स्थान मिळवणाऱ्या त्या पहिल्या दक्षिण आशियाई उमेदवार ठरल्या आहेत. त्यांना कोणत्याही पक्षाने पाठिंबा दिलेला नाही.

#### रिंगणातील पहिल्या दक्षिण आशियाई उमेदवार



तामिळनाडूच्या थेनी येथे जन्मलेल्या रिनी संपत लहानपणीच अमेरिकेत स्थायिक झाल्या. त्यांनी सांगितले की, ही उपलब्धी केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण दक्षिण आशियाई समुदायासाठी अभिमानाचा क्षण आहे. ४,५०० पेक्षा जास्त लोकांनी त्यांच्या समर्थनार्थ स्वाक्षरी केली, ज्यामुळे त्यांना निवडणुकीत अधिकृतपणे स्थान मिळाले. रस्त्यांची दुरुस्ती, गटार आणि पाण्याचा निचरा होण्याच्या समस्या, ९११ सेवा सुधारणे आणि महागाई कमी करणे हे त्यांचे प्राधान्यक्रम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांना कोणत्याही मोठ्या राजकीय गटाचा पाठिंबा मिळालेला नाही. त्यांच्या मते, शहराला नव्या विचारांची आणि तळागाळातील नेतृत्वाची गरज आहे.

**भारतीय मूल्य प्रेरणास्थान**

रिनी यांनी यशाचे श्रेय आपल्या कुटुंबाला, विशेषतः आजोबा आणि वडिलांना दिले. त्या म्हणाल्या की, भारतात मिळालेली मूल्ये आणि कुटुंबाची प्रेरणा त्यांना लोकसेवा करण्याचे बळ देतात. रिनी संपत यांची उमेदवारी अमेरिकेतील भारतीय आणि दक्षिण आशियाई समुदायाच्या वाढत्या राजकीय सहभागाचे द्योतक आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'राजा शिवाजी'च्या टिझरला मोठा प्रतिसाद



**मुंबई** : रितेश देशमुखने दिग्दर्शित आणि मुख्य भूमिका साकारलेला 'राजा शिवाजी' हा बहुप्रतीक्षित ऐतिहासिक चित्रपट सध्या भारतीय चित्रपटसृष्टीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. सध्या निर्मितीच्या टप्प्यात असलेल्या चित्रपटांमध्ये 'राजा शिवाजी' हा निःसंशयपणे सर्वांत भव्य चित्रपट मानला जात आहे. ३१ मार्च रोजी या चित्रपटाचा 'फर्स्ट लूक' डिजिटल माध्यमातून प्रदर्शित करण्यात आला आणि या अनपेक्षित सरप्राईजने प्रेक्षकांना सुखद धक्का दिला. भारताच्या महान योद्धा राजांपैकी एक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाची नव्याने मांडणी करण्याचे वचन देणाऱ्या या चित्रपटाने पहिल्याच झलकमध्ये प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटासोबत थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या विशेष नाट्यमय टीझरने प्रचंड उत्साह निर्माण केला होता. थिएटरमधील त्या अनुभवाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यानंतर, डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाल्यानंतरही या 'फर्स्ट लूक टीझर'ची लोकप्रियता सातत्याने वाढताना दिसत आहे.

### अहान पांडेला मिळाला दुसरा चित्रपट

**मुंबई** : चित्रपट निर्माता अली अब्बास जफरने पुढील चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले आहे. हा चित्रपट सध्या अनटायटल्ड आहे आणि तो यश राज फिल्म्सच्या बॅनरखाली बनवला जाईल. यात 'सैयारा'मधून पदार्पण करणारा अहान पांडे मुख्य भूमिकेत असेल. याशिवाय चित्रपटात शर्वरी वाघ, ऐश्वर्य ठाकरे आणि बॉबी देओलही असेल. चित्रपटाबद्दलची माहिती अली अब्बास जफरने इन्स्टाग्रामवर दिली. त्याने एक फोटो शेअर केला, ज्यात अहान पांडेचे तीव्र डोळे आणि एक क्लॅपबोर्ड दिसत आहे. ही त्याच्या भूमिकेची सुरुवातीची झलक मानली जात आहे. सांगायचे झाल्यास, हा चित्रपट आदित्य चोप्रा आणि अली अब्बास जफर यांचा पाचवा चित्रपट असेल. यापूर्वी दोघांनी 'मेरे ब्रदर की दुल्हन', 'गुंडे', 'सुलतान' आणि 'टायगर जिंदा है' या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे.



### प्रिया-उमेशची नवीन मालिका

**मुंबई** : 'आणि काय हव' या धमाल आणि रोजच्या आयुष्यातील फ्रेश पात्रांसह आलेल्या वेब मालिकेनंतर अभिनेता उमेश कामत आणि अभिनेत्री प्रिया बापट या दोघांची जोडी आणखी एका अशाच वेब मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. दिग्दर्शक वरुण नार्वेकरची 'हे काय नवीन?' ही मालिका एका लग्नातील गुंतागुंतीच्या भावना हलक्या-फुलक्या पण वास्तववादी पद्धतीने दाखवते. आठ भागांची ही मालिका प्रामाणिक आणि उत्कृष्ट अभिनयाने सजली आहे. मराठी वेबविश्वात 'सध्या हे काय नवीन?' ही मालिका चांगलीच चर्चेत आहे. मालिकेची कथा रमा आणि तिचा नवरा आदित्य यांच्या आयुष्याभोवती फिरते. वरकरणी सर्व काही सुरळीत असले, स्थिर नोकरी, प्रेमळ नाते आणि मुले नको असा घेतलेला निर्णय, तरीही रमाच्या आयुष्यात 'तुलना' आणि 'फोमो'ची भावना डोके वर काढताना दिसते. निखिल आणि त्याची लिव्ह-इन पार्टनर साक्षी यांचे 'परफेक्ट' वाटणारे आयुष्य पाहून रमाला स्वतःच्या आयुष्याबद्दल प्रश्न पडू लागतात. याच दरम्यान रमा नोकरी सोडून स्वतःचा कपड्यांचा ब्रॅण्ड सुरू करण्याचा निर्णय घेते. मात्र, या नव्या प्रवासात तिच्या मनात आत्मविश्वासाऐवजी शंका अधिक वाढताना दिसतात.



# इराणची क्षेपणास्त्र, ड्रोन हल्ल्याची क्षमता अबाधित

### अमेरिकेच्या गुप्तचर अहवालातून खुलासा, ट्रम्प यांच्यावर प्रश्नचिन्ह

◆ **वॉशिंग्टन, ४ एप्रिल**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणची लष्करी क्षमता नष्ट केल्याचे म्हटले होते. तथापि, ट्रम्प यांचा हा दावा फोल असल्याचे एका अमेरिकी गुप्तचर अहवालातून समोर आले. इराणने बोगदे आणि भूमिगत शस्त्रागारांत मोठ्या संख्येने क्षेपणास्त्र प्रक्षेपक आणि ड्रोन लपवून ठेवल्याचे नुकत्याच जाहीर झालेल्या अमेरिकेच्या गुप्तचर अहवालात म्हटले आहे.



अमेरिकेच्या गुप्तचर विभागाचा अहवाल आणि एका अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात वॉशिंग्टन पोस्टने म्हटले की, इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या मोठ्या हल्ल्यानंतरही, त्यांचे जवळपास निम्मे क्षेपणास्त्र प्रक्षेपक अबाधित आहेत आणि हजारो ड्रोन त्यांच्या भूमिगत शस्त्रागारात कायम आहेत. संपूर्ण प्रदेशात विध्वंस घडवण्यासाठी अजूनही पूर्णपणे इराणी फौजा तयार आहेत.

इराणने भूमिगत शस्त्रागारात मोठ्या संख्येने क्षेपणास्त्रे जपून ठेवली आहेत, यात क्रूझ क्षेपणास्त्रांचा एक महत्त्वपूर्ण भाग समाविष्ट आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही क्षेपणास्त्रे महत्त्वपूर्ण मानली जातात असेही अहवालात म्हटले आहे. इराणी नौदलाच्या युद्धनौका मोठ्या प्रमाणात नष्ट झाल्या असल्या तरी, इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सशी संलग्न असलेल्या स्वतंत्र नौदलांनी आपली सुमारे निम्मी क्षमता टिकवून ठेवली आहे. त्यांच्याकडे अजूनही शेकडो, लहान नौका आणि मानवरहित जहाजे आहेत. (वृत्तसंस्था)

#### बोगद्यांमध्ये शस्त्रसाठा

गुप्तचर माहितीनुसार, इराणने भूमिगत सुविधांचा वापर केल्यामुळे त्यांच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपकांचे संरक्षण करण्यास मदत झाली आहे. त्यांनी आपली क्षेपणास्त्रे गुहांमध्ये बऱ्याच काळापासून लपवून ठेवली आहेत, ज्यामुळे त्यांना लक्ष्य करणे कठीण झाले आहे.

# दादरा नगर हवेलीत स्फोट; ४ ठार, ६ जखमी

◆ **दमण, ४ एप्रिल,**

दादरा नगर हवेलीतील औद्योगिक परिसरातील एका कंपनीत शनिवारी सकाळी नायट्रोजन गॅस सिलेंडरचा स्फोट झाला, यात चार जणांचा मृत्यू झाला, तर सहा कामगार जखमी आहे.

अपघातानंतर लगेचच स्थानिक रहिवासी, प्रशासन आणि पोलिसांची पथके मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाली. सर्व जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्फोट इतका शक्तिशाली होता की त्यामुळे आजूबाजूच्या इमारतींना तडे गेले. दादरा नगर हवेलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी स्फोटात चार जणांच्या मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा दिला आणि घटनेच्या तपासाचा आदेश संबंधित विभागाला दिला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




रोखठोक

# खडतर तपश्चर्येची यशस्वी सांगता!

**दिनेश गुणे**

महाराष्ट्रात तेव्हा काँग्रेसप्रणीत आघाडी सत्तेवर होती. ऑक्टोबर २०१० मध्ये एका मंत्रिमडळ बैठकीत नक्षल प्रश्नावरील चर्चेत महाराष्ट्राचे तेव्हाचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांना काही सहकाऱ्यांनी घेरले आणि दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात त्याचीच बातमी झाली. नक्षल प्रश्नावर 'आबां'ना मंत्र्यांनी घेरले, फटकारले, नक्षल हा फक्त 'कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आहे' वगैरे मथळ्यांच्या या बातम्यांना प्रत्युत्तर देणाऱ्या एका लेखाद्वारे आर. आर. पाटील यांनी चांगलाच समाचार घेतला. अधिकृत प्रेस ब्रिफींग करूनही जेवढे चांगले सांगता आले नसते, त्यापेक्षा व्यवस्थितपणे बातमी 'लीक' करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांचे मी कौतुक करतो. त्यांचा मंत्री म्हणून राज्याला किती फायदा आहे, यापेक्षा अशी व्यक्ती मंत्री झाल्याने राज्य एका चांगल्या पत्रकाराला मुकल्याचे मला दुःखही आहे, असे बोचरे चिमटे काढत त्यांनी महाराष्ट्रातील नक्षलवाद समस्येचे नेमके पदरही त्या लेखातून उलगडून दाखविले. त्याच बैठकीच्या दरम्यान महाराष्ट्रातील नक्षलप्रभावित गडचिरोली जिल्ह्यात नक्षली हल्ल्यामध्ये दोन पोलिस अधिकारी, दोन केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान तर छत्तीसगडच्या सीमेनजीक तीन 'इंडो तिबेटियन बॉर्डर पोलिसां'चे जवान हुतात्मा झाले होते. या लढाईत तीन विद्यार्थ्यांसह पाच निरपराध नागरिकांचा बळी गेला होता. याचा उल्लेख करताना, महाराष्ट्राच्या पोलिस दलाने नक्षलविरोधी संघर्षात शौर्य दाखविले असले, तरी एखादी 'स्ट्रॅटेजी' कमी पडते, प्लॅन फसतो व पोलिसांना हुतात्मा व्हावं लागते, याची कबुलीही त्यांनी दिली होती. माओवादी किंवा नक्षलवादी आपला संपूर्ण 'कोड ऑफ कंडक्ट' तयार ठेवतात आणि कोणत्या गोष्टीचा कशा प्रकारे फायदा घ्यावयाचा, हे योजनापूर्वक ठरवितात. 'टेकिंग ॲडव्हान्टेज ऑफ बॅड गव्हर्नंस ऑफ ब्युरोक्रसी अँण्ड पोलिटिशियन' म्हणजेच प्रशासनाची आणि राज्यकर्त्यांची राज्य करण्याच्या आणि प्रशासन राबविण्याच्या पद्धतीतील चुका शोधून त्यांचा फायदा घेणे आणि सामान्य जनतेच्या प्रशासनाकडून होणाऱ्या उपेक्षेचे भांडवल करून त्याचा नक्षलवाद वाढण्यासाठी उपयोग करणे, ही नक्षल्यांची कार्यपद्धती त्यांनी अचूकपणे अधोरेखित केली होती. नक्षलवाद हा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आहेच; पण तो सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नही आहे. त्यामुळे 'नक्षलवादाचे उत्तर केवळ पोलिसांच्या गोळीतच नव्हे, तर सचिवालयाच्या सहाही मजल्यांतील दालनांत शोधावे लागेल,' हे त्यांचे विधान त्यावेळी अधोरेखित झाले होते. नक्षलवादी हे आपल्या लोकशाही व्यवस्थेला 'शोषकांची दलाल पद्धत' मानतात व निवडणुकांना शोषक व्यवस्थेचा भाग मानतात. ही जर माओवाद्यांची धारणा असेल, तर जनतेला पटतील व जाणवतील अशा सुधारणा क्रमप्राप्त ठरतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा सर्वांनाच देण्याचं धोरण ठरवावे लागेल. पोलिसांबरोबरच सर्वच राजकीय पक्षांना या लढाईत उतरावे लागेल. नक्षलग्रस्त भागाचा विकास झाला नाही, हे कबूल करून जाणीवपूर्वक पावले उचलावी लागतील. लोकांना आपले वाटेल असे प्रशासन दिसावे लागेल. आदिवासींना वनजमीन हक्क पट्ट्याची कामे मंद गतीने होतात, पण खाण मालकांना शेकडो एकर जमिनीचे कब्जे देणाऱ्या फाईल मात्र शीघ्रगतीने का धावतात, याचा शोध घ्यावा लागेल. थोडक्यात, नक्षलवादाचे खरे उत्तर हे विकासाच्या माध्यमातूनच सापडू शकेल. त्यासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करणे, जमीन ओलिताखाली आणणे, पिढ्यान्‌पिढ्या आदिवासी कसत आहेत, त्या जमिनी त्यांच्या नावावर करणे व बेरोजगारांना काम देणे, चांगले शिक्षण, चांगले आरोग्य व दारिद्र्य निर्मूलन हा त्याच्यावरील खरा उपाय आहे, असे त्यांनी आपल्या एका चिंतनपर लेखात नमूदही केले होते...




**नक्षलवाद समूळ उच्चाटनाचा विडा**

महाराष्ट्राच्या तत्कालीन गृहमंत्र्यांच्या या मुक्त चिंतनातून राज्यातील नक्षल समस्येचे नेमके चित्र स्पष्टपणे उमटले असतानाही, नक्षलवादाचा बीमोड करण्यात तेव्हाचे राज्य शासन मात्र कमी पडले, हे स्पष्ट होते. पोलिस दले सक्षम असतानाही, केवळ प्रबळ इच्छाशक्तीचा अभाव हे बहुधा त्यामागील कारण असावे. ही इच्छाशक्ती पुढे चार वर्षांत पुन्हा दिसू लागली. केंद्रात आणि महाराष्ट्रात भाजपाप्रणीत सरकारे सत्तेवर आल्यानंतर नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनाचा विडा उचलला गेला आणि 'मिशन मोड'वर माओवाद निपटण्याच्या आखणीबद्ध मोहिमा सुरू झाल्या. या केवळ नक्षलविरोधातील युद्धापुरत्या मर्यादित नव्हत्या तर ज्या कमकुवत दुव्यांचा फायदा घेऊन नक्षलवादास खतपाणी मिळते, ते दुवे मजबूत करण्याची एक अभ्यासपूर्ण मोहीम होती. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या मोहिमेने वेग घेतला आणि त्याची फळे गेल्या १२ वर्षांच्या तपश्चर्येतून दिसू लागली. म्हणूनच, महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा असलेला गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त होऊन आता राज्याचा पहिल्या क्रमांकाचा जिल्हा ठरला आहे. या जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा विकास, रोजगाराच्या संधी, उद्योगस्नेही वातावरण निर्मितीसाठीचे योजनाबद्ध प्रयत्न यामुळे गडचिरोली जिल्ह्याने आता सुरक्षिततेचा निःश्वास सोडलेला असताना गेल्या १२ वर्षांच्या सामुदायिक तपश्चर्येचे फळ मिळाल्याची सुखद घोषणा संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. भारत आता माओवादापासून मुक्ततेच्या उंबरठ्यावर दाखल झाला आहे आणि नक्षली कारवायांपासून देशाला मुक्तता मिळवून देण्याच्या केंद्र सरकारच्या कटिबद्धतेला यश मिळाले आहे, अशी ग्वाही अमित शाह यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अलिकडेच दिली, तेव्हा कटिबद्धता आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यामुळे परिवर्तन शक्य होते, याची खात्री देशाला पटली आहे. यावर चित्र काढा

सुमारे ९ वर्षांपूर्वी, मे २०१७ मध्ये तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्री, मुख्य सचिव, पोलिस महासंचालक व सुरक्षा यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत देशातील माओवादी कारवायांचा आढावा घेताना, या समस्येने सर्वाधिक प्रमाणात ग्रासलेल्या ३५ जिल्ह्यांत सुरक्षेबरोबरच विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीलाही प्राधान्य देण्याची बाब अधोरेखित केली होती. जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था खिळखिळी करणे हे माओवादी कारवायांचे उद्दिष्ट असून नव्या भारताच्या निर्मितीची मोदी सरकारचा संकल्प हाणून पाडण्यासाठी विकासास विरोध करणाऱ्या माओवाद्यांच्या हिंसक कारवाया रोखण्याचा संकल्प त्यांनी या बैठकीतही बोलून दाखविला होता. बंदुकीच्या धाकाने विकास आणि लोकशाहीला झुकविण्याचे माओवाद्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ द्यायचे नाहीत, या निर्धाराचा उच्चार या बैठकीत झाला आणि केंद्र सरकार माओवादग्रस्त राज्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचा संदेशही देशाला मिळाला. त्याआधीच्या दोन दशकांत माओवाद्यांच्या हिंसाचारात देशातील १२ हजार लोकांचे बळी गेले होते. त्यापैकी तब्बल २७०० सुरक्षा कर्मचारी होते. म्हणजेच, सुरक्षा व्यवस्था खिळखिळी करण्याबरोबरच विकास योजनांना बळ देणाऱ्या रस्ते, पूल, रेल्वेमार्ग, वीज आणि दळणवळण यंत्रणांसारख्या सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे हा त्यांचा हिंसक कार्यक्रम होता. दुर्गम भागांत या सुविधा पोहोचल्या तर तेथील जनता मुख्य प्रवाहाशी जोडल्या जातील, त्यामुळे या सुविधांपासून जनता वंचित राहिली तर गरिबी आणि उपेक्षा यामुळे आपल्या कारवायांचे लक्ष्य करणे सोपे व्हावे ही माओवाद्यांची रणनीती त्यांनी अधोरेखित केली होती. मात्र, बंदुकीच्या गोळ्यांनी ही समस्या सोडविता येणार नाही व त्यासाठी 'शॉर्टकट'देखील नाही, त्यामुळे दीर्घकालीन उपाय करणारा तोडगा काढणारे समर्थ नेतृत्व आणि प्रखर इच्छाशक्ती यातूनच या समस्येवर मात करता येईल, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले होते. सरकारकडे माओवाद्यांशी सामना करण्यासाठी पुरेशी संसाधने आहेत, प्रशिक्षण आहे, पण केवळ तेवढे पुरेसे नाही, तर आखणीबद्ध प्रयत्न, या समस्येकडे पाहण्याची योग्य दृष्टी, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर, शत्रूच्या कमकुवतपणाचे नेमके आकलन या बाबी लक्षात घेऊन माओवाद निपटण्याची मोहीम येथून गतिमान झाली होती. त्याआधी २०१५ मध्ये माओवादाची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर धोरण आणि कार्यक्रम आखला गेला. सुरक्षाविषयक उपाय, विकास योजनांची आखणी व अंमलबजावणी, स्थानिक जनसमुदायांच्या सहभाग व सहकार्याच्या योजना व समस्याग्रस्त समाजाची सुविधांच्या अभावग्रस्ततेपासून मुक्तता झाली तरच या कारवायांना आळा घालणे शक्य होणार हे स्पष्ट झाले आणि या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. आज सुमारे एका तपाच्या कठोर अंमलबजावणीनंतर त्याचे परिणाम स्पष्ट झाले आणि माओवादापासून मुक्तीचा सोहळा साजरा करण्यासाठी देश सज्ज झाला. केंद्र आणि राज्य सरकारांनी आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांच्या पुनर्वसनाच्या व सुरक्षिततेच्या योजना तयार केल्या, शरणागतांना समाजाच्या प्रवाहात सामील होणे सोपे व्हावे याकरिता प्रोत्साहनपर अनुदानासारख्या योजना आखल्या गेल्या, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी मासिक पाठ्यवेतन देण्याची तरतूदही या योजनेतून करण्यात आली आणि योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता वेळोवेळी भासणाऱ्या गरजेनुसार योजनेत सुधारणा करण्यात आल्या. एका बाजूला नक्षलवाद्यांना मूळ प्रवाहात समावून घेताना, सुरक्षा यंत्रणांच्या बळकटीकरणावर जोर देण्यात येत होता. पोलिस दलांचे आधुनिकीकरण, राज्य सरकारांना शस्त्रपुरवठा, संदेशवहनाच्या अत्याधुनिक यंत्रणा, पोलिस ठाण्यांची निर्मिती, वाहने, पोलिसांकरिता घरे आदी योजनांद्वारे पोलिस दलांचे बळकटीकरण करण्याची व्यापक मोहीम राबविली गेली.

**विकासाच्या योजनांवर भर**

गेल्या सुमारे सात वर्षांत नक्षलग्रस्त क्षेत्रात ४०० हून अधिक सुरक्षा शिबिरे स्थापन झाली आहेत. माओवाद्यांच्या कारवायांना मिळणारी आर्थिक रसद हा या समस्येचा एक महत्त्वाचा पैलू ठरला आहे. माओवादी आणि त्यांचे वित्तपुरवठादार यांची साखळी मोडण्यासाठी अशा पुरवठादारांचा शोध घेण्याच्या मोहिमाही शिस्तबद्धरीतीने आखल्या गेल्या आहेत. त्यासाठी २०१६ मध्ये केंद्र सरकार आणि राज्यांच्या स्तरावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणा व मल्टी डिसिप्लिनरी ग्रुप स्थापन करण्यात आले. शिवाय समस्याग्रस्त भागांत रस्ते, दळणवळण व संपर्क साधनांचा विस्तार, आर्थिक तरतूद, शिक्षण व कौशल्य विकासाच्या योजनांवर भर देण्यात आला आणि गेल्या सहा-सात वर्षांत माओवादी कारवायांना पोखरलेल्या भागांत तब्बल १७ हजार ३१९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे जाळे उभे राहिले. ११ हजार ५०० हून अधिक मोबाईल टॉवर लागले, कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी सुमारे ५० आयटीआय संस्था स्थापन झाल्या आणि दुर्गम भागांत गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा देण्यासाठी सुमारे २६० एकलव्य निवासी शाळा स्थापन करण्यात आल्या. सहा हजारांहून अधिक टपाल कार्यालये सुरू करण्यात आली. त्यामध्ये बँकिंग सेवांचाही समावेश करण्यात आला. १३०० हून अधिक एटीएम केंद्रे कार्यान्वित झाली. या दुहेरी योजनांमुळे माओवाद्यांच्या कारवायांचे कंबरडे मोडणे शक्य झाले. २०१३ मध्ये देशातील १२६ जिल्हे माओवादी कारवायांच्या कचाट्यात होते. २०२६ मध्ये केवळ दोन जिल्ह्यांत माओवादाची धुगधुगी शिल्लक राहिली होती. गेल्या महिनाअखेरीस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत डाव्यांच्या कारवायांची चिरफाड करून त्यांचा चेहरा देशासमोर उघड केला. गेल्या १२ वर्षांच्या एका तपश्चर्येची सफल पूर्तता झाल्याचे जाहीर करताना शाह यांनी या विचारधारेच्या देशनिष्ठेवरही प्रहार केले. जी विचारधारा अन्य एखाद्या देशाच्या विचारधारेच्या प्रेरणेतून उगम पावली आहे, ती भारताच्या हिताची नाहीच, हेदेखील त्यांनी ठामपणे नमूद केले. लाल आतंकाची सावली पडल्यामुळे देशाचे दुर्गम भाग विकासापासून सतत वंचित राहिले, आता ती सावली दूर झाली आहे आणि विकासाचे पर्व सुरू झाले आहे. नक्षलमुक्त भारताचे मोदी सरकारचा संकल्प आता पूर्ण झाला आहे. हे एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण यश आहे. सशस्त्र पोलिस दलांची समर्पित सेवा, कोबरा व सीआरपीएफ जवानांची सतर्कता, राज्य पोलिस, छत्तीसगड पोलिस, डीआरजी आणि विशेषतः स्थानिक आदिवासी समाज यांच्या एकत्रित प्रयत्नांचा या यशामध्ये मोठा वाटा आहे. ज्या क्षेत्रात माओवाद्यांच्या कारवायांमुळे विकासाचे वारेदेखील पोहोचू शकत नव्हते, तेथे आता घराघरांत विकासाची फळे चाखता येतील, अशी ग्वाही शाह यांनी दिली आहे. अशा कारवायांपुढे गुडघे न टेकता त्यांना त्यांच्या कर्माची योग्य ती फळे चाखावयास मिळतील यासाठी मोदी सरकार सदैव दक्ष असेल, अशी ग्वाही देत अमित शाह यांनी माओमुक्तीच्या संकल्पपूर्तीची तारीख जाहीर केली होती. ३१ मार्च २०२६ ही केवळ एका आर्थिक वर्षाची अखेर नव्हती, तर नव्या आर्थिक उन्नतीची सुरुवात आहे, हे आता देश अनुभवत आहे. माओवादी विचारधारा या देशात कधीही स्वीकारली गेली नाही, ही विचारसरणी येथे पुरती फसली आहे, त्यामुळे अस्तित्व टिकविण्यासाठी वेगवेगळे सिद्धान्त पुढे आणण्याचा त्यांचा प्रयत्नदेखील फसला आहे. प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणेतील त्रुटींचा आधार घेऊन हिंसक कारवाया करण्याचा डाव यापुढे कधीही यशस्वी होऊ दिला जाणार नाही, असा इशाराही शाह यांनी दिला आहे. कित्येक दशकांपासून देशाला ग्रासून राहिलेल्या आणि नाही रे वर्गाला विकासापासून वंचित ठेवणाऱ्या एका वाळवीचा पुरता बंदोबस्त झाल्याने, मोदी सरकार आणि राज्य सरकारच्या या ऐतिहासिक यशाची दखल घ्यायलाच हवी.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## महापौरांना पत्र

नागपूर हे विश्वविख्यात हिंदू संघटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघ गंगोत्रीचे उगमस्थान. कै.डॉ. हेडगेवार, प.पू. श्री. गुरुजी, प.पू. बाळासाहेब देवरस यांची कर्मभूमी. प.पू. डॉ. आंबेडकरांनी याच शहरात आपल्या अनुयायांना बौद्ध दीक्षा दिली. अशा ऐतिहासिक शहराच्या सर्वोच्च सिंहासनावर आपण स्थानापन्न झालात याबद्दल त्रिवार अभिनंदन. रस्ते पाणी व वीज या कोणत्याही शहरांच्या मूलभूत समस्या असतात. त्याबद्दल बहुतांश नागरिक आपणाकडे सूचना करतात. या सूचनांचा आपल्या नगरसेवकांकडून पाठपुरावा होत असतो. त्यासोबत शिक्षण आणि आरोग्य हेही क्षेत्र महत्त्वाचे आहेत. महापालिकेद्वारे चालविला जाणाऱ्या शाळांना दर्जा फारसा चांगला नाही. काही ठिकाणी अवश्य सुधारणा झालेल्या आहेत. तेथील विद्यार्थ्यांची भाषा सुधारण्याकरिता शक्यतोवर वर्ग पाच पासून संस्कृत विषय चालू करावा. चित्रकलेवर भर द्यावा. चित्रकलेमुळे हस्ताक्षर सुधारतात. वर्ग ८ वरील विद्यार्थ्यांना अयोध्या येथील नवनिर्मित श्रीराम मंदिर, छत्रपती शिवाजी राजांकडून अफजलखानाचा वध असे चित्र काढता यायला पाहिजे. शाळांची मैदानं स्वच्छ असावी. कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या असे पारंपरिक खेळ आजच्या विद्यार्थ्यांना खेळता आली पाहिजे. शाळा प्रारंभ होण्यापूर्वी सामूहिक प्रार्थनेच्या वेळी सरस्वती स्तवन व्हायला पाहिजे. शाळा सुटण्यापूर्वी लोकमान्य टिळकांना समर्पित पद...

*'तव स्मरण संतता स्फुरणीदायी आम्हा घडो।*
*त्वदीय गुणकिर्तने ध्वनी सुरम्य कानी पडो।*
*स्वदेशहित चिंतनाविन दुजी कथा नावडो।*
*तुझ्या समची आमुची तनूही देशकार्यी पडो।*

विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून पसायदान म्हटले जावे. वाचनालयात भारत-भारतीची पुस्तके असावी. कर्नाटकातील बहुतांश शाळांमध्ये भारत-भारतीची पुस्तके लावलेली आहेत असे ऐकले आहे. प्रत्येक खोलीत सरस्वती देवीची प्रतिमा असावी. शाळांच्या प्रांगणात भिंतीच्या कडेला कडुलिंब, औषधी वनस्पती, फळाफुलांची झाडं लावावी. येत्या पावसाळ्यात हा उपक्रम राबवावा. महापालिकेच्या इस्पितळांमध्ये सायंकालीन आरोग्य सेवा असावी. सामान्यतः मोलमजुरी करणारा वर्ग सकाळीच कामाला निघून जातो. सरकारी दवाखाने सकाळपासून दुपारपर्यंत चालू असल्यामुळे हा मजूरवर्ग आरोग्य सेवेपासून वंचित राहतो. तेव्हा किमान महापालिकेद्वारे त्यांना आरोग्य सेवा मिळू शकतील.

शहरातील बसचे व्यवस्थापन महानगरपालिकाकडे आहे. जयताळा, बेसा, वडद येथून सुटणाऱ्या बसेस चक्क त्या त्या स्थानकांचा बोर्ड असतो. इतर सगळ्या बसेस गंतव्य स्थानांचा बोर्ड असतो. परंतु येथे उलट आहे. या बसेस वर तिथून सुटणाऱ्या स्थानकांची नावे असतात. परंतु त्या बसेस पुढे कुठे जातात, याची माहिती नसल्यामुळे प्रवाशांची पंचाईत होते. एकदा एक प्रवासी माटे चौकातून जयताळा लिहिलेल्या बसमध्ये चढले. परंतु तिकीट काढताना त्यांच्या असे लक्षात आणून देण्यात आले की, उपरोक्त बस बर्डीला जाते. बसेसवर फिरती नावे कशाला हवी? नागपुरात फिरती नावे असल्यामुळे धड वाचता येत नाही. तोपर्यंत बस पुढे निघून जाते. एक प्रवासी बस पकडण्यासाठी उभे होते. पिपळाफाटा ते फ्रेंड्स कॉलनी ही बस असावी तेव्हा त्यांना फाटा ते फ्रेंड्स हीच अक्षरे वाचता आली. तोपर्यंत बस पुढे निघून गेली म्हणून स्थिर नावे असावीत.

**दादा हांडेकर**/९२०९८५३६७१

## काय हरवले सांग, शोधिशी...

दिल्लीवरून शिकागोला जाणारी मध्य रात्रीची फ्लाईट मला गाठायची होती. त्यासाठी नागपूर विमानतळाकडे निघालो होतो. अमरावतीच्या इतवारी भागातील गर्दी टाळायला म्हणून चालकाने कार गाडगेनगर रस्त्याकडे वळवली आणि मला महाविद्यालयीन काळातले दिवस आठवायला लागले.



टोलेजंग इमारतींनी व्यापलेल्या भागात तेव्हा शेती होती. विदर्भ महाविद्यालयाच्या गेटपाशी कार येताच थांबविली. काळ्या पाषाणाची बुलंद इमारत समोर होती. रविवार असल्याने शुकशुकाट होता. गार्डनला वळसा घालून जाणारे दोन रस्ते होते. डावीकडच्या रस्त्याने निघालो. गार्डनच्या कंपाऊंड जवळच्या कोपऱ्यावर थबकलो. वाटलं, आता तास संपल्याची बेल होईल... हा कॉर्नर म्हणजे सौंदर्य न्याहाळण्याची आमची जागा होती. थोडं पुढे पार्चजवळ आलो. टाळ्यांचा कडकडाट कानात गुंजायला लागला... कानावर संगीताचे स्वर यायला लागले... आमच्या अभ्यासक्रमात कविवर्य तांब्यांची समग्र कविता होती. तांब्यांच्या कवितांवर स्पर्धकाने लिहायचं आणि या कार्यक्रमात ते वाचून दाखवायचं. मी 'कळा ज्या लागल्या जीवा' या तांब्याच्या अजरामर कवितेवर स्वतंत्र समीक्षा लेख लिहिला होता. आयुष्यात संगीताच्या अनेक मैफिलींना गेलो. अनेकांना भेटलो, पण मला अनेकदा प्रश्न पडतो, ईश्वरीय अलौकिकत्व लाभलेले कलावंत क्षणिक मोहात का अडकतात? अस्वस्थ मनाने पुढे सरकलो. त्या काळात असलेल्या प्राध्यापक विश्राम कक्षाच्या बाजूला कॉमनरूम होती आणि त्याच्यासमोरच्या त्रिकोणी आकाराचा जागेत होता चाफा... चाफ्याला निरखत राहिलो...सहा वर्षांच्या कालावधीतले असंख्य प्रसंग पिंगा घालायला लागले. वेळ मिळेल तेव्हा चाफ्यासमोरच्या पायऱ्यांवर येऊन बसायचो. चाफ्याच्या बुंध्याशी उंचवटा केला होता. कसाबसा त्यावर चढलो. चाफ्यावरून हळुवारपणे हात फिरवायला लागलो. तो स्पर्श त्यालाही जाणवला असावा... का कोण जाणे, पण माझ्या डोळ्यातून अश्रू वाहायला लागले. आवेगाने त्याला कवटाळलं.. त्याचा बुंध्यावर डोकं टेकवलं. डोळे मिटले गेले...

किती वेळ गेला देव जाणे.. कसल्याशा आवाजाने मी भानावर आलो... चालक मला हाका देत होता. ताफ्याला कवटाळून अश्रू गाळणाऱ्या मला बघून तो घाबरून गेला होता. "सर काय झालं? केव्हाचा शोधतोय तुम्हाला." मी डोळे पुसले. चाफ्यावरून हळुवार हात फिरवला आणि बाहेर पडलो. कार नागपूर विमानतळाच्या दिशेने धावत होती...

**डॉ. सुभाष गढीकर**/९८५०८२४५९०

## आला वसंत...

किती तयारी करतो निसर्ग ऋतुबदलाची! होळीनंतर सुरू झालेली पानगळती चैत्रातच पूर्ण होते. रामजन्माच्या वेळी हे वृक्षराज सावली देण्यासाठी थंडावा देण्यास सिद्ध होतात. उन्हाळ्यात बाष्पीभवन होणारी पाने आपल्यावर मायेची थंड सावली धरतात. आजोबांनी लावलेल्या झाडाच्या छायेत नातवंड खेळतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत वाडीतील आंब्याच्या झाडाला, निंबाच्या झाडाला झोका बांधायचा अन् उंच झोका घ्यायचा. चैत्रातलं ऊन असो की वैशाखातला वणवा, भान कुठे असते खेळताना! झाडाची सावली, सावलीतील झोका, झोक्याने अंगाला थंडावा देणारी हवा, त्यातच सुकणारा घाम. मज्जाच मज्जा! अंगातील शक्ती अशी खेळण्यात कामी येई. कधी ऊन लागलं तर आजी गुळाचे पाणी, गाठीचे पाणी, टरबूज-खरबुजांच्या फोडी देई. ज्वारीच्या धांड्याचा बैल अन् बैलबंडी बनवणे हा सुट्टीतील एक विशेष खेळ होता. वाळलेल्या चिंचातील चिंचोका काढून त्याने 'चवकट' (चौपट) खेळणे मजेशीर असे. शेतात जाणे, उन्हाळी पिकांना देण्यात येणाऱ्या पाण्यात खेळणे नित्यक्रम असे. विहिरीत वरून उड्या मारून पोहणे शिकणे सर्वमान्य होते. विहिरीच्या बाजूने मोठ्या झाडांची दाट सावली शीतलता प्रदान करायची. अशा आज मात्र केवळ गोड आठवणीच राहिल्यात. कारण सुधारणेच्या नावाने झाडांची होणारी कत्तल दिवसानुगणीक वाढते आहे. हे कुठंतरी थांबावं असं नाही का वाटत?

**डॉ. उज्ज्वला देशमुख**/९४२२८०७२४७

## 'तरुण भारत'ने माझ्यातला लेखक घडवला

१९ मार्च २०२६ रोजी नागपूरच्या प्रसिद्ध दैनिकाला १०० वर्षे पूर्ण झाली. ही गोष्ट तरुण भारत दैनिकासाठी आणि नरकेसरी प्रकाशनासाठी जशी अभिमानास्पद आहे तशीच ती नागपूर शहरासाठी आणि विदर्भासाठीही आहे. इतक्या वर्षांच्या वाटचालीमध्ये अनेक अडचणींना तोंड देत संस्था व दैनिक तरुण भारत समर्थपणे उभे आहे.

माझ्या विद्यार्थिदशेपासून तरुण भारतचा वाचक म्हणून माझा संबंध होता. त्यातील बातम्या, संपादकीय, विचारप्रवर्तक लेख, पुरवण्यांमधील माहितीपूर्ण लेख, दिवाळी अंक या सगळ्यांशी एक वाचक म्हणून माझा दृढ संबंध होता. तरुण भारताने जसे वाचक घडवले तसे लेखकही घडवले आहेत. खरं तर वाचकांच्या व लेखकांच्या कित्येक पिढ्या तरुण भारताने घडवल्या आहेत.

मी व्यवसायाने डॉक्टर, बालरोग तज्ज्ञ. १९६४ साली नागपुरात तीन किंवा चार बालरोग तज्ज्ञ होते. ते सगळे माझ्या आधीच्या पिढीचे. त्या काळात बालरोग तज्ज्ञ म्हणून पदविका नागपुरात नवीनच सुरू झाली होती. १९६३ साली पहिली बॅच आणि माझी दुसरी शेती योगायोगाने मला संधी मिळाली आणि पदविकेचे प्रमाणपत्र हाती आल्यानंतर सहा महिन्याच्या आत प्रॅक्टिस सुरू झाली. डॉ. कमलताई जोशी यांच्या सूतिकागृहातच एका खोलीत पेशंट बघायला आणि प्रसंगी अत्यवस्थ बालरुग्ण भरती करायला मी सुरुवात केली.

आर.एच.ओ. निगेटिव्ह हा रक्तगट असलेल्या एका स्त्री रुग्णाची प्रसूती झाली. बाळाचं वजन दोन किलो होतं. दुसऱ्या किंवा तिथल्या दिवशी बाळाचे डोळे व कातडी पिवळसर दिसू लागली. रक्त तपासल्यावर त्या मुलीचा (नवजात बालिकेचा) रक्तगट ORh+ve निघाला. पिवळेपणाचं कारण कळलं आणि त्याचं गांभीर्य पण कळलं. बाळाचा जीव वाचवायचा असेल तर बाळाला हे रक्तगट असलेलं रक्त देणं आवश्यक होतं. इंग्लिशमध्ये एक्सचेंज ट्रान्सफ्यूजन (बदली रक्ताधान असं मराठी नाव) म्हणतात. यात दूषित रक्त काढून घ्यायचं आणि सदर रक्त तेवढ्याच प्रमाणात बाळाला द्यायचं. १२ तासात धावपळ करून या ग्रुपचा रक्तदाता पकडून रक्तपेढीत ते रक्त संकलित करून रात्री १० ते २ या काळात ते रक्ताधन पार पडलं. बाळाच्या तब्येतीत लगेच फरक पडला व बाळ वाचलं. त्या काळात हा प्रकार एक अप्रुपच होतं. लगेच कानोकानी बातमी पसरली. माझे काका मधुकर हुद्दार यांच्या कानावर बातमी गेली आणि ते मुद्दाम भेटायला आले. त्यांनी वर्तमानपत्रात बातमी देण्यासाठी सुचवलं. आमच्या डॉक्टरांच्या संहितेत असं वर्तमानपत्रात बातमी देणं बसत नाही म्हणून मी नकार दिला. त्यांनी प्रसिद्धी म्हणून न देता माहितीपूर्ण लेख द्यायला सुचवलं. मी लेख लिहिला व काकांना दिला. काका तरुण भारतात नियमित लेखन करीत असत. त्यांनी तो लेख कुमारील भागवत यांना दाखवला. ते तरुण भारतात आरोग्य विभागाचे संपादक होते. त्यांना तो लेख आवडला आणि त्यांनी दुसऱ्या दिवशीच प्रसिद्ध केला. त्यावर वाचकांच्या प्रतिक्रिया आल्या. कुमारील भागवत मला मुद्दाम भेटायला आले आणि त्यांनी मला आरोग्यविषयक लेख नियमित लिहिण्यासाठी सुचवलं आणि दर आठवड्याला माझे लेख प्रसिद्ध होऊ लागले आणि माझ्यातला लेखक जन्माला आला. यानंतर विविध आरोग्य समस्यावर माझे अनेक लेखमाला प्रसिद्ध झाल्या. जवळजवळ सगळ्या वर्तमानपत्रात विविध विषयांवर लेखमाला लिहिल्या गेल्या. पुस्तकं प्रसिद्ध झाली. काही वर्षांनी तरुण भारताच्या दिवाळी अंकाच्या प्रकाशनासाठी मला आमंत्रण देण्यात आलं. त्यावेळी लक्ष्मणराव जोशी हे संपादक होते. त्या कार्यक्रमात माझा परिचय देताना लक्ष्मणराव जोशी यांनी डॉ. श्रीकांत चोरघडे हे नागपुरातील सुप्रसिद्ध लेखक अशी माझी ओळख करून दिली. आज तरुण भारताला १०० वर्षे पूर्ण झाली. हे कळल्यावर मला सुचलेले विचार मला शब्दबद्ध करावेसे वाटले म्हणून हा लेखन प्रपंच.

**- डॉ. श्रीकांत चोरघडे**, नागपूर

# राष्ट्रसंतांची पत्रकारिता

**वंदनीय राष्ट्रसंतांच्या प्रेरणेने ५ एप्रिल १९४३ रोजी चैत्र-शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या शुभ मुहूर्तावर 'श्रीगुरुदेव' या मासिक पत्राचे प्रकाशन सुरू झाले. लोकशिक्षण, लोकजागृती, लोकोद्धार ही उद्दिष्टे उराशी बाळगून भारताची आध्यात्मिक परंपरा ग्रामोद्धार समाजोद्धार व राष्ट्रोद्धारासाठी वंदनीय महाराजांनी पत्रकारितेचे माध्यम अंगीकारले.**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे ४ एप्रिल १९३५ रोजी चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या सुमुहूर्तावर श्रीगुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. सगळ्यांना सोबत घेऊन संपूर्ण समाजाला एका धाग्यात बांधणे व त्यातून राष्ट्रप्रेम, एकता व मानवतेचा जागर करणे हे उद्दिष्ट होते. वंदनीय राष्ट्रसंतांना समाजातील अनावश्यक रुढी व कुरीतींपासून सामान्य जनतेला मुक्त करून तसेच त्यांचे ठिकाणी स्वत्वाची जाणीव करून देऊन राष्ट्रप्रेमाकडे प्रवृत्त करावयाचे होते. स्वदेश व स्वधर्म याची योग्य जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करावयाची होती. भारतातील बहुसंख्य जनता ही खेड्यातून व गावातून राहते. तेव्हा गाव हाच खरा देशाचा आत्मा आहे, असे मानून वंदनीय महाराजांनी आपले कार्य ग्रामापासून सुरू केले. त्यांनी केलेले चिंतन हीच 'ग्रामगीता' होय.

'श्रीगुरुदेव' हे नामपद आध्यात्मिक भूमिकेचे द्योतक आहे. ब्रह्मलीन संत श्री आडकुजी महाराज (भूवैकुंठ श्रीक्षेत्र वरखेड) हे वंदनीय महाराजांचे आध्यात्मिक गुरू होते. समाजकार्यासाठी 'सेवा' हेच साधन असते. 'सेवा' हे पद इथे त्या अर्थाने सयुक्तिक आहे. अशा या उदात्त विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी वृत्तपत्रादि माध्यमांची नितांत आवश्यकता असते, हे वंदनीय महाराज जाणून होते. वंदनीय महाराजांनी ज्यावेळेस श्रीगुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली, त्यावेळी त्यांच्या प्रभावळीत सुदामजी सावरकर, अं. वा. नवाडे, तुकारामाजी गीताचार्य, रघुनाथराव पत्तरकिने, देवदास वराडपांडे, डी. जी. निकम इत्यादी निष्ठावंत मंडळी होती. गुणग्राहकता हा वंदनीय महाराजांचा विशेष गुण होता. आपल्या निष्ठावंत सहकाऱ्यांमधील काही साहित्यिक प्रतिभावंतांना प्रेरणा देऊन वंदनीय महाराजांनी आपल्या संकल्पित कार्याच्या सुदृढ अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून वृत्तपत्रसृष्टीची कास धरली.



**'श्रीगुरुदेव' मासिकाचे अवतरण**

वंदनीय राष्ट्रसंतांच्या प्रेरणेने ५ एप्रिल १९४३ रोजी, चैत्र-शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) या शुभ मुहूर्तावर 'श्रीगुरुदेव' या मासिक पत्राचे प्रकाशन सुरू झाले. लोकशिक्षण, लोकजागृती, लोकोद्धार ही उद्दिष्टे उराशी बाळगून भारताची आध्यात्मिक परंपरा ग्रामोद्धार समाजोद्धार व राष्ट्रोद्धारासाठी वंदनीय महाराजांनी पत्रकारितेचे माध्यम अंगीकारले. या अद्वितीय मासिक पत्रिकेचे आद्य संपादक होते अं. वा. नवाडे. वंदनीय महाराजांनी 'श्रीगुरुदेवा'च्या या स्थापनान्कात प्रारंभी जे 'निवेदन' दिले आहे ते महाराजांना अभिप्रेत असलेल्या पत्रकारितेचे शाश्वत मूल्य सांगणारे आहे. वंदनीय महाराज म्हणतात- 'तेव्हा आजच्या, आमच्या धर्म मानणाऱ्या समाजाची उगीच भूल होऊन त्यांचा उन्नती मार्ग आंधळ्याप्रमाणे 'इधर ना उधर' असा होऊ नये म्हणून, माझी या विश्वातील सर्व सज्जनांना सविनय विनंती आहे की, त्यांनी आपापल्या संप्रदायांतील लोकांत व्यापलेल्या रुढींचा काळोख काढून त्यांना अध्यात्मकारणात आपल्या संसार व परमार्थाची अभेदरूप जोड बसविण्याचा मार्ग निर्लोभपणे सांगावा. याच दृष्टीने लेखरूपाने जनताजनार्दनाची सेवा करावी, एवढीच माझी त्या थोर संतमहंतांना व विद्वानांना नम्र प्रार्थना आहे. एवढ्याचकरिता हा 'श्रीगुरुदेव' मासिकाचा उपक्रम अत्यंत महागाईच्या वेळी वाटेल तसा प्रयत्न करून सुरू केला आहे.' - तुकड्यादास (श्रीगुरुदेव वर्ष १ अंक १ पृ. ४)

वंदनीय महाराजांच्या या आंतरिक विचारांची समर्थ अभिव्यक्ती अं. वा. नवाडे यांनी 'श्रीगुरुदेव'चे अवतारकार्य हे प्रथम संपादकीय लिहून साधली आहे. या अत्यंत समर्पक व सूचक संपादकीयात ते म्हणतात- 'मानवी प्राण्यावर आलेल्या आपत्तीच्या काळी मानवी प्राण्याचे साहस कर्तबगारी याशिवाय त्यास परमेश्वराच्या आश्रयाची आवश्यकता असते. 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचें। परि तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे॥' या समर्थ उक्तीनुसार मनुष्याचे साहस, कर्तबगारी, परमेश्वराच्या आश्रयावर अधिष्ठित असण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकीच त्यासाठी सद्‌भक्ती प्रचाराची जरूरी आहे. अंधश्रद्धा बुवाबाजी तसेच नास्तिकता नष्ट करून जनतेत सद्‌भक्ती नि खऱ्या धर्माचा प्रचार नि प्रसार करण्याकरिता म्हणजेच जनतेला सद्‌भक्ती नि सद्धर्मप्रवण करण्यासाठी वाहून घेणाऱ्या 'श्रीगुरुदेव'सारख्या मासिकाची आजच्या भारताला अत्यंत जरूरी आहे, या विषयी दुमत होईलसे वाटत नाही. श्रीगुरुदेवाच्या कृपेने 'श्रीगुरुदेव' मासिक ही उणीव भरून काढील अशी संचालकांची व आमची अपेक्षा आहे.' (तत्रस्थ पृ. ६) संपादकीयातील ही भावनाच 'श्रीगुरुदेव'चे अन्य नियतकालिक वाङ्मयापेक्षा 'एवंगुणविशेषण' स्पष्ट करते, असे म्हणणे वावगे ठरू नये.

'श्रीगुरुदेव' मासिक सुरू झाल्यानंतर सहा वर्षाने श्रीगुरुदेव सेवा मंडळाने 'श्रीगुरुदेवसेवक' हे नवे पाक्षिकपत्र सुरू केले. १० जुलै १९४९ (रविवार, आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८७१) रोजी गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर या पाक्षिकाचा प्रथमांक प्रकाशित झाला. वंदनीय महाराजांनी आपले निकटवर्तीय व निष्ठावंत रघुनाथराव पत्तरकिने यांना या नवीन पाक्षिकाचे संपादकपद सोपविले. 'श्रीगुरुदेव' मासिक वंदनीय महाराजांच्या विचारांचे समर्थ वाहक असताना 'श्रीगुरुदेवसेवक' हे नवीन पाक्षिक वृत्तपत्र काढण्याची वंदनीय महाराजांना आवश्यकता का पडली हा प्रश्न श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना व चाहत्यांना पडणे स्वाभाविकच होते. खुद्द वंदनीय महाराजांनीच्या विचारसंभ्रमाला वाचा फोडली. श्रीगुरुदेव सेवकाच्या प्रथमांकात वंदनीय महाराज लिहितात- 'सध्या वर्तमानपत्राचा ओघ बहुधा राजकारणाकडे तर माझा सेवाभाव निर्माण करण्याकडे वाहात आहे. केवळ कायद्याने राज्य स्थापना करावयाचे ऐवजी मला सेवेने राजकारणाचे महत्त्व पटवून द्यावयाचे आहे आणि या करताच 'श्रीगुरुदेवसेवक' विचारपत्राला मला चालना देणे भाग पडले आहे. यात वितंडवादाचे व गढूळ राजकारणाचे वारे मी भरू देणार नाही, याबद्दल जनतेने विश्वास बाळगावा. मानवजातीच्या कल्याणाकरिता जे जे आवश्यक असेल त्या त्या मंगल कार्याची मी या पत्राद्वारे सेवा करील. ईश्वराजवळ माझी एवढीच प्रार्थना आहे की, माझी ही सेवा आपल्या दासांना आवडून द्यावी.' - तुकड्यादास (श्रीगुरुदेवसेवक वर्ष १ अंक १ पृ.२)

यावरून हे स्पष्ट होते की, महाराजांनी 'श्रीगुरुदेव' मासिकातून आपल्या ध्येयांची, विचारांची दार्शनिक भूमिका जरी मांडली असली, तरी याच्या क्रियान्वयतेसाठी स्वतंत्र वृत्तपत्राची आवश्यकता त्यांना भासू लागली होती. वंदनीय महाराजांचा हा विचार त्यांचे निष्ठावंत, अंतरंग उद्‌गाते साहित्यिक हृदयाचे व विशुद्ध मनाचे सुदामजी सावरकर यांनी अत्यंत प्रासादिक शैलीत मांडला आहे.

आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीसाठी पत्रकारिता हे आधुनिक माध्यम म्हणून जरी वंदनीय महाराजांनी स्वीकारले असले, तरी समाजातील दोष दूर करून उदात्त तत्त्वांची समाजामध्ये जागृती करून निकोप व समर्थ समाज घडविण्याची जी दार्शनिक दृष्टी वंदनीय महाराजांची होती त्याची मीमांसा व उपयोजन या दोनही पैलूंचे कसे परिपोजण होईल, याबद्दल वंदनीय महाराज अत्यंत दक्ष असत. या दृष्टीने वंदनीय राष्ट्रसंतांची पत्रकारिता लक्षणीय होती.

**- न. र. पत्तरकिने**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### वृत्तपत्र लेखक मंचच्या अध्यक्षपदी फैय्याज शेख; कार्यवाहपदी अरुण धुमाळ




**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

सोलापूर वृत्तपत्र लेखक मंचच्या अध्यक्षपदी फैय्याज शेख यांची, तर कार्यवाह पदी अरुण धुमाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ज्येष्ठ पत्रलेखक अशोक खानापुरे यांच्या अध्यक्षतेखाली सहा पदाधिकाऱ्यांची, पुढील एक वर्षासाठी एकमताने निवड करण्यात आली.

**लेखक मंचचे अन्य पदाधिकारी**

मयुरेश कुलकर्णी (उपाध्यक्ष), प्रा. धनंजय शहा(सहकार्यवाह), रामकृष्ण आघोर (कार्याध्यक्ष), प्रा. अशोक म्हमाणे (कोषाध्यक्ष) कार्यकारिणी सदस्य:- श्रीवल्लभ करकमकर, अशोक खानापुरे, सुनील पुजारी, प्रेमचंद मेने, विठ्ठल वठारे, मल्लिनाथ किणगी, डॉ.रामचंद्र धर्मसाले, रंगसिध्द कोरे, प्रसिद्धी प्रा.गणेश लेंगरे, प्राजली मोहीकर, वरील सर्वांचे प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, अरविंद जोशी, पद्माकर कुलकर्णी आणि अवधूत म्हमाणे यांनी अभिनंदन केले.



### जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ जिल्हाध्यक्षपदी सैदप्पा जंगडेकर

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ जिल्हाध्यक्षपदी सैदप्पा जंगडेकर यांची निवड झाली. त्याबद्दल त्यांचा सत्कार राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सूर्यकांत शेरखाने, हनमंतू सायबोळू, एम.डी.बिराजदार, सुरेश कुंभार, ज्ञानेश्वर सोनवणे, पुरुषोत्तम श्रीगादी, प्रवीण वाडे, रामप्रसाद शागालोलू व शक्ती कटकधोंड आदी उपस्थित होते.

### जय भारत शाळेत महेश कोठे यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

जय भारत प्राथमिक शाळेत माजी महापौर महेश कोठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन सिद्राम फुले गुरुजी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य मारुती माळगे, सचिव दिपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन गाटे यांनी केले तर आभार लेंगटे यांनी मानले.

# पोलिस असल्याची बतावणी करुन कर्नाटकातील व्यापाऱ्यास लुटले

## मंगळवेढा-मरवडे मार्गावरील घटना; गाडीतील दीड लाख रुपये घेऊन पोबारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.४ एप्रिल-**

मंगळवेढा-मरवडे मार्गावर तळसंगी हद्दीत कासेगाव येथे द्राक्ष खरेदी करण्यास निघालेल्या कर्नाटकातील व्यापाऱ्याची पिकअप गाडी रात्रीच्या वेळी अडवून मी पोलीस आहे तुम्ही गांजा व दारु घेवून कुठे चालला? गाडी चेक करायची आहे, अशी बतावणी करुन त्यांच्या गाडीतील १ लाख ४५ हजार रुपये घेवून पोबारा केल्याप्रकरणी अज्ञात चौघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी देवाप्पा मुनमुटगी (वय ३२ वर्षे, रा.कर्नाटक) यांचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय असून ते महिंद्र पिकअप (गाडी क्रमांक के.ए.३३ बी.४७८५) ही गाडी घेवून३ एप्रिल रोजी ८.३० वाजता फिर्यादीसह चंद्रशेखर कोडेकल, तिपाण्णा चावलकर (रा.सुरपूर कर्नाटक) आदीजण द्राक्ष खरेदी करण्यासाठी कासेगाव (ता. पंढरपूर) येथे जात असताना मरवडे-मंगळवेढा मार्गावरील तळसंगी हद्दीत पिकअप आल्यावर पाठीमागून दोन मोटार सायकलीवर चौघेजण येवून गाडी थांबविण्यास सांगीतले. तुम्ही गांजा व दारु घेवून कुठे चालला असून आम्ही पोलीस आहोत, गाडी चेक करायची असून गाडीतून खाली या असे म्हणाल्यावर गाडीतील तिघेजण खाली उतरले, त्यावेळी त्यांच्या खिशात ठेवलेले १ लाख ४५ हजार रुपये ही रक्कम चेक करुन गाडीच्या डॅशबोर्ड मध्ये ठेवण्यास सांगीतले. तद्नंतर डॅशबोर्ड मध्ये ठेवलेले आम्हाला दिसून आले नाहीत, आमची रक्कम अज्ञात चौघांनी घेवून फरार झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### खाकी वर्दीचा वचक संपतोय

दरम्यान मागील काही महिन्यापुर्वी मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवर सायंकाळी ५ वाजता फिरायला गेलेल्या दोन महिलांना आम्ही पोलीस आहोत, अशी बतावणी करुन त्यांच्या अंगावरील दागीने लुटून नेण्याचा प्रकार घडला होता. त्याचा तपास अद्याप लागला नसतानाच पोलीस असल्याची बतावणी करुन पुन्हा वाटसरुंना लुटल्याचा प्रकार घडल्याने नागरिकामधून दहशत पसरली आहे. अशा घडणाऱ्या वारंवार घटनांमुळे मंगळवेढयातील खाकी वर्दीचा वचक संपतोय की काय असा संशय जनतेमधून व्यक्त होत आहे.



## रविवारी १९ एप्रिलला एकच मिरवणूक काढावी

### छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानची मागणी

**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठानच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची परंपरे प्रमाणे रविवारी १९ एप्रिल रोजी एकच मिरवणूक व्हावी यासाठी पोलिस आयुक्त यांनी दोन्ही मध्यवर्तीची संयुक्त बैठक घेऊन त्यांच्या समस्या ऐकून त्याचे निराकरण करुन एक मिरवणूक करण्यासाठी तयार करावे आशयाचे निवेदन पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले.

ॲड. लौकिक इंगळे व नागेश इंगळे या दोन्ही मध्यवर्तींच्या अध्यक्षांना कार्यकाळात एक मिरवणूकीच्या पंरपरेला छेद देत दोन मिरवणूका होवू नये यासाठी दोघांनी आपल्या विश्वस्तांना बोलून एक मिरवणूक करण्यासाठी तयार करावे असे निवेदन देण्यात आले. यावेळी संस्थापक देवा उघडे, अध्यक्ष आकाश इंगळे, सचिव कांत उघडे, राज सुरते, ॲड. अजय रणशृगारे, सचिन वाघमारे, राज भोसले, शिलवंत काळे, युवराज बडेकर, शिल भोसले, मुरत निकंबे, शिलरत्न दुड्डे, मिनाज शेख, अतिश वाघमारे, आनंद माने, महेंद्र कांबळे, रोहन बनसोडे, विरसेन जाधव, दयानंद गायकवाड, आंनद माने, विशाल शेवाळे व कार्यकर्ते उपस्थित होते.



## उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांचा विविध विकासकामांचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ एप्रिल-**

अकलूज नगरपरिषदेचे गटनेते तथा उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी शहरातील प्रभाग क्रमांक २, ४ आणि ५ मधील विविध विकासकामांचा आढावा घेत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, मोहसीन शेख, सचिन देशमुख, प्रियांका गायकवाड तसेच लालसाहेब अडगळे, संजय पाडोळे आदी उपस्थित होते.

या दौऱ्यात त्यांनी शनि मंदिरासमोरील बागबगीच्याच्या सुशोभीकरणाच्या कामाची पाहणी केली. यावेळी नागरिकांच्या सूचना जाणून घेत, काम उच्च दर्जाचे व्हावे यासाठी संबंधित ठेकेदारांना स्पष्ट सूचना दिल्या. तसेच अकलाई मंदिर ते शिवसृष्टी किल्ला पुलापर्यंत सुरू असलेल्या कामाची पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. याशिवाय अकलाई घाट येथे सुरू असलेल्या दशक्रिया विधी स्थळाच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला व संबंधित अधिकारी व ठेकेदारांना योग्य त्या सूचना केल्या.

**एकहाती सत्तेनंतर प्रशासनाला गती**

अकलूज नगरपरिषदेवर एकहाती सत्ता मिळवल्यानंतर शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक आता 'ॲक्शन मोड'मध्ये आल्याचे दिसत आहे. शहरातील सुरू असलेल्या विकासकामांना गती देताना, नागरिकांच्या अडचणी

## विश्वबंधुत्वासाठी अखंड नाम जप समितीची स्थापना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

विश्वशांती, विश्व कल्याण व विश्व बंधुत्वासाठी अखंड नामजप समितीची स्थापना गुरुकुल कॉम्प्युटरचे संचालक सचिन चौधरी व रोहिणी चौधरी यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी अखंड नाम जप समितीच्या नाम फलकाचे पूजन व उद्घाटन करून श्री स्वामी समर्थांचे आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवर व महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी गुरुवर्य विष्णू कारमपुरी, रामचंद्र जन्नु , पत्रकार प्रसाद जगताप, वेधशास्त्री वेणुगोपाल जिल्ला, श्रीनिवास जिल्ला संजय भुमकर , श्रीनिवास चिलवेरी , डॉ. अन्वर रोडगीकर, यल्लमा देवी मंदिर पुजारी राहुल गौडा व रेखा आडखी, नरेश सब्बन, सिद्धाराम काटवे, सविता दासरी, लक्ष्मीबाई कोनापुरे, रेखाताई अडकी, गुरुनाथ कोळी, पद्माम मॅकल, लक्ष्मी बाई कोनापुरे, लक्ष्मी येमुल, राणी दासरी, व्यंकटेश पासकंटी, अशोक पवार, शुभम कारमपुरी, पप्पू शेख आदी उपस्थित होते.

## ध्यानातून मिळणारी आत्मशांतीच शाश्वत: मुनीश्री वीरसागर महाराज

### श्राविका संस्थेत ध्यान शिबिर संपन्न; श्रावक-श्राविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल -**

''बाह्य जगातील सुखे ही क्षणभंगुर आहेत, मात्र ध्यानातून मिळणारी आत्मशांती ही कायम स्वरूपी असते. ध्यान म्हणजे केवळ डोळे मिटून बसणे नव्हे, तर ती मनाची शुद्धी आणि आत्म्याशी एकरूप होण्याची प्रक्रिया आहे,'' असे प्रतिपादन पूज्य १०८ मुनीश्री वीरसागर महाराज यांनी केले.

शनिवारी येथील श्राविका संस्था येथे मुनीश्रींच्या मंगल सान्निध्यात ध्यान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात शिक्षक, कर्मचारी आणि सकल जैन समाजातील श्रावक-श्राविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. मार्गदर्शन करताना मुनीश्री पुढे म्हणाले की, मनात येणारे वाईट विचार, क्रोध, लोभ आणि मोह यांपासून दूर राहून शांत, संयमी व जागरूक राहणे हेच खरे ध्यान आहे. नियमित ध्यानामुळे मन स्थिर होऊन निर्णयक्षमता वाढते आणि जीवनात सकारात्मक बदल घडतो. प्रत्येकाने आत्मकल्याणासाठी दैनंदिन जीवनात थोडा वेळ स्वतःसाठी काढून ध्यानधारणा करणे आवश्यक आहे. यावेळी त्यांनी अहिंसा, सत्य आणि संयम या त्रिसूत्रीवर चालण्याचा संदेश दिला.

या शिबिरास श्राविका संस्थेच्या सचिव देवई शहा, वरिष्ठ सदस्या दीप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहळे, राखी देशमाने, स्वाती कांबळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक पोळ सर यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान उपस्थितांनी मन:शांतीचा अनुभव घेत ही एक आध्यात्मिक ऊर्जा देणारी पर्वणी असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषभ सोनटक्के यांनी केले. प्रगती गांधी आणि मयुरी सोनटक्के यांनी गुरुवंदना सादर केली, तर ऑनलाइन माध्यमातून आलेल्या शंकांचे वाचन पराग शहा यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सुकुमार वारे, अनुप कस्तुरे, प्रवीण शहा, प्रदीप डेरे, रोहन शहा, सुरज व्हसाळे, सुहास छचुरे, अरिहंत माणिकशेट्टी, अभिनंदन उपाध्ये, अभिजीत पाटील, अनंत बेळ्ळे, प्रवीण कंदले आदींनी परिश्रम घेतले.

भविष्यातही अशा आध्यात्मिक शिबिरांचे आयोजन व्हावे, अशी इच्छा उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली.

## दुचाकी वाहन रॅली काढत भगवान महावीर जन्मकल्याणक प्रभावना महोत्सव साजरा




**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.४ एप्रिल-**

जैन समाज बांधव व भगिनींनी शहरातुन दुचाकीची रॅली काढत भगवान महावीर जन्मकल्याणक प्रभावना महोत्सवास सुरुवात झाली.

येथील रत्नाई टाउनशीपच्या प्रांगणात श्री सन्मती सेवा दल व अकलूज सकल जैन समाज यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई, पुणे, सोलापूर, सातारा, धाराशिव,अहिल्यानगर व बीड या सात जिल्ह्यांतील जैन समाजाचा भगवान महावीर यांचा २६२५ व्या जन्मकल्याणक प्रभावना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी जैन समाज बांधव व भगिनींनी दुचाकी रॅली काढली. याचा शुभारंभ उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, इशिता मोहिते पाटील यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी इंद्रराज दोशी, सतिश व्होरा, मिहीर गांधी, तेजस गांधी, सत्यजित दोशी, निनाद चंकेश्वरा आदी उपस्थित होते.

रत्नाई टाउनशिप येथुन निघालेली रॅली महावीर पथ, गांधी चौक, आझाद चौक, प्रतापसिंह चौक, नविन बसस्थानक, सदुभाऊ चौक,महावीर स्तंभमार्गे रत्नाई टाउनशीप येथे रॅलीची सांगता झाली. सायंकाळी जन्मकल्याणक प्रभावना महोत्सवाच्या मंडपाचे उदघाटन डॉ. सतिश दोशी कुटुंबियांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आचार्य विनम्र सागर महाराज यांचे धर्म प्रभावाना प्रवचन होऊन मंगल आरती आरती करण्यात आली. यावेळी जीनसेन भट्टरक नांदती यांचा २८वा वाढदिवस साजरा करुन सांस्कृतिक कार्यक्रमाने समारोप झाला. जितेंद्र प्रदीप गांधी यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला.

### घरगुती गॅसधारकांची पिळवणूक थांबवा

**सोलापर :** घरगुती गॅस धारकांना गॅस मिळण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत आणि प्रशासन व गॅस वितरकाकडून पिळवणूक होत आहे. ती होणारी अडचण व पिळवणूक थांबवा. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

Classifieds

**विकणे आहे**

**दुकान गाळा विक्री / भाड्याने देणे आहे. २२० स्क्वेअर फूट, निर्मिती लँडमार्क इंदिरा नगर, पोस्ट ऑफिसजवळ, रामलिंग नगर, विजापूर रोड, संपर्क - ९४२०५४४६४४**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.४ एप्रिल -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका २५ वर्षीय विवाहित महिलेच्या रात्री घरात घुसून 'तू मुला खूप आवडतेस,' असे म्हणून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले. पोलीसात तक्रार दिल्यास तुला सोडणार नाही, अशी धमकी दिल्या प्रकरणी संजय जकाप्पा पुजारी याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी तथा पिडीता ही ३ एप्रिल रोजी रात्री १० वाजता तिच्या तीन मुलासह घरात झोपली असताना आरोपीने घरी येवून घराचा दरवाजा वाजवला तेव्हा फिर्यादीने कोण आहे हे पाहण्यासाठी दरवाजा उघडला असता आरोपीने फिर्यादीचा हात धरुन तू मला खूप आवडतेस असे म्हणून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले. तू माझे विरुध्द तक्रार दिली तर तुला सोडणार नाही अशी धमकी देवून शिवीगाळी,दमदाटी केली. यावेळी पिडीता मोठ्याने ओरडू लागली असता पिडीतीची मुले जागी झाल्यावर आरोपीने तेथून धूम ठोकली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस अंमलदार राऊत हे करीत आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि धाराशिव सब डि व तालुका परांडा पैकी परांडा म्यु. पल हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि धाराशिव सब डि व ता. परांडापैकी परांडा म्यु. पल हद्दीतील सर्व्हे नंबर ४५ पैकी घरजागा नगरपंचायत मिळकत नं. २२३ (जुना मिळकत नंबर १५/२२७) याचे क्षेत्र १५३.४१ चौ. मोटर यांसी चतुःसिमा पुर्वेस - प्रशांत माने यांची मिळकत, दक्षिणेस - गणेश कोरे यांची मिळकत. पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस- कुर्डूवाडी रस्ता येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. प्रशांत नामदेव माने व श्री. सतिश नामदेव माने यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. ही श्री. प्रशांत नामदेव माने व श्री. सतिश नामदेव माने यांनी सदर मिळकतीचे नोंदणकृत वाटप दिनांक १९/११/२०२५ रोजी केलेला असून सदरचा दस्त परांडा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अनुसंची दोन मध्ये अनुक्रमांक ३०३८/२०२५ वर नोंदलेला आहे. श्री. सतिश नामदेव माने हे सदरची मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळा, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आमची पक्षकार बँक तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करेल. कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे. दिनांक ०४/०४/२०२६

सही/-
**श्री. प्रवीण परशुराम करंजकर**
पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी
मो.नं. ९८२२०६५६६१
ॲडव्होकेट, बार्शी

### जाहीर प्रसिध्दीकरण

नि.नं. ७
दि.कि.अ.नं. १३७/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात**

१) **आफरीन इकबाल शेख,** वय ३५ वर्ष
धंदा-घरकाम, रा.७१०, फुले प्लॉट,
परांडा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **जुबेर इकबाल शेख,** वय १४वर्षे, -- **अर्जदार**
धंदा-शिक्षण, रा. सदर-अज्ञान
३) **जुनेद इकबाल शेख,** वय १४ वर्षे,
धंदा-शिक्षण, रा. सदर अज्ञान
(अर्जदार नं.१ स्वतःकरीता व अज्ञान
अर्जदार नं.२.३ ची अ.पा.क. आई म्हणून)
४) **जैबुन कदीर शेख,** वय ६१ वर्षे, धंदा-घरकाम,
रा.सदर

**विरुध्द**

कोणी नाही -- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २, ३ चे वडिल इकबाल कदीर शेख हे होते ते बार्शी येथे दि.१५/०९/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार नं.४ ही मयत इकबाल कदीर शेख यांची आई आहे तर मयत इकबाल कदीर शेख यांचे वडिल कदीर यासीन शेख हे दि.५/१/२००१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच मयत इकबाल कदीर शेख यांचे कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदाराना त्यांचे शासकीय, निमशासकीय व कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज गरज भासलेली आहे सदर वारस / हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदाराकडे नसलेने अर्जदाराना अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदारानी हेअरशिप/वारस प्रमाणपत्र मिळणे करीताअर्ज या मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने कोणाचे कांही कायदेशीर हक्क आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख १३/०४/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ताः ३१/०३/२०२६

सही/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी | शिक्का | सही/- **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी






## महत्त्वाचे

### संथगतीने गोलंदाजी केल्याबद्दल पंजाब किंग्सच्या अय्यरला दंड



**चेन्नई** : येथील एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान गोलंदाजीचा वेग संथ ठेवल्याबद्दल पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. गत हंगामातील उपविजेत्या असलेल्या पंजाब किंग्सने शुक्रवारी येथे पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या चेन्नई सुपर किंग्सचा पाच गडी राखून पराभव करीत, आपला सलग दुसरा विजय नोंदविला. आचारसंहितेच्या कलम २.२२ (जे किमान गोलंदाजी वेगाच्या उल्लंघनाशी संबंधित आहे) अंतर्गत, पंजाब किंग्सची या हंगामातील ही दुसरी चूक असल्यामुळे दंडाची रक्कम वाढवण्यात आली आणि अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला, असे आयपीएलच्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### नाशिकचा श्रीराम म्हसाणे अ.भा. बुद्धिबळ विजेता

**मुंबई** : एका अत्यंत रोमहर्षक अंतिम फेरीत, नाशिकचा श्रीराम म्हसाणे हा अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स (हंगाम ३) स्पर्धेचा विजेता ठरला. मुंबईतील पेडर रोड येथील मुंबई चेस सेंटरमध्ये शनिवारी पार पडलेल्या या स्पर्धेत आठही फेऱ्यांमध्ये सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करीत म्हसाणेने हे विजेतेपद पटकावले. ६.५ गुणांसह एकमेव आघाडीवर असलेला म्हसाणे जेव्हा अंतिम फेरीत दाखल झाला, तेव्हा त्याने कमालीचा संयम राखत आपली आघाडी कायम ठेवली. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेच्या समारोपाच्या क्षणी, प्रतिस्पर्ध्यांच्या कडव्या आव्हानावर मात करत त्याने विजेतेपदावर आपले नाव कोरले. अंतिम फेरीत विविध पटांवर नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. अनेक खेळाडू विजेतेपदाच्या शर्यतीत होते आणि सामन्यांचे निकाल अगदी शेवटच्या क्षणापर्यंत दोलायमान अवस्थेत होते. पहिल्या पटावर निखिल शेलारने म्हसाणेला बरोबरीत रोखले, मात्र विजेतेपद निश्चित करण्यासाठी म्हसाणेला हा निकाल पुरेसा ठरला.

### हार्दिक पांड्या संघाबाहेर; मुंबई इंडियन्सचे नेतृत्व सूर्यकुमारकडे

**नवी दिल्ली** : दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल याने नाणेफेक जिंकली आणि शनिवारी येथे झालेल्या आयपीएल सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्ध गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार हार्दिक पांड्या याची प्रकृती अस्वस्थ होती; त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादवकडे कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली. हार्दिक पांड्या अस्वस्थ आहे आणि म्हणूनच तो आज मैदानात उतरणार नाही. आजच्या सामन्यात सूर्यकुमार यादव कर्णधार असेल, असे मुंबई इंडियन्सने स्पष्ट केले. हार्दिकच्या अनुपस्थितीत, मुंबई इंडियन्सने आपल्या संघात काही बदल केले; यात या स्टार अष्टपैलू खेळाडूच्या जागी दीपक चहरला संघात स्थान देण्यात आले. पाच वेळा विजेते ठरलेल्या या संघाने आपल्या अंतिम एकादशमध्ये ट्रेंट बोल्ट आणि अल्लाह गझनफर यांच्या जागी कॉर्बिन बॉश आणि मिचेल सँटनर यांनाही संधी दिली. दिल्ली कॅपिटल्सने मात्र आपल्या संघात कोणताही बदल केला नाही.

# दिल्लीचा मुंबईवर विजय

**● सामनावीर समीर रिझवीचे शतक हुकले ● सूर्यकुमार अर्धशतक व्यर्थ**

◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

आयपीएल हंगामात आज चुरशीच्या ठरलेल्या आयपीएल सामन्यात आपल्या घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेत दिल्ली कॅपिटल्सने पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सवर ११ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी विजय नोंदविला. सामनावीर ठरलेल्या समीर रिझवीने आयपीएलमध्ये आपले सलग दुसरे अर्धशतक झळकावले, मात्र त्याचे शतक थोडक्यात हुकले. तिकडे मुंबईच्या सूर्यकुमार यादवची अर्धशतकी खेळी व्यर्थ ठरली.

लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सलामीच्या सामन्यातही समीर रिझवीने दिल्ली संघाला ६ गड्यांनी विजय मिळवून देताना नाबाद ७० धावांची विजयी खेळी केली होती.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित दिल्लीच्या गोलंदाजांनी वैविध्यपूर्ण गोलंदाजी करीत मुंबई इंडियन्सला २० षटकांत ६ बाद १६२ धावांवर रोखले. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या समीर रिझवीच्या झंझावाती ९० धावांच्या खेळीच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने १८.१ षटकांत ४ बाद १६४ धावा काढून आपला विजय साकार केला.

दिल्ली कॅपिटल्सचा हा सलग दुसरा विजय ठरला असून त्यांनी चार गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावरून झेप घेत अव्वल स्थान मिळविले. मुंबई (२) पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरला.



| | |
|---|---|
| धावा | ९० |
| चेंडू | ५१ |
| चौकार | ७ |
| षट्कार | ७ |

समीर रिझवी व पाथुम निसंका

मुंबई इंडियन्सच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. मुकेश कुमारने सलामीवीर रेयान रिक्लेटन (९) व तिलक वर्मा (०) यांचा ब ळी घतला. मुंबईने १८ धावांत दोन महत्त्वपूर्ण गडी गमावले. सलामी जोडीदार रोहित शर्मानि सूर्यकुमनार यादवच्या साथीने मुंबईला सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न केला, परंतु अक्षर पटेलने रोहितला रोखले. रोहितने २६ चेंडूंत ३५ धावांचे योगदान दिले. पुढे सूर्यकुमारने नमनन धीरच्या (२८) मदतीने आपले अर्धशतक साजरे केले व संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. सूर्यकुमारने ३६ चेंडूंत ५१ धावा केल्या असताना लुंगी नगिदीने त्याचा त्रिफळा उडविला.

दिल्लीकडून मुकेश कुमारने २ बळी, तर लुंगी नगिदी, अक्षर पटेल, विपराज निगमने प्रत्येकी एक बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सची प्रारंभी त्रेधातिरपीट उडाली. सलामीवीर केएल राहुल (१) व नितीश कुमार रेड्डी (०) हे भरवशाचे खेळाडु लवकरच बाद झाले, परंतु त्यानंतर पाथुम निसंका व समीर रिझवीने मुंबईच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत आपल्या संघाला मुसंडी मारून दिली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ६६ धावांची भागीदारी केली. मिचेल सॅण्टनरच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी पाथुम निसंकाने ३० चेंडूंत ६ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ४४ धावांची भर घातली. पुढे सामन्याची सूत्रे हाती घेत समीर रिझवीने डेव्हिड मिलरच्या सहकार्याने दिल्ली कॅपिटल्सला विजयाच्या समीप आणून सोडले. समीर रिझवी शतक ठोकेल असे वाटत असताना कर्बिन बॉशच्या चेंडूवर त्याचा उडालेला झेल तिलक वर्माने पकडला. समीर रिझवीने ५१ चेंडूंत ७ चौकार व तेवढ्याच षट्कारांसह ९० धावांची खेळी केली. पुढे डेव्हिड मिलर (नाबाद २१) व ट्रिस्टन स्टब्सने (नाबाद ३) नाबाद खेळी करत दिल्ली कॅपिटल्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. (वृत्तसंस्था)

# यशस्वी, ध्रुवची अर्धशतकी खेळी

**राजस्थान रॉयल्स ६ बाद २१०**

◆ **अहमदाबाद, ४ एप्रिल**

शनिवारी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर इंडियन प्रीमियर लीगच्या नवव्या साखळी सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्ध युवा सलामी फलंदाज यशस्वी जयस्वाल (५५) व ध्रुव जुरेलच्या (७५) अर्धशतकी खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने २० षटकांत ६ बाद २१० धावा उभारल्या आणि गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २११ धावांचे लक्ष्य ठेवले.

राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात, स्नायूंच्या आकुंचनामुळे विश्रांती देण्यात आलेला नियमित कर्णधार शुभमन गिल अनुपस्थित असल्याने रशीद खान गुजरात टायटन्सचे नेतृत्व केले.

यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशीने ३८ चेंडूंत ७० धावांची सलामी भागीदारी केली. हंगामी कर्णधार रशीदने राजस्थान रॉयल्सच्या दमदार सुरुवातीनंतर वैभव सूर्यवंशीला आपले लक्ष्य केले. वैभवने १८ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ३१ धावा केल्या. पुढे यशस्वी जयस्वालने ध्रुव जुरेलच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व संघाची धावसंख्या वाढविली. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी करून राजस्थानला १२.३ षटकांत १२६ धावांचा टप्पा गाठून दिला, याचवेळी कॅगिसो रबाडाने जयस्वालचा त्रिफळा उडविला. यशस्वी जयस्वालने ३६ चेंडूंत ५५ धावांची अर्धशतकी खेळी केली, यात त्याने ६ चौकार व ३ षट्कार खेचले. यशस्वीने १८ व्यांदा ५०-हून अधिक धावांच्या खेळी केली असून यात आयपीएलमधील दोन शतकांचा समावेश आहे.



यशस्वी जयस्वाल



ध्रुव जुरेल

पुढे ध्रुव जुरेलला कर्णधार रियान पराग (८) व शिमरॉन रहेटमायरची (१८) हवी तशी साथ मिळाली नाही. प्रसिध कृष्णाने परागला, तर अशोक शर्माने हेटमायरला बाद केले. तोपर्यंत राजस्थानने १५.३ षटकांत ४ बाद १६५ धावांपर्यंत मजल मारली. दरम्यान ध्रुवने डोनोव्हॅन फरेराच्या साथीने वैयक्तिक अर्धशतकाकडे वाटचाल सुरु ठेवली व संघाचा धावफलक हलता ठेवला. फरेराच्या (१) रुपाने रबाडाने आपला दुसरा बळी मिळविला. त्यानंतर रवींद्र जडेजाच्या साथीने ध्रुव जुरेलने ३० चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. शतकाकडे वाटचाल करीत असताना ध्रुवला मोहम्मद सिराजने रोखले. ध्रुव जुरेलने ४२ चेंडूंत ५ चौकार व ५ षट्कारांसह ७५ धावांचे भरीव योगदान दिले. जडेजा (नाबाद ७) व जोफ्रा आर्चरने (नाबाद १) नाबाद खेळी करत राजस्थान रॉयल्सला २० षटकांत ६ बाद २१० धावा उभारून दिल्या.

गुजरात टायटन्सकडून कॅगिसो रबाडाने २ बळी, तर मोहम्मद सिराज, अशोक शर्मा, प्रसिध कृष्णा व रशिद खानने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# शीतल देवीला नमवून पायल नाग विजेती

◆ **बँकॉक, ४ एप्रिल**

भारताची उदयोन्मुख पॅरा-तिरंदाज पायल नाग हिचे चारही अवयव (हात-पाय) नाहीत. तिने शनिवारी बँकॉक येथे आयोजित जागतिक तिरंदाजी पॅरा मालिकेत लक्षवेधक कामगिरी केली. आपल्या पहिल्याच वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळताना, तिने विद्यमान विश्वविजेती व जगातील पहिली अवयवहीन महिला तिरंदाज असलेल्या शीतल देवीचा १३९-१३६ अशा गुणांनी पराभव करीत, महिलांच्या कम्पाऊंड ओपन वैयक्तिक गटातील सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

अंतिम सामन्याची सुरुवात अत्यंत बरोबरीच्या पातळीवर झाली; पहिल्या दोन फेऱ्यांनंतर दोन्ही तिरंदाजांचे गुण ५४-५४ असे समान होते. मात्र,



सामना जसजसा पुढे सरकला, तसतशी पायलच्या खेळाची पातळी उंचावली. तिने अत्यंत संयमाने तीन सलग एन्ड्स खेळत गुणांमध्ये निर्णायक आघाडी घेतली आणि एक अविस्मरणीय विजय नोंदवला. गत वर्षभरात शीतलने गाजवलेले वर्चस्व पाहता, हा निकाल अधिकच लक्षणीय ठरला आहे. (वृत्तसंस्था)

# पॅट कमिन्स मायदेशी परतला



◆ **नवी दिल्ली, ४ एप्रिल**

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स याने सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या हंगामात आपल्या संघाला अर्ध्यावरच सोडून दिले आहे. पाठीच्या जुन्या दुखापतीवर अंतिम वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी तो ऑस्ट्रेलियाला परतला आहे.

या ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाजाने आपल्या मायदेशात इंग्लंडविरुद्ध झालेल्या अॅशेस मालिकेनंतर एकही सामना खेळलेला नाही. त्याने नुकत्याच पार पडलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ मध्येही सहभाग घेतला नाही, या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदाच गट फेरीतून बाहेर पडावे लागले होते.

कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबादने मिळवलेल्या रोमहर्षक विजयानंतर लगेचच कमिन्स ऑस्ट्रेलियाला रवाना झाला. ही तपासणी आधीच नियोजित होती व ती क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या देखरेखीखाली केली जाणार आहे.ऑस्ट्रेलियाचा कर्णधार असलेल्या कमिन्सने यापूर्वीच संघाचे सुरुवातीचे दोन सामने गमावले आहेत. आता तो आणखी दोन सामन्यांना मुकणार आहे; कारण वैद्यकीय चाचणी पूर्ण करून तो १७ एप्रिल रोजी पुन्हा संघात सहभागी होईल अशी अपेक्षा आहे.

२०२६ च्या सुरुवातीच्या टप्प्यात कमिन्स मैदानात उतरू शकणार नाही हे स्पष्ट झाल्यानंतर, सनरायझर्स हैदराबादने ईशान किशनकडे कर्णधारपदाची धुरा सोपविली होती. आताही ईशान किशनच संघाचे नेतृत्व करेल.किशनच्या नेतृत्वाखाली, २०१६ चे विजेते असलेल्या सनरायझर्स हैदराबादला आपला पहिला सामना २८ मार्च रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळावा लागला होता. गोलंदाजीतील वाईट कामगिरीमुळे या सामन्यात संघाला सहा गडी राखून पराभव पत्करावा लागला होता. (वृत्तसंस्था)

# लखनौला फलंदाजीत सुधारणा करण्याची गरज

◆ **हैदराबाद, ४ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथील राजीव गांधी स्टेडियमवर दुपारच्या सत्रात सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. लखनौ सुपर जायंट्सला या हंगामातील पहिल्या विजयासाठी आपल्या फलंदाजीत सुधारणा करावी लागणार आहे, या अवघड सामन्यात त्यांना आत्मविश्वासू हैदराबाद संघाविरुद्ध कडवी झुंज देण्याती गरज आहे.

हैदराबादने आतापर्यंत आपल्या दोन सामन्यांपैकी एक सामना जिंकला आहे, तर लखनौने सलामीचा सामना गमावला आहे. एकीकडे हैदराबाद विजयाची लय कायम राखण्यास, तर लखनौ पहिला विज नोंदविण्यास उत्सुक आहे.

ईडन गार्डन्सवर कोलकाता



ईशान किशन ऋषभ पंत

नाईट रायडर्सचा ६५ धावांनी धुव्वा उडवत हैदराबाद संघाने फलंदाजीतील लय पुन्हा मिळविली आहे. हैदराबाद या हंगामातील आपल्या पहिल्या घरच्या सामन्यात आत्मविश्वासाने उतरत आहे.

दुपारच्या सामन्यात खेळपट्टी फटकेबाजीसाठी अनुकूल असण्याची शक्यता असल्यामुळे लखनौ संघासमोरील आव्हान आणखी वाढले आहे.

गत सामन्यातील लय व घरच्या मैदानाची अनुकूलता पाहता सनरायझर्स हैदराबाद निश्चितच विजयाचा प्रबळ दावेदार असेल.

पहिल्या दोन हंगामात प्लेऑफमध्ये स्थान मिळवूनही, संजीव गोएंका यांच्या मालकीच्या संघाला गत काही वर्षांपासून घसरणीचा सामना करावा लागत आहे, दोन्ही वेळा ते सातव्या स्थानावर राहिले आहेत व यावेळच्या त्यांच्या मोहिमेची सुरुवातही आश्वासक झालेली नाही.

जस्टिन लँगर यांच्या मार्गदर्शनाखालील लखनौ संघात ऑस्ट्रेलियाचा टी-२० कर्णधार मिचेल मार्श, दक्षिण आफ्रिकेचा एडन मार्कराम, कर्णधार ऋषभ पंत व धडाकेबाज फलंदाज निकोलस पूरनचा समावेश असलेली एक मजबूत फलंदाजी फळी आहे. मात्र, एकना येथील घरच्या मैदानावर दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात १९ षटकांपेक्षा कमी वेळेत १४१ धावांवर त्यांचा संघ गारद झाल्यामुळे त्यांच्यातील गंभीर त्रुटी उघड झाल्या. (वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**सनरायझर्स हैदराबाद वि. लखनौ सुपर जायंट्स**
**स्थळ** :राजीव गांधी स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. चेन्नई सुपर किंग्स**
**स्थळ** : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# विश्वनाथ सुरेश उपांत्य फेरीत

**आशियाई मुष्टियुद्ध**

◆ **उलानबटार, ४ एप्रिल**

भारताचा उदयोन्मुख मुष्टियोद्धा विश्वनाथ सुरेशने शनिवारी येथे झालेल्या आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत कझाकस्तानचा विद्यमान विश्वविजेता व जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला संझार ताश्केनबे याला पराभवाचा क्का देत पुरुषांच्या ५० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

या अनपेक्षित विजयापूर्वी, सुरेशने किर्गिझस्तानच्या बेकझात एर्गेशोव्हला पंचांच्या एकमताने दिलेल्या निर्णयानुसार ५-० ने पराभूत केले होते.

आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या सुरेशने आपल्या प्रभावी युवा




प्रशिक्षकांसमवेत विश्वनाथ सुरेश

कारकिर्दीतून वरिष्ठ स्तरावर सहजतेने प्रवेश करीत, स्वतःला भारतातील सर्वात रोमांचक मुष्टियुद्ध खेळाडूंपैकी एक म्हणून वेगाने स्थापित केले आहे.

चेन्नईचा रहिवासी असलेल्या सुरेशनचा हा उदय एक महत्त्वपूर्ण क्षण आहे. तो विद्यमान राष्ट्रीय विजेता असून, त्याने एलिट मेन्स राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. (वृत्तसंस्था)

# बंगळुरू सलग दुसऱ्या विजयासाठी उत्सुक

**सीएसकेच्या सॅमसनकडून उत्तम कामगिरीची आशा**

◆ **बंगळूर, ४ एप्रिल**

गत विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात आपला सलग दुसरा विजय नोंदविण्यास उत्सुक आहे. रविवारी येथे आरसीबीचा सामना चेन्नई सुपर किंग्सशी (सीएसके) होणार आहे. संजू सॅमसनच्या सुस्त सुरुवातीमुळे व मजबूत गोलंदाजीच्या पर्यायांच्या अभावामुळे सीएसकेला अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अर्थात, हे केवळ दोनच सामने झाले आहेत; तरीही चेन्नईची सध्याची खालावलेली कामगिरी सावरण्यासाठी आणि संघात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी संजू सॅमसनला लवकरात लवकर आपला सूर गवसणे अत्यंत गरजेचे आहे. टी-२० विश्वचषक विजेता खेळाडू संजू सॅमसनने आतापर्यंतच्या सामन्यांमध्ये अनुक्रमे ६ आणि ७ धावाच केल्या आहेत.

२८ मार्च रोजी एम. चिन्नास्वामी



रजत पाटीदार ऋतुराज गायकवाड

स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्ध झालेल्या पहिल्या सामन्यानंतर आरसीबीचा संघ पूर्णपणे विश्रांती घेऊन सज्ज आहे. आरसीबीने तो सामना सहा गडी राखून जिंकला होता.

ताजेतवाना झालेला आरसीबी संघ आता आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा खूपच चांगला संघ आहे. हा भूतकाळाच्या अगदी उलट आहे, जेव्हा सीएसके संघात प्रतिभावान खेळाडूंची रेलचेल होती. आता आरसीबीकडे ही सोय आहे. त्यांच्याकडे विराट कोहलीच्या देखरेखीखाली एक स्थिर आघाडीची फळी आहे. देवदत्त पडिक्कलने हैदराबादविरुद्ध २६ चेंडूंत ६१ धावांची खेळी केलरी होती. रजत पाटीदारने संघाचे नेतृत्व करणे व आरसीबीच्या मधल्या फळीला आधार देणे या आपल्या दुहेरी भूमिकेत समाधान मानत असल्याचे दिसत आहे.

आरसीबीने गोलंदाजीमध्ये प्रचंड सुधारणा केली आहे. त्यांनी काही दर्जेदार खेळाडूंना संघात स्थान देऊन आपला गोलंदाजी विभागही मजबूत केला आहे. जेकब डफीने जोश हेझलवूडची जागा सहजपणे घेतली आणि त्याने तीन बळी घेत हैदराबादच्या आघाडीच्या फळीला उद्ध्वस्त केले. एकदा हेझलवूड संघात परतला की त्यांची गोलंदाजी आणखी मजबूत होईल.

या सामन्यासाठी यजमान संघ अभिनंदन सिंगच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज मंगेश यादवला संघात घेण्याचाही विचार करू शकतो.कृणाल पांड्या व सुयश शर्माने मधल्या षटकांमध्ये प्रभावी गोलंदाजी केली. आता त्यांना सीएसकेच्या शिवम दुबे, सरफराज खान व आयुष म्हात्रे या सक्षम मधल्या फळीतील फलंदाजांना रोखण्याचे आव्हान पेलावे लागेल. (वृत्तसंस्था)

# सीएसकेने गोलंदाजीकडे लक्ष द्यावे

**सुनील गावस्कर यांचे आवाहन**

◆ **चेन्नई, ४ एप्रिल**

आयपीएलच्या उर्वरित हंगामात पाच वेळा विजेते ठरलेल्या चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) संघाची मुख्य चिंता त्यांची गोलंदाजी असेल. आपल्या मोहिमेला पुन्हा उभारी देण्यासाठी सीएसकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्करने केले आहे.

सीएसकेने या हंगामातील आपले पहिले दोन सामने गमावले आहेत. शुक्रवारी पंजाब किंग्सकडून पाच गड्यांनी पत्करलेल्या पराभवाचाही समावेश आहे.

सध्या बहुतेक संघांकडे फलंदाजीमध्ये बऱ्यापैकी खोली उपलब्ध आहे. त्यामुळे सीएसकेला आपल्या गोलंदाजीमध्ये सुधारणा करून ती अधिक भक्कम करावी लागेल, असे ते म्हणाले.

सीएसकेकडून युवा खेळाडू आयुष म्हात्रे याने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ४३ चेंडूंत ७३ धावांची



खेळी करत संघाला ५ बाद २०९ धावांपर्यंत पोहोचवले.

आयुष म्हात्रेसाठी तिसरा क्रमांक ही एक चांगली फलंदाजीची जागा आहे. १९ वर्षांखालील क्रिकेटमध्ये त्याने फलंदाजीच्या क्रमवारीत खालच्या क्रमांकावर खेळ केला आहे, परंतु तिसरा क्रमांक त्याला अधिक चांगल्या प्रकारे साजेसा ठरू शकतो, असे ते म्हणाले.

गत सामन्यात तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला होता, परंतु त्याचा कोणताही परिणाम त्याच्यावर झाला आहे असे त्याच्या खेळातून मुळीच जाणवले नाही. आजच्या पिढीतील खेळाडूंच्या मानसिकतेचे हेच वैशिष्ट्य आहे. ते भूतकाळाचा फारसा विचार करत नाहीत, तर वर्तमानावर लक्ष केंद्रित करतात. हा खरोखरच एक उत्कृष्ट दृष्टिकोन आहे, असेही ते म्हणाले.

गावस्कर यांनी रोहित शर्माच्या सुधारलेल्या शारीरिक तंदुरुस्तीचे आणि त्याच्या फलंदाजीवर झालेल्या सकारात्मक परिणामाचेही कौतुक केले. रोहित शर्माने आपल्या तंदुरुस्तीसाठी प्रचंड मेहनत घेतली आहे हे स्पष्टपणे दिसून येते आणि त्या मेहनतीचे फळही त्याला मिळत आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

- भारताचा माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराने प्रियांश आर्याच्या ११ चेंडूंतील ३९ धावांचे कौतुक केले,
- त्यामुळे पंजाब किंग्सला २१० धावांचा पाठलाग करताना दमदार सुरुवात मिळाली.
- प्रियांश आर्या चेंडूची लांबी खूप लवकर ओळखतो. त्या खेळपट्टीवर जेव्हाही चेंडू थोडासा आखूड असायचा, तेव्हा तो संधी सोडत नसे व त्यावर षटकार मारत असे, असे पुजारा म्हणाला.

# श्याम सुंदर स्वामीने पटकावले कांस्यपदक

**बँकॉक पॅरा तिरंदाजीत राकेश-अंजुम चौथ्या स्थानी**



◆ **बँकॉक, ४ एप्रिल**

येथे आयोजित जागतिक पॅरा सिरीज तिरंदाजी स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या प्ले-ऑफ लढतीत आपला वरिष्ठ सहकारी व पॅरिस पॅरालिम्पिकमधील कांस्यपदक विजेता राकेश कुमार याच्यावर मात करून श्याम सुंदर स्वामीने भारतासाठी कांस्यपदक निश्चित केले.

पुरुषांच्या कम्पाऊंड वैयक्तिक प्रकारातील कांस्यपदकाच्या लढतीत स्वामीने १४३ (१०*) विरुद्ध १४३ (९) अशा फरकाने विजय मिळवला. दोन्ही तिरंदाजांची गुणसंख्या समान राहिल्यामुळे, या लढतीचा निकाल टाय-ब्रेकच्या आधारे लावण्यात आला, यात स्वामीने बाजी मारली.

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक जिंकणाऱ्या राकेशला, या शूट-ऑफमध्ये झालेल्या निराशाजनक पराभवानंतर चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. महिलांच्या वैयक्तिक प्रकारातही कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत दक्षिण कोरियाच्या प्रतिस्पर्ध्याकडून २-६ अशा फरकाने पराभव पत्करावा लागल्यामुळे, अंजुम तन्वरला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. बँकॉकमधील ही स्पर्धा, याच ठिकाणी नुकत्याच पार पडलेल्या आशिया चषकाच्या पहिल्या टप्प्यानंतर आयोजित करण्यात आली आहे. आशिया चषकांत भारताने दोन सुवर्ण, चार रौप्य व चार कांस्य अशा एकूण १० पदकांची कमाई करीत दमदार कामगिरी नोंदविली होती. (वृत्तसंस्था)

# जि.प. शाळेतील ३९ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज दि. ४ एप्रिल-**

माळशिरस तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील ३९ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

शंकरनगरच्या स्मृती भवनात पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने सन २०२५-२६ च्या अंतर्गत ७ व शिक्षण विस्ताराधिकारी १, मुख्याध्यापक सहशिक्षक ३१ असे ३९ जणांना तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आमदार उत्तम जानकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी सभापती दत्ता मगर, उपसभापती मनीषा पाटील, जि.प. सदस्य गौतम माने, नागन्नाथ भोसले, सुषमा नारनवर, मीनाक्षी सरतापे, लीलावती ठवरे, पं.स.सदस्य प्रवीण वाघमोडे, युवराज झंजे, आनंद शेंडगे, महादेव साबळे, आप्पासाहेब पाटील, मनीषा नाईकनवरे, नम्रता पुकळे, रेश्मा माने, स्नेहा जानकर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे,मिलिंद सरतापे, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांनी प्रास्ताविकात माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ३९१ शाळा आहेत. २८ हजार ६५ विद्यार्थी शिक्षण घेतात, तर १ हजार ११७ शिक्षक ज्ञानदानाचे काम करीत असल्याचे सांगितले. यावेळी आदर्श शिक्षकांच्या वतीने किरण घाडगे, अर्जुन पिसे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास उरवणे,राजाराम गुजर, नितीन बनकर यांनी केले. गटविस्तार अधिकारी असलम इनामदार यांनी आभार मानले.



### शिक्षक म्हणजे गुणवत्तेची खाण

शिक्षक म्हणजे गुणवत्तेची खाण आहे.त्यांचे भाषेवर प्रभुत्व असते. त्यांच्यातील उपजत ज्ञान आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम करते म्हणून शिक्षकांनी अंतर्मनातील ज्ञानाचा झरा वाहू देऊन नव तंत्रज्ञानयुक शिक्षणाने विद्यार्थी घडवावेत.

**- उत्तम जानकर, आमदार**

### या शिक्षकांचा झाला सन्मान

अस्लम इनामदार (विस्तार आधिकारी), सिद्धेश्वर भरते (केंद्रप्रमुख), भारत मगर, संभाजी फुले, बाळू शिंदे, युन्नूस तांबोळी, दत्तात्रय पराडे, मधुकर वनसाळे (मुख्याध्यापक), शीतल जाधव, सुरेश शिंदे, दिलीप उकिरडे, भारतीय गवळी, सुरेखा काळे, राजश्री जाधव, रमेश सरक, अर्जुन पिसे, आनंद गोंदलवाड, पद्मिनी मारकड, लक्ष्मण भिंगे, अंकुश कोळी, अर्चना कामेगावकर, सुहास उरवणे, धनाजी जाधव, विष्णू जायभाय, दिपाली तापोळे, प्रभाकर कटकदोंड, विजय हेगडे, अयुब काझी, नागनाथ वाघमोडे, वर्षाराणी हेगडे, संगीता पोरे, रुक्मिणी पारसे, जहाँगीर मुलाणी, दत्तात्रय चव्हाण, अमोल सोपनर, नवनाथ क्षीरसागर, किरण गाडगे, संतोष चौगुले, विनोद चंदनशिवे (सहशिक्षक).




# अकलूज पोलिस स्टेशनची दमदार कामगिरी

## चोवीस तासात चोरीला गेलेले वाहनासह चोराला पकडण्यात यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ४ एप्रिल-**

अकलूज पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी विविध गुन्हयातील शोध लावत अनेक गुन्हे उघडकीस आणले आहेत. नुकतीच चोरीला गेलेली चार चाकी वाहनाचा शोध लावत चोवीस तासाच्या आत गाडीसह चोरट्याला पकडण्यात अकलूज पोलीस स्टेशनच्या पोलीसांना यश आले आहे.

या गुन्हाबाबत अकलूज पोलीस स्टेशन कडून मि ळालेल्या माहितीनुसार फिर्यादी दिलीपशिंग नरेंद्रशिंग राजपूत (वय ४६ वर्षे, व्यवसाय आचारी रा.बागेचीवाडी, ता.माळशिरस) यांची १ एप्रिल २०२६ रोजी रात्री ००.३० ते ५ वाजण्याचे सुमारास पाटीदार मंगल कार्यालय बायपास रोड अकलुज येथुन फिर्यादीचे मालकीची इको कार नंबर एम.एच. ४५/ए. क्यु. ८९७० ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन अकलुज पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्हयातील इको कार व अज्ञात आरोपीचा सी.सी. टी.व्ही. फुटेजच्या अधारे शोध घेवून २४ तासाचे आत आरोपी आकाश रामभाऊ रोकडे (वय २७ वर्षे रा. वाघोली पुणे) यास वाहनासह ताब्यात घेण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलुज विभाग अकलुज संतोष वाळके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निरज उबाळे, पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, पोलीस अंमलदार, शिवकुमार मदभावी, सुहास क्षीरसागर, विक्रम घाटगे, विनोद साठे, पंडित गवळे बबलू गाडे सायबर सेल निक्स पवार यांनी कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अंमलदार शिवकुमार मदभावी हे करीत आहेत.

# शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातील २२ विद्यार्थ्यांचे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ४ एप्रिल-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथील छात्राध्यापकांनी (CTET) केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा ७, ८ फ ेब्रुवारीमध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये अध्यापक विद्यालयातील एकूण २२ विद्यार्थ्यांनी यश मिळविले. विद्यार्थ्यांसाठी पाच सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच माजी विद्यार्थी, अधिकारी तसेच तज्ज्ञ यांच्या व्याख्यानांचे देखील आयोजन करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांचे डॉ.बी. वाय.यादव, नंदन जगदाळे, पी.टी पाटील, ए.पी.देबडवार, जे.सी.शितोळे व संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे शालेय समितीचे चेअरमन डॉ.जी.एम पाटील,अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.पी. गुंड आदींनी अभिनंदन केले.

### यशस्वी विद्यार्थी :

**प्रथम वर्ष-** आरती मोटे, संदीप भांगिरे, प्रगती भाले, निकिता मस्के.

**द्वितीय वर्ष-** श्वेता इंगोले, ओम घडमोडे, ज्ञानेश्वरी मिस्कीन, संस्कृती नागटिळक, शिफा पठाण, आदित्य देशमुख,

**माजी विद्यार्थी-** प्रकाश राऊत, अस्मिता जगताप, नंदिनी मेहत्रे, राजनंदिनी गाडेकर, राजेश चौधरी, अश्विनी साळुंखे, फारुख मुलाणी, दीपक पारडे, प्रवीण देशमुख, शेंगाळ गणेश, भूमकर सखाराम, श्वेता शिंदे.

# मळोलीतील डीपी ट्रान्सफॉर्मर एका दिवसात बसवला

## आमदार उत्तमराव जानकर व रणजीतसिंह जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ५ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील मळोली गावातील विनायक अण्णा डीपीचा ट्रान्सफॉर्मर अवघ्या एका दिवसात बसवण्यात आल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे ग्राम स्थांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. शेतीकामे, घरगुती कामकाज, व्यावसायिक व्यवहार तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा परिणाम होत होता. अशा परिस्थितीत हा ट्रान्सफॉर्मर तातडीने बसवण्यात आल्याने गावातील वीजप्रश्न मार्गी लागला आहे. या कामासाठी आमदार उत्तमराव जानकर व रणजीतसिंह जाधव यांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. गावातील अडचण लक्षात घेऊन त्यांनी महावितरण विभागाशी संपर्क साधत ट्रान्सफॉर्मर तातडीने बसवण्याची मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत अवघ्या एका दिवसात ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला.

आजच्या काळात अनेक कामे पाठपुराव्याअभावी रखडत असल्याचे चित्र दिसून येते. मात्र लोकप्रतिनिधींनी गावातील समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाशी समन्वय साधल्यास कामे जलद गतीने पूर्ण होऊ शकतात, याचे उदाहरण मळोली येथील या घटनेतून दिसून आले.



# बार्शी तालुक्यात महिलेच्या गळ्यातील ८.५ ग्रॅम सोन्याचे गंठण हिसकावले

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ४ एप्रिल-**




तालुक्यातील उंबर्गे गावातील वस्तीवर भरदिवसा एका म हिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावल्याची घटना घडली. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, सुशिला रामहारी विधाते (वय ५६ वर्षे, रा. जाधव वस्ती, उंबर्गे ता. बार्शी) या आपल्या घरी असताना शनिवार दि. ४ एप्रिल रोजी सकाळी ९-३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. त्यांचे पती दवाखान्यात गेले असताना त्या घराबाहेर काम करत होत्या.

यावेळी पिवळ्या रंगाची टाकी असलेल्या मोटारसायकलवरुन एक अनोळखी इसम त्यांच्या घरासमोर आला. त्याने सुरुवातीला गहू-तांदुळाची विचारपूस केली व नंतर पाणी मागितले. महिलांनी त्याला बाहेरील नळावर पाणी पिण्यास सांगितले. मात्र, त्या घरात जाण्यासाठी वळताच संबंधित इसमाने मागून येऊन त्यांना धक्का देत गळ्यातील दागिने हिसकावण्याचा प्रयत्न केला.

महिलाने प्रतिकार करत मंगळसूत्र व गंठण पकडून ठेवले, मात्र आरोपीने जोरजबरदस्ती करत त्यांच्या गळ्यातील काळ्या मण्यांचे सोन्याचे गंठण हिसकावून मोटारसायकलवरुन पळ काढला. घटनेनंतर महिलांने आरडाओरडा केल्याने आसपासचे नागरिक जमा झाले. आरोपी उंबर्गे गावाच्या दिशेने भरधाव वेगाने पळून गेल्याची माहिती स्थानिकांनी दिली. सदर चोरीमध्ये काळ्या मण्यांचे गंठण लंपास करण्यात आले असून, त्यामध्ये सुमारे ५ ग्रॅम सोन्याच्या कांड्या, २ ग्रॅमचे सोन्याचे मणी व दीड ग्रॅमचे सोन्याचे डोरले असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादी महिलेने संबंधित अनोळखी इसमास पुन्हा पाहिल्यास ओळखू शकते असे सांगितले असून, या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बार्शीत नारीशक्ती सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ एप्रिल-**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून जनसामान्यांचे प्रश्न मांडणाऱ्या अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचा पाचवा वर्धापन दिन आणि 'नारी शक्ती सन्मान सोहळा बार्शी येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले.

देशपांडे व्हेज हॉल येथे आयोजित या सोहळ्याचे अध्यक्षपद संघटनेचे संस्थापक तथा केंद्रीय अध्यक्ष राजा माने यांनी भूषविले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. राजेंद्र राऊत, सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, तहसीलदार एफ. आर. शेख, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विजय गरड, शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सतीश सावंत, तेजस राऊत, दिपक नलावडे, मुरलीधर चव्हाण, अमित इंगोले, सूर्यकांत वायकर, संतोष सूर्यवंशी, राज्य सल्लागार मयूर गलांडे, धिरज शेळके, सचिन कुलकर्णी, दिनेश मेटकरी, प्रशांत कथले, दीपक रोंगे, प्रशांत कटारे, अजित देशपांडे उपस्थित होते. याप्रसंगी समाजातील विविध क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या जिल्ह्यातील ६ महिलांचा म न्यवरांच्या हस्ते विविध पुरस्काराने गौरव करण्यात आला. यामध्ये अनु मोहिते- जीवन गौरव, हभप शिवलीला पाटील- कीर्तन रत्न, मनिषा भगवान लोकरे क्रीडा रत्न, सायरा नुह मुल्ला- समाज रत्न, सारीका संघवी- मातृत्व गौरव, मनिषा गुरव- आदर्श महिला वाहक सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.




या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे बार्शी तालुक्याचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांची प्रकट मुलाखत राज्यभर चर्चेचा विषय ठरली. ज्येष्ठ संपादक राजा माने, एबीपी माझाचे पत्रकार मयुर गलांडे, आणि महिला जिल्हाध्यक्षा निता देव यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना राऊत यांनी बार्शीच्या विकासावर आणि राजकीय प्रवासावर भाष्य केले. याप्रसंगी तहसीलदार एफ. आर. शेख, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे भाऊसाहेब आंधळकर, कृष्णराज बारबोले आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक धिरज शेळके यांनी केले. तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बसवंत यांनी ४ मे रोजी कला अकादमी पणजी, गोवा येथे संघटनेचे तिसरे राष्ट्रीय महाअधिवेशन दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होणार असल्याचे म्हटले. सूत्रसंचालन निता देव यांनी केले तर उपस्थितांचे आभार भैरवनाथ चौधरी यांनी मानले. सुप्रसिद्ध सनई वादक राऊत बंधूनी सनई चौघाडाच्या वादनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. तर माऊली भिसे यांच्या संबळ वादनाने कार्यक्रमाची आणखीनच शोभा वाढली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय पाटील, निता देव, सिद्धार्थ बसवंत, शंकर लाखे, अक्षय बारंगुळे, रवींद्र सांगोळे, विशाल मोरे, विश्वास वीर, श्रीशैल माळी, भैरवनाथ चौधरी, दत्ता सुरवसे, किशोर शेटे, कदीर बागवान, सुनील अवघडे, दत्ता गुरव, गोविंद भिसे, उमेश नायकुडे, राहुल भालशंकर, किरण माने, वैशाली ढगे यांनी परिश्रम घेतले.

# मंद्रूप भाजपाचे नेतृत्व मोतीलाल राठोड यांच्याकडे येणार?

## कोरे-मुगळे यांच्या वादात पर्यायी नेतृत्व

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ४ एप्रिल.**

दक्षिण सोलापूरमधील भाजपा अंतर्गत गटबाजी वाढत चालली असून मंद्रूपमध्येही पक्षांतर्गत कुरघोडी सुरू असल्याने भाजपाकडून नव्या नेतृत्वाची निवड निश्चित झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मेंडगुदले-मुगळे वादात आता मोतीलाल राठोड यांच्याकडे नेतृत्वाची धुरा देण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे आगामी मंद्रूप ग्रामपंचायत निवडणूकीची 'कमांड' मोतीलाल राठोड यांच्याकडे असणार आहे. सत्ताधारी कोरे व विरोधी मुगळे यांना पर्यायी नेतृत्व म्हणून राठोड यांना पसंती दिल्याची चर्चा आहे.

राठोड यांनी आरके फाउंडेशनच्या माध्यम ातून मंद्रूपमध्ये अनेक सामाजिक व विधायक उपक्रम राबविला आहे. शिवाय सेवालाल नगरला 'नवा लूक' देण्यातही राठोड यांचा सिंहाचा वाटा आहे. ठेकेदारीच्या माध्यमातून राठोड समाजोपयोगी कामे करून मंद्रूपला 'मॉडेल' बनविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यापूर्वी त्यांच्या भावजया वॉर्ड क्रमांक ४ मध्ये सदस्य म्हणून काम करताना मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. तसेच सरपंच निवडणूकीतही कमी मताने त्यांचा पराभव झाला आहे. मंद्रूपमध्ये त्यांच्या गटाचे तीन ग्रामपंचायत सदस्य निवडून आले आहेत. जिल्हा परिषद निवडणूकीसाठी ते इच्छुक होते. मात्र भाजपाच्या नेतृत्वाकडून 'सबुरी'चा सल्ला देण्यात आल्याने त्यांनी आमदार देशमुख यांचे आदेश मानून काम केला आहे. त्यामुळे वरिष्ठांचे आदेश मानणारा पक्ष कार्यकर्ता म्हणून राठोड यांचे नाव आघाडीवर आहे.

मंद्रूपमध्ये २०१७ ते २०२२ या कार्यकाळात आमदार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात विकासकामे करूनही मेंडगुदले-म ुगळे वादामुळे सरपंच निवडणूकीत भाजपाला फटका बसला. भाजपाचे युवा मोर्चाचे संघटन सरचिटणिस गौरीशंकर मेंडगुदले व पंचायत समि ती सदस्य मळसिध्द मुगळे यांच्यातील ' तू तू मैं मैं ' संपविण्यासाठी मोतीलाल राठोड यांच्याकडे नेतृत्व सोपविणार असल्याचे कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. राठोड यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन आमदार सुभाष देशमुख व बाजार समिती संचालक मनिष देशमुख यांनी मंद्रूपची भाजपाची धुरा राठोड यांच्याकडे सोपविणार आहेत.

### राठोड यांचे नेतृत्व मुगळे यांच्यासाठी धोका

बाजार समिती संचालक मनिष देशमुख व पंचायत समिती सदस्य मळसिध्द मुगळे यांच्यातील कटुता दिवसेंदिवस वाढत आहे. आ. देशमुख यांचा विरोध असतानाही मुगळे उमेदवारी मिळवून निवडून आले. विजयानंतर मुगळे यांनी आमदार देशमुख यांना खुले आव्हान देत कार्यकर्त्यांना डिवचले होते. त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांशी चर्चा करून मनिष देशमुख यांनी मंद्रूप ग्रामपंचायत निवडणूकीची जबाबदारी मोतीलाल राठोड यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राठोड यांचे नेतृत्व मुगळे यांच्यासाठी धोका मानला जात आहे.

### नेत्यांच्या मार्गदर्शनानुसार काम करणार



आगामी ग्रामपंचायत निवडणूकीत कोरे व मुगळे यांना पर्याय म्हणून तिसरी आघाडी चर्चा सुरू आहे. या निवडणुकीत आमदार देशमुख व मनिष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचा कमळ फुलविणार आहे. वरिष्ठांच्या उपस्थितीत पक्षांतर्गत वाद मिटविण्यास प्राधान्य देणार आहे. सर्व कार्यकर्ते व मंद्रूप विकासप्रेमी नागरीकांना घेऊन ग्रामपंचायतीची व्यूहरचना आखणार आहे. मंद्रूपला विकासाचा 'मॉडेल' बनविण्याचा आ. देशमुख यांचे स्वप्न साकारणार आहे.

**मोतीलाल राठोड**, संस्थापक अध्यक्ष, आरके फाउंडेशन मंद्रूप.

## निधन वृत्त...

### धर्मवीर कसबे



**बार्शी दि. ४ एप्रिल -**

बार्शीतील धर्मवीर कसबे (वय- ४९) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. नगरसेवक ज्योतिर्लिंग कसबे यांचे ते मोठे बंधू होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, तीन मुली असा परिवार आहे. मंगळवार पेठेतील मोक्षधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


### मालती जोशी



**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती मालती रमाकांत जोशी (वय ८५) यांचे शनिवारी सकाळी साडे सहा वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी साडेबाराच्या सुमारास अंत्यविधी होतील. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे, पणतू असा मोठा परिवार आहे. डॉ. रवींद्र जोशी आणि पत्रकार रजनीश जोशी यांच्या त्या मातोश्री होत.

# पुनरुत्थान



पुनरुत्थान म्हणजे मरणावरील विजय. ख्रिस्ताचे पुनरुत्थान ही जगातील एकमेव अद्वितीय, अलौकिक घटना आहे. ह्या गोष्टीला बायबलमधील अनेक पुरावे पुष्टी देतात. स्वतः प्रभु येशूने अनेक भविष्यवाणी केल्या आहेत. याचा संदर्भ त्याच्या शिष्यांनी लिहिलेल्या शुभवर्तमानाच्या पुस्तकात आहे.(मत्तय २०:१९,१६:२१,१७:२२,२३ मार्क ८:३१, लुक ९:२२,१८:३१-३३) मरणातून जीवंत झाल्यानंतर प्रभू येशू ख्रिस्ताने खुप लोकांना दर्शन दिले, याचा संदर्भ बायबल मध्ये आहे. (मत्तय २८:९, मार्क १६:९,१२,१४,लुक२४:१५,३६,५०,१करींथ १५:५-८, योहान २०:२६,२१:१)म्हणूनच प्रभु येशुचे पुनरुत्थान हे ख्रिस्ती धर्माचा आत्मा व प्राण आहे.

प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवणारे नविन आध्यात्मिक जन्म पावतात व त्यांना तारण प्राप्त होते (१पेत्र१:३-५,रोम१०:९)असे बायबल सांगते. इब्री लोकास पत्र१३:८ मध्ये असे म्हटले आहे,येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. म्हणून प्रभू येशूने म्हटले आहे,पाहा युगाच्या समाप्ती पर्यंत मी सर्व दिवस तुमच्या बरोबर आहे.(मत्तय २८:२०) आज गोंधळलेल्या जगामध्ये, हरवलेल्या अवस्थेत मानव निराश,उदास होऊन दिशाहीन जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये अपयश आले तर स्वताला संपवण्याचा विचार करीत आहे. अशा समयी प्रभू येशुने मरणावर मिळविलेल्या घटनेचे चिंतन केल्यास विपरीत परिस्थितीवर मानव विजय प्राप्त करू शकतो.आजही इस्राएल देशात प्रभु येशु ख्रिस्ताची रिकामी कबर जगाला साक्ष देत आहे. जगातील बहुतांश लोक येथे भेट देत आहेत व प्रभु येशु ख्रिस्ताच्या दुसऱ्यांदा येण्याची वाट पहात आहे. पुनरुत्थीत प्रभु येशुला मनापासून धन्यवाद. आमेन.

**- सुनील मोरे,**
**९८८१७२१५७८**

## थोडक्यात...



### देश संरक्षणार्थ हरिभाई देवकरणच्या एनसीसी कॅडेटचे योगदान : मेजर बनसोडे

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

देश संरक्षणात हरिभाई देवकरण कॉलेजमधील एनसीसी कॅडेट्सचे मोठे योगदान राहिले आहे. हरिभाई देवकर कॉलेजची ही उज्वल परंपरा चालत राहील असा विश्वास एनसीसी ऑफिसर मेजर बी.डी. बनसोडे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत येणाऱ्या हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयात नवीन एनसीसी ऑफिसच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. एनसीसी, सोलापूरचे ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर लेफ्टनंट कर्नल बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी, प्राचार्या स्मिता कांगुणे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे, पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत, औदुंबर सर्वगोड, महिंद्र रणधीर, गणेश नेवरे, मारुती शहाणे, प्रा.प्रमोद चुंगे, प्रा.अक्षय गवळी, प्रा.राजशेखर पुजारी, प्रा.अरविंद नडखांबे, प्रा.श्रीराम कुलकर्णी उपस्थित होते. हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयात १९७७ साली ५३ कॅडेट्सचे सिनिअर डिव्हिजन एन सी सी युनिट सुरू झाले तेव्हापासून आजपर्यंत ४०० ते ५०० कॅडेट्स आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, पोलीस दल, बीएसएफ, सीआयएसएफ, सीआरपीएफ, आरपीएफ, एसआरपीएफ, एमएसएफ अशा अनेक संरक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत, असे यावेळी सांगण्यात आले.



### नूमवि शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

नू. म. वि.मराठी शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे जवाहर तिवारीजी (प्रांत नैतिक मूल्यशिक्षण) व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व प्रभूरामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच रोहिणी चौधरी यांनी आपल्या मनोगतातून चौथीच्या टप्प्यावर ही कविता सादर केली. यानंतर कथा रामायण स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते गोल्ड मेडल प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच इयत्ता चौथीच्या वर्ग शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार आळसंदे यांनी मानले.



### बोरेगाव येथे आजपासून प्रवचनमाला श्री मल्लिकार्जुन कळसारोहणानिमित्त उपक्रम

**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील बोरेगाव येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिराच्या कळसारोहण कार्यक्रमानिमित्त विशेष प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रवचनमाला ५ ते ८ एप्रिल दरम्यान दररोज रात्री ८ वाजता आयोजित करण्यात आली आहे. यावेळी प्रसिद्ध प्रवचनकार योगिराज शास्त्री यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. प्रवचनाला संगीताची साथ वीरपाक्षय्या गौडगाव, वीरेश धन्नुर तसेच बोरेगाव येथील पारिजात भजन मंडळ यांच्याकडून केली जाणार आहे.

# पाण्याच्या टाकीत आढळला मृतदेह; ‘त्या’ टाकीला नव्हते झाकण

### पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

अक्कलकोट रोड एमआयडीसीतील महापालिकेच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जमिनीखालील पाण्याच्या टाकीमध्ये एका मध्यम वयीन पुरुषाचा मृतदेह आढळला. अग्निशामक दलाच्या जवानांना ही वार्ता कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढत असताना ‘त्या’ अनोळखी मृतदेहाचे अवयव गळून पडत होते, असे प्रत्यक्षदर्शीकडून सांगण्यात आले.

याबाबतचे वृत्त असे की, एक व्यक्ती त्या परिसरात लघुशंका करण्यासाठी गेला असता त्याठिकाणी कुबक वास आला. त्यामुळे त्याने पाण्याच्या टाकीत डोकावून पाहिले असता एक मृतदेह तरंगताना दिसून आले. तेव्हा त्याने लागलीच इतर लोकांना याची माहिती दिली. ११२ फोन नंबरवरही ही माहिती देण्यात आली. त्यानुसार पोलिस, अग्निशामक दलाचे जवान आणि रुग्णसेवक लादेन घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाचे जवान आणि रुग्णसेवक लादेन यांनी जीवनरक्षक साहित्यांचा वापर करुन त्या पाण्याच्या टाकीत उतरले. दोन तासाच्या अथक परिश्रमानंतर मृतदेह बाहेर काढण्यात त्यांना यश आहे.

४५ ते ५० वर्षाचा अनोळखी पुरुषाचा मृतदेह होता. शासकीय रुग्णालयात दाखल करुन घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. येथील ‘त्या’ पाण्याच्या टाकीला कोणत्याही प्रकारचे झाकण नव्हते. चार ते पाच दिवसांपुर्वी सदर इसम या पाण्याच्या टाकीत पडला असावा, असा अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. मृताची ओळख पटवण्याचे काम सुरु आहे. या टाकीतील पाणी पिण्यासाठी वापरले जात नसल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. या घटनेने महापालिकेच्या पाण्याच्या टाक्यांच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. ज्या टाकीत मृतदेह आढळला, त्याच्या शेजारीच आणखी काही उंच पाण्याच्या टाक्या आहेत. या परिसरात दररोज मद्यपींचा ठिय्या पाहायला मिळतो, तेथे सुरक्षा नसल्याने कुणाचाही बावर असतो. हजारो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मृतदेह कुजल्या मुळे लोकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## हातात तलवार घेऊन दहशत माजविणारा पोलिसांच्या ताब्यात

### सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

रोडवर हातामध्ये लोखंडी तलवार घेवुन दहशत माजविणाऱ्या व्यक्तीस शहर गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. दि. ०४ एप्रिल २०२६ रोजी गुन्हे शाखेकडील स.पो.नि. शंकर धायगुडे व त्यांचे तपास पथकाला एक इसम संत तुकाराम चौकाजवळील एसटी स्टॅन्ड नं. ०२ चे समोर गुरूनानक चौकाकडे जाणाऱ्या रोडवर हातामध्ये लोखंडी तलवार घेवुन जोरजोरात आरडाओरड करुन सदर ठिकाणी दहशत माजवत आहे. अशी माहिती मिळाली. त्याअनुषंगाने त्या इसमास शिताफीने पोलिसांनी ताब्यात घेतले.

मोहन नागनाथ पोतु, वय ३७, रा. १६ शास्त्रीनगर, शिवलिंग मंदिराजवळ, सोलापूर असे नाव असल्याचे त्याने सांगीतले. त्याच्या उजव्या हातात असलेली ०२ फुट लांबीची लोखंडी तलवार ताब्यात घेवुन जप्त करण्यात आली. त्या इसमाने बेकायदेशीररित्या अज्ञात उद्देशाने त्याच्या ताब्यात लोखंडी तलवार बाळगली म्हणुन त्याच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कामगिरी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, डॉ. अश्वीनी पाटील, पोलीस उप-आयुक्त राजन माने, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे, अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. शंकर धायगुडे व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार पोह/अंकुश भोसले, शैलेश बुगड, पोशि/राजु वाघमारे, अभिजीत धायगुडे यांनी केली.

## बाबू जगजीवनराम यांच्या जयंतीनिमित्त आज कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

मोची समाजाचे सुपुत्र व भारताचे माजी उपपंतप्रधान स्व. बाबू जगजीवनराम यांची ११८ वी जयंती येत्या रविवार, ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता सात रस्ता येथील बीएसएनएल कार्यालयाजवळ साजरी करण्यात येणार आहे.



हा कार्यक्रम श्री आदि जांबमुनी सरडगीचे मोची समाज सेवा मंडळ, शिवाचार्य शहर-जिल्हा सोलापूरच्यावतीने दिव्य आयोजित करण्यात आला आहे. या यावेळी कार्यक्रमास सोलापूर लोकसभेच्या देवरूखासदार प्रणिती शिंदे, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, प्रकाश यलगुलवार, महापौर संजय हेमगड्डी आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यावेळी समाजातील विविध पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते सहभागी होणार असून कार्यक्रम कार्यक्रमासाठी उत्साहात पार पडणार आहे. तरी नारी, बंकलंगी, मोची समाजातील बांधवांनी गावांतील मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, पंचक्रोशीतील असे आवाहन जिल्हाध्यक्ष सैदप्पा संख्येने उपस्थित जंगडेकर, मोहन जंगम व श्याम म्हेत्रे यांनी केले आहे.

# काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी रस्सीखेच; निरीक्षक, प्रभारी आज येणार सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ एप्रिल-**

सोलापूर शहर अध्यक्षपद बदलाच्या विषयावरुन काँग्रेसच्या वर्तुळात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शहराध्यक्षपदाची माळ आपल्या गळ्यात घालून घेण्याकामी अनेकजण इच्छुक असून यासाठी जोरदार रस्सीखेच सुरु असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, दिल्लीचे निरीक्षक, महाराष्ट्राचे प्रभारी रविवार, दि.५ एप्रिल २०२६ रोजी सोलापुरात येणार असल्याचे सांगण्यात येते.



काँग्रेसचे विद्यमान शहराध्यक्ष चेतन नरोटे यांची फेरनिवड करण्यात येणार असल्याचे एका गटाकडून सांगण्यात आले. तर दुसरीकडे माजी महापौर संजय हेमगड्डी यांच्यासह सुनील रसाळे, राजन कामत, उदय चाकोते, अंबादास गुत्तीकोंडा, सुभाष चव्हाण, नागनाथ कदम यापैकी एकाची किंवा अन्य तिसऱ्या व्यक्तीच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ घालण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. दिल्लीचे निरीक्षक, महाराष्ट्राचे प्रभारी हे तीन दिवस सोलापुरात मुक्काम ठोकत अध्यक्ष निवडीविषयी सर्वांचे मनोगत-म्हणणे ऐकून घेणार आहेत. शहराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी माजी आमदार धीरज देशमुख, जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी मोहन जोशी हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. भाऊसाहेब आसबे, यशराज पारखी, बाबा शेख, सुतार हे मदतीला असणार आहेत. सोलापूर शहर मध्य, शहर उत्तर व दक्षिण विधानसभा मतदारसंघातून एक शहराध्यक्षाची नेमणूक होणार आहे. मोहोळ, अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, पंढरपूरसाठी एक जिल्हाध्यक्ष, तर माढा, माळिशरस, करमाळा, सांगोला यासाठी एक जिल्हाध्यक्ष असे दोन जिल्हाध्यक्ष नेमण्यात येणार आहेत. दरम्यान, सध्याच्या जिल्हाध्यक्षांची निवड ही सात महिन्यांपूर्वीच झाली आहे. त्यामुळे ते बदलणार नाहीत अशी चर्चा आहे.

# महिनाभरात मिळणार जयपूर फूट आणि कॅलिपर

### ● वडिलांच्या वाढदिवसानिमित्त संकेत आणि ॲड.सुरेल शहा यांचा उपक्रम ●

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ एप्रिल-**

मोफत जयपूर फूट शिबिरात शनिवारी १६० दिव्यांगांच्या पायाचे माप घेण्यात आले. सुनील शहा यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त संकेत शहा, ऍड. सुरेल शहा आणि माऊली फाउंडेशन (काळबादेवी मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्मारक येथे हे शिबिर घेण्यात आले. वडिलांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून शहा बंधूंनी सामाजिक ऋण फेडण्याच्या हेतूने हा कौतुकास्पद उपक्रम राबविला. महिनाभरात या दिव्यांगांना मोफत जयपूर फूट, कॅलिपर देण्यात येणार आहे.





या शिबिराचे उद्घाटन भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ॲड. अनिल सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती संदेश पाटील, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह राजपूत, सुनील शहा, संकेत शहा, ॲड. सुरेल शहा, बाळासाहेब गायकवाड, ॲड. विश्वनाथ टाळकुटे, ओनिल गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात दिव्यांगांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना दैनंदिन जीवनात कामे करताना कृत्रिम पाय व कॅलिपरची आवश्यकता प्रकर्षाने भासते. कृत्रिम पाय, कॅलिपर नसल्यामुळे नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यातून अनेक दिव्यांग बांधवांमध्ये न्यूनगंडाची भावना तयार होऊन त्यांचा आत्मविश्वास कमी होतो, असे यावेळी सांगण्यात आले.

#### दिव्यांग बांधवांनी मानले आभार

अत्यंत खर्चिक असल्यामुळे जयपूर फूट, कॅलिपर पासून आम्ही आजवर वंचित राहत होतो. शहा परिवार, माऊली फाउंडेशन यांनी मोफत जयपूर फूट शिबीर आयोजित करून दिव्यांगांना मोठा आधार दिला आहे असे सांगत दिव्यांग बांधवांनी संकेत शहा, ॲड. सुरेल शहा आणि शहा परिवाराचे आभार मानले.

#### सामाजिक कार्याचे आत्मिक समाधान

वडिलांच्या वाढदिवसानिमित्त समाजाला उपयोगी असणारा उपक्रम राबवावा असा मानस होता. त्यातूनच मोफत जयपूर फूट शिबिराची संकल्पना पुढे आली. लवकरच या सर्व १६० दिव्यांग बांधवांना मोफत जयपूर फूट, कॅलिपर देण्यात येणार आहे. दिव्यांग बांधवांना स्वावलंबी करण्यासाठी काम करता येत असल्याचे आत्मिक समाधान आहे, असे ॲड.सुरेल शहा यांनी सांगितले.

### बँकिंग कायदा सुधारणा अधिनियम

## ९० टक्के अनुभवी संचालक अपात्र ठरण्याची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

सहकार क्षेत्रात मोठे बदल घडविणारा बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ चा विचार करता ९० टक्के अनुभवी संचालक अपात्र ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या अधिनियम अन्वये जिल्हा मध्यवती सहकारी बँका, नागरी सहकारी बँकांच्या संचालकांवर मर्यादा घालण्यात आली आहे.

या कायद्यानुसार सलग दोन टर्म पूर्ण केलेल्या संचालकांना पुढील निवडणूक लढविता येणार नाही. सोलापूर जिल्ह्यातील अनेक बडे नेते, सहकारी बँकांच्या संस्थापकांना या नियमाचा फटका बसण्याची आणि सहकार चळवळीसमोर नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता होत आहे.





राज्याच्या सहकार मंत्रालयाने या कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना दिले आहेत. दहा वर्षांपेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तींना निवडणुकांपासून दूर राहावे लागणार आहे. तर दुसरीकडे या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अस्तित्व मेकर्स संस्थेचे कार्य सोलापूरच्या सांस्कृतिक क्षेत्रात प्रेरणादायी: डॉ.सुहासिनी शहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

सोलापूरच्या सांस्कृतिक क्षेत्रात अस्तित्व मेकर्स फाउंडेशन संस्थेचे कार्य प्रेरणादायी असून लघुपट महोत्सवाच्या माध्यमातून सोलापूरच्या रसिकांना उत्कृष्ट संधी अस्तित्व मेकर्स फाऊंडेशनच्या माध्यमातून मिळाली आहे, असे गौरवोद्गार प्रिसिजन फाउंडेशन च्या अध्यक्षा डॉ सुहासिनी शहा यांनी काढले.



अस्तित्व मेकर्स फाउंडेशन व निर्मल कुमार फडकुले सभागृह यांच्या संयुक्त विद्यमाने लघुपट चित्रपट महोत्सवाचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या लघुपटातील सिंधुदुर्गाचा नटराजा व मुंबईचा फ्रेम्स लघुपट सर्वच रसिकांना खूपच भावले असल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. किरण लोंढे यांनी यावेळी नमूद केले. या प्रसंगी दत्ताजी गायकवाड, श्रद्धा जवंजाळ, शशिकांत पाटील, डॉ.राजीव दबडे, डॉ. अतुल वेलणकर, विजयकुमार साळुंखे, संजय सावंत तसेच मुख्य संयोजक बसवराज सलगर आदी उपस्थित होते. या लघुपट महोत्सवाचे हे सलग आठवे वर्ष असून, मागील आठ वर्षांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील नवोदित तसेच लघुपट क्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शकांनी साकारलेल्या उत्कृष्ट लघुपटांची मेजवानी सोलापुरातील रसिक प्रेक्षकांना मिळाली. त्यापैकी उत्कृष्ट ७ लघुपटांची निवड करण्यात आली होती ही निवड पुणे येथील दिग्दर्शक योगेश भिसे तसेच दिग्दर्शक व फिल्म एडिटर सचिन जगताप यांनी परीक्षक म्हणून केले होते. निवडलेल्या उत्कृष्ट लघुपटांचे स्क्रीनिंग डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिर शेजारी, सोलापूर येथे करण्यात आले. या प्रसंगी लघुपटांचे दिग्दर्शक व कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

#### निवडलेले ७ उत्कृष्ट लघुपट

नटराजा (सिंधुदुर्ग), कूस (पुणे), सुलतान (सातारा), फ्रेम्स, त्या भेटीनंतर, साठीतला शम्मी, अंदर की बात (सर्व मुंबई)

# बुरुड समाजातर्फे बांबू हस्तकला प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ एप्रिल-**

शहर बुरुड समाजाच्यावतीने आयोजित बांबू हस्तकला प्रशिक्षण शिबिर उत्साहात ॐ यशस्वीरीत्या पार पडले. बांबू रिसर्च विकास संस्था यांच्या सहकार्याने हे शिबिर अँड टेनिंग सेंटर आणि पर्यावरण सभ्यता आयोजित करण्यात आले होते.

बोरामणी नाका येथील नंदकिशोर झाला. वडतिले यांच्या कार्यालयात या आठ दिवसीय शिबिराचा समारोप सभ्यता विकास संस्थेचे संचालक सचिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यावरण सोनवले हे होते. याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा व प्रशिक्षिका अश्विनी पळसे बुरुड समाजाचे अध्यक्ष सूर्यकांत शेंद्र, कार्याध्यक्ष पंडित वडतिले आदींची उपस्थिती होती. शिबिरार्थी महिलांना बांबू रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर यांचे प्रमाणपत्र व किटचे वितरण करण्यात आले. दरम्यान, सोलापूरसाठी सीएफसी सेंटर लवकरच सुरु करण्याची मागणी करण्यात आली. त्याचा चिंचपल्ली, चंद्रपूर यांच्याकडे करण्याचे व पाठपुरावा बांब संशोधन व प्रशिक्षण केंद. सोलापूरला हे सेंटर लवकरच सुरु करण्याचे आश्वासन सोनवले यांनी दिले. तर समाजाचे अध्यक्ष शेंद्रे यांनी शिबिरामध्ये सहभागी महिलांनी बांबूपासून बनवलेल्या क मेसाई देवस्थानचे अध्यक्ष शिवानंद शोभेच्या विविध वस्तंचे कौतुक केले. वडतिले. लखन जतकर आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरातील महिलांनी समाधान व्यक्त करत अशा प्रकारचे शिबिर पुन्हा आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी शुभम रोहिटे, सचिन वडतिले, संदीप सुरवसे, गणेश सुरवसे, योगेश वडतिले, नितीन वडतिले, दीपक रोहिटे, वैभव वडतिले, सागर रोहिटे आदींचे सहकार्य लाभले. आभार विष्णू साळुंके यांनी मानले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## टरबूजाचे दर घसरले, प्रति किलो ५ रुपयाने विक्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** जिल्ह्यात टरबुजाच्या वाढत्या आवकेमुळे बाजारभाव कोसळले असून शेतकऱ्यांना केवळ ५ रुपये प्रति किलो दराने माल विकावा लागत आहे. सध्या दररोज सुमारे ६० ते ७० टन टरबुजांची आवक होत असल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात पुरवठा वाढला आहे. परिणामी मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्याने दरात घसरण झाली असून शेतकऱ्यांना कवडीमोल भाव मिळत आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.काही ठिकाणी वाहतूक खर्च परवडत नसल्याने टरबुज शेतातच टाकून देण्याची वेळ आली आहे.

यातच अवकाळी पावसाने परिस्थिती आणखी बिकट केली आहे. अचानक पडणाऱ्या पावसामुळे टरबुजांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून अनेक ठिकाणी पिके सडण्यास सुरुवात झाली आहे. पावसामुळे साठवण आणि वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम होत आहे. त्यामुळे बाजारात येणाऱ्या टरबुजाची गुणवत्ता घसरल्याने दर आणखी कमी होत आहेत. या दुहेरी फटक्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

टरबुज पिकासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खत, औषधे, मजुरी तसेच सिंचनासाठी मोठा खर्च करावा लागतो. अनेकांनी कर्ज काढून शेती केली आहे. मात्र सध्याच्या दरामुळे खर्चही निघत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. बाजारात व्यापाऱ्यांकडून कमी दर दिला जात असल्याने शेतकऱ्यांकडे पर्याय उरलेला नाही.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

# परशुराम जयंतीनिमित्त समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

## लातूरात परशुराम जयंतीची बैठकीत जोरदार तयारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** राजराजेश्वर भगवान परशुराम जन्मोत्सव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने यंदाही उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा उपक्रम आता तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. संजय पांडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे.यंदाच्या उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भगवान परशुराम मंदिरात यज्ञयागाचाही विशेष कार्यक्रम होणार आहे. समाजातील सर्व घटकांनी वर्षातून एकदा एकत्र येत परशुराम जयंती साजरी करावी, असा समितीचा मनोदय आहे.





यावर्षी प्रथमच वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. संतोष देशपांडे यांची अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे नियोजन आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संघटित राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत ब्राह्मण सेवा संघ, लोकमान्य टिळक विचार मंच, माध्व मंडळ (उत्तरादी मठ), लक्ष्मी नृसिंह बचत गट, समर्थ अन्न सेवा, विद्यावर्धिनी प्रतिष्ठान, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, ब्राह्मण ऐक्य परिषद, इइछ ग्रुप, बॉन्ड ऑर्गनायझेशन, पुरोहित संघ तसेच विविध महिला गट आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ‌‌अमृत योजनाफची माहिती समाजातील उद्योजकाना देण्याचे ठरले. तसेच इइछ महिला व पुरुष उद्योजकांसाठी प्रदर्शन भरविणे, १०० रक्तदात्यांचा संकल्प, तरुणांचा सहभाग वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान महिला मंडळाच्या वतीने आनंदाची बातमी देण्यात आली असून, लातूरमध्ये ब्राह्मवृंद परिवारासाठी विशेष शॉपिंग फेस्टिवल आयोजित करण्यात येणार आहे. या फेस्टिवलमध्ये इइछ समूहातील महिला व पुरुषांना त्यांच्या व्यवसायातील उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावण्याची संधी मिळणार असून हे इइछ मेंबर साठी स्टॉल पूर्णपणे मोफत असणार आहेत.स्टॉल बुकिंगसाठी अनुराधा औसेकर व धनश्री जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागा मर्यादित असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.एकूणच, परशुराम जयंती निमित्ताने समाज एकत्र आणण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचा मोठा प्रयत्न यंदा पाहायला मिळणार आहे. अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष डॉक्टर संतोष देशपांडे यांनी दिली आहे.

## विविध वृत्त...

### अविनाश पाटील यांना कला गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** आर्ट बिट्स फौंडेशन पुणे तर्फे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा कलावंतास दिला जाणारा ‘‘ कला गौरव‘‘ पुरस्कार या वर्षी युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांना जाहीत झाला आहे.या संस्थेचे हे पंचविसावे वर्ष आहे. पाटील हे पं. प्रमोद पाटील व पं. उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. तबला वादनात त्यांनी संगीत अलंकार व एम ए तबला ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशातील अनेक मानाच्या संगीत महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केली आहे.



परदेशातील दुबई, अबुधाबी, मालदीव, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वत्झर्लंड, डेन्मार्क, जर्मनी, पोलंड, स्पेन, आयर्लंड, स्कॉटलंड आणी लंडन येथी सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे. पाटील यांनी कला क्षेत्रात स्व कर्तुत्वावर अतिशय चिकाटीने, कष्टाने, जिद्दीने, मेहनतीने संघर्ष करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वताची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारतासह जगभरातील आज अनेक विद्यार्थी त्यांच्या कडे तबला वादनाची तालीम घेत आहेत.

### स्पोर्ट्स कोट्यातून अमर येमलेची पोलीस दलात दमदार एन्ट्री!



**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी अमर येमले याने मोठे यश संपादन केले आहे. स्पोर्ट्स कोट्यामधून त्याची नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

अमर येमले हा महाविद्यालयाचा क्रीडाप्रेमी व मेहनती विद्यार्थी असून, अ‍ॅथलेटिक्स क्षेत्रात त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आजवर विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे करिअर घडविले असून, चार्टर्ड अकाउंटंट, प्रशासकीय अधिकारी तसेच यशस्वी उद्योजक घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. अमर येमलेचे यश हे त्याच परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात शुक्रवारी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते अमर येमलेचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे उपस्थित होते. अमर येमलेच्या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अमरने हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी स्वीकारला पदभार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज (दि.०४) मावळत्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून पदभार स्वीकारला. श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## व्हर्व्ह सिझन ५ मध्ये चमकली गुणवत्ता!

### विद्या सूर्यवंशी ठरली ‘स्टुडंट ऑफ द इयर’; पायल जाधवला ‘लीडरशिप एक्सलन्स’ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे आयोजित ‘व्हर्व्ह सिझन ५’ या भव्य स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण १२२६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याची झलक सादर केली. विद्यार्थ्यांमधील व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.




या स्पर्धेअंतर्गत ६ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधून उत्कृष्ट कामगिरी करणारे ८४ विद्यार्थी ‘स्टुडंट ऑफ द इयर’ स्पर्धेसाठी पात्र ठरले. अंतिम फेरीत एलिमिनेशन राऊंड, ग्रुप डिस्कशन आणि पर्सनल इंटरव्ह्यू अशा तीन टप्प्यांत तज्ञ परीक्षकांनी विद्यार्थ्यांची कसून चाचणी घेतली. या स्पर्धेत बी.कॉम. प्रथम वर्षातील कु. विद्या सूर्यवंशी हिने सर्वांगीण उत्कृष्ट कामगिरी करत ‘स्टुडंट ऑफ द इयर’ हा बहुमान पटकावला. तसेच बीबीएच्या कु. पायल जाधव हिला ‘लीडरशिप एक्सलन्स’ पुरस्काराने गौरविण्यात आले. या दोघींचा महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. परीक्षक म्हणून प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण आणि प्रा.डॉ. नरेश पिनमकर यांनी काम पाहिले. व्हर्व्ह समन्वयक डॉ. लक्ष्मीकांत सोनी यांनी प्रभावी नियोजन करून स्पर्धेला यशस्वी रूप दिले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. लक्ष्मीकांत सोनी, डॉ. आकांक्षा भांजी, प्रा. दगडू शेख, डॉ. प्रेमसागर मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. क्षितिज कांबळे आणि प्रा. प्रसाद पाटील यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले.

यश हे एकाच दिवशी मिळत नाही, ते सातत्य, आत्मविश्वास आणि प्रत्येक संधीला दिलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमधून घडतं. स्वतःवर विश्वास ठेवा आणि पुढे जात राहा. स्वतःमध्ये असणारे कौशल्य ओळखता आले पाहिजे. आलेल्या प्रत्येक संधीचं सोनं आपल्याला करता आलं पाहिजे. आत्मविश्वास हाच महत्वाचा पैलू आहे असे विद्या सूर्यवंशी म्हणाली.

## डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** येथील प्रसिध्द अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांचा ५५वा वाढदिवस विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, मोफत हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबिर आदी विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

डॉ. पोद्दार ऍक्सिडेंट ऍण्ड ट्रॉमा केअर सेंटरच्यावतीने मागील २८ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत जिल्हाभरात आतापर्यंत १७० मोफत आरोग्य शिबिरे घेण्यात येऊन रुग्णांना अल्प दरात औषधीचे वितरण करण्यात आले. दरवर्षी उन्हाळ्यात हॉस्पिटलसमोर पाणपोई सुरू करण्यात येते. शुक्रवारी डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त हॉस्पिटलतर्फे रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करण्यात आली. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांनी डॉ. पोद्दार यांचा सत्कार केला. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, डॉ. दीपक गुगळे, डॉ. सुरेश भट्टड, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. विश्वास कुलकर्णी, जयेश बजाज, डॉ. प्रसाद उदगीरकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# सत्ताधाऱ्यांची निष्क्रीयता आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकर पाण्यापासून वंचित

## नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा शितल मालू यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** काही महिन्यापूर्वीच लातूर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांनी लातूरकरांना २४ तास व सात दिवस शुध्द पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला भुलून लातूरकरांनी मनपाची सत्ता काँग्रेसच्या हाती दिली. मात्र सत्ता हाती येताच लातूरकरांना वायावर सोडण्याचे काम आ. अमित देशमुख यांनी केले आहे. सत्ताधायांच्या निष्क्रियतेमुळे आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकरांना गेल्या चार दिवसांपासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागल्याचा आरोप नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शितल मालू यांनी केला आहे. लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळीत होवून शुध्द पाणी लातूरकरांना न मिळाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शितल मालू यांनी दिला आहे.

लातूरकरांनी लातूर मनपा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत करोडो रुपयांचा कर भरला असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे यावर्षीतर विक्रमी कर वसूली झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगितले आहे. या कररुपी आलेल्या पैशातून लातूरकरांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे आठवण करून देत शितल मालू यांनी या पैशाच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याचे वीजबिल का अदा करण्यात आले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. प्रशासनाचे उदासिन धोरण आणि त्याला मिळणारी सत्ताधायांची निष्क्रियतेची साथ यामुळे लातूरकरांना धरणात पाणी असूनही पाण्यापासून वंचित रहावे,लागत आहे. मनपा निवडणुक प्रचारादरम्यान मोठ मोठी आश्वासने देणारे शहराचे आमदार तथा काँग्रेस नेते अमित देशमुख यांनाही लातूरकरांशी काहीच देणे घेणे नसल्याचे या माध्यमातून पुन्हा एकदा समोर आले आहे. आ. देशमुख यांनी या प्रकरणी लक्ष घालून महापौर व त्यांच्या टीमला सूचना दिल्या असत्या तर लातूरच्या पाणीपुरवठ्याची वीज खंडीत झाली नसती असा आरोपही शितल मालू यांनी केलेला आहे.



पाण्याच्या राजकारण करून निवडणुका नेहमीच लढविणाया काँग्रेसच्या मंडळींना इशारा देत शितल मालू यांनी लवकरात लवकर लातूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होवून नागरिकांना शुध्द पाणी मिळाले नाही तर तिव्र आंदोलन करण्यात येईल, असेही स्पष्ट केले आहे.

## संक्षिप्त...

### धीरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत कॅन्सर रोगनिदान शिबिर

तभा वृत्तसेवा

**रेणापूर:** लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन काँग्रेसचे माजी आ. धीरज देशमुख यांच्या वाढदिवसा निमित्त पोहरेगाव येथे प्रथमच मोफत कर्करोग (कॅन्सर) निदान शिबिराचेआयोजन पोहरेगाव जिल्हा परिषदेच्या सदस्य मनीषा गंगासिंह कदम यांनी केले आहे.



पोहरेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सोमवार दि. सहा रोजी सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळत होणार असून या शिबिरास लातूर येथील कॅन्सर तज्ञ डॉ.एच.एस गडदे हे प्रमुख मार्गदर्शन,तपासनी करणार आहेत.

जनतेत कॅन्सरचा इशारा देणारी लक्षणे आढळून आल्यास स्त्रियांच्या बाबतीत औषधोपचार करून ही पांढरा पदर जाणे.शरीरात कोठेही गाठ अथवा लठ्ठपणा जाणवणे विशेष स्त्रियांमध्ये अन्न गिळताना छातीत अडकल्यासारखे वाटने उलटी होणे सतत खोकला किंवा घसा बसल्या सारखा वाटणे, संडास होण्यास सवयी आकस्मित झालेला बदल शरीरात कोठेही चामखीळ,तीळ असल्यास त्याच्या आकारात रंगात बदल होणे. अंगावर तांबडे जाणेअशी लक्षणे आढळून येणाऱ्यांनी या मोफत कर्करोग कॅन्सर शिबिराचा सल्ला व लाभ घ्यावा असे आव्हान केले आहे.

### कासार शिरसी येथील श्री करिबसवेश्वर यात्रा महोत्सवास प्रारंभ

तभा वृत्तसेवा

**कासार शिरसी :** निलंगा तालुक्यातील कासारशिरसी येथील ग्रामदैवत श्री करिबसवेश्र्वर महाराज यांच्या यात्रा महोत्सवास ०४ एप्रिल रोजी प्रारंभ झाला असून ही यात्रा ०४ ते १० एप्रिलपर्यंत चालणार आहे. या यात्रा महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचा प्रारंभ श्री करिबसवेश्र्वर मठाचे मठाधिपती म.नि.प्र. श्री गुरु मुरगेंद्र महास्वामी यांच्या हस्ते षटस्थल ध्वजारोहण करून करण्यात येणार आहे. या यात्रे दरम्यान दररोज सकाळी श्री स महारुद्राभिषेक , श्री करी बसवेश्र्वर लीलामृत ग्रंथ पारायण वाचन , दुपारी महाप्रसाद व सायंकाळी गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येईल.





यात्रेनिमित्त ०४ ते १० एप्रिल पर्यंत गड्डा यात्रा (जनावरांचा बाजार) भरविण्यात आला आहे. मंगळवार दि.७ रोजी एप्रिल रोजी सकाळी १० वाजता महापूजा करण्यात येईल. ८ एप्रिल रोजी सकाळी बसवमूर्ती आणणे व अग्नी पूजा होईल तर ९ एप्रिल रोजी पहाटे शहरातून पालखी व नंदीध्वज मिरवणुकीनंतर महास्वामींचे आशीर्वचन होईल. त्यानंतर अग्नी प्रवेश (आग्गी) होईल. अग्नी प्रवेशानंतर महाप्रसाद होईल. सायंकाळी भव्य असे शोभेचे दारूकाम (बारूद) होईल तर १० एप्रिल रोजी भव्य जंगी कुस्त्याने या यात्रेची सांगता होईल. या यात्रा महोत्सवाला म.नि.प्र. डॉ.श्री शिवलिंगेश्र्वर महास्वामीजी विरक्त मठ संख जि. सांगली म.नि.प्र. सिद्धलिंग महास्वामीजी विरक्त मठ बसवन बागेवाडी जि. विजयपूर यांचे दिव्य सानिध्य लाभणार आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व सद्भक्तांनी या यात्रा महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा समितीचे अध्यक्ष प्रवीण हळकुंदे, गिरीश चिंचनसुरे, किरण शीलवंत, सचिन कडतने, मोनेश्र्वर पांचाळ, शिवय्या मठपती, नागू शाबादे, सिद्धू अरबाळे, प्रकाश नागराळे आदींनी केले आहे.

### सुदृढ व निरोगी आरोग्यासाठी संतुलित आहार-विहार आवश्यक - डॉ.श्रीधर अहंकारी

तभा वृत्तसेवा

**निलंगा :** बदलत्या जीवनशैलीमुळे विशेषतः तरुण पिढीत हृदयविकाराचे वाढते प्रमाण चिंताजनक असून सुदृढ व निरोगी आरोग्यासाठी संतुलित आहार-विहार आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ.श्रीधर अहंकारी, निलंगा यांनी केले. शिक्षणमहर्षी विश्र्वनाथराव वलांडे गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, लाईफ लाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने निलंगा तालुक्यातील तगरखेडा येथे आयोजित आरोग्य शिबिरात 'हृदयाची काळजी' याविषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, संचालक मडोळय्या मठपती, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, डॉ.योगेश जाधव, डॉ.किरण माने, डॉ. ज्ञानेश्र्वर कदम, डॉ.सुनील पोतदार, डॉ.सविता भारती, डॉ. शरद मठपती, उपसरपंच मदन बिरादार, वैजनाथ वलांडे इत्यादी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.श्रीधर अहंकारी यांनी नियमित व्यायाम, मैदानी खेळास प्राधान्य, जंक फूड व व्यसनांपासून दूर रहावे असे सांगितले. मोबाईलचा अतिवापर आरोग्यासाठी घातक असून मोबाईलचा मर्यादित व सुयोग्य वापर करावा. प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत जागरूक रहाण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ.ज्ञानेश्र्वर कदम व रंजीत सुर्यवंशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आनंद मुसळे यांनी केले.

आरोग्य शिबीराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, लाईफ लाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व प्राथमिक आरोग्य केंद्राचा सर्व स्टाफ, तगरखेडा ग्रामपंचायत व ग्रामस्थ, आशा कार्यकर्ती, आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ इत्यादींनी मौलिक परिश्रम घेतले. प्रस्तुत आरोग्य शिबीरात लातूर येथील पोटविकार तज्ज्ञ डॉ.किरण माने व किडनी तज्ज्ञ डॉ.योगेश जाधव, निलंगा येथील मधुमेह तज्ज्ञ डॉ.श्रीधर अहंकारी व हृदयविकार तज्ज्ञ डॉ.सुनील साळुंके, औराद शहाजानी येथील बालरोग तज्ज्ञ डॉ.ज्ञानेश्र्वर कदम व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनील पोतदार, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तगरखेडा येथील डॉ.सविता भारती आणि सर्व डॉक्टरांचा वैद्यकीय स्टाफ यांनी ३७५ जणांची आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, ई.सी.जी., औषधोपचार व अनुषंगिक सल्ला - मार्गदर्शन करण्यात आले.

# आपल्या भागातील धार्मिक स्थळे विकसित करणार : मा. मंत्री आमदार संजय बनसोडे

## श्री मलयाप्पा मंदिराचा कळशारोहण सोहळा

तभा वृत्तसेवा

**अहमदपूर, दि. ०४ एप्रिल :** उदगीर मतदार संघाचा सर्वांगीण विकास करताना मतदार संघातील सर्व जाती - धर्मांना न्याय दिला. उदगीर व जळकोट तालुक्यातील विविध गावातील सर्व धार्मिक स्थळांना निधी उपलब्ध करून देवून त्यांचा विकास केला. या पुढील काळातही श्री मलयाप्पा मंदिराला ये - जा करण्यासाठीचा रस्ता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून करणार असल्याचे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

ते नांवदी ता.उदगीर येथील श्री मलयाप्पा मंदिराच्या कळशारोहण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.



यावेळी लातूर जि.प.चे बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार येणकीकर, जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरुके , ज्ञानोबा केंद्रे माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नावंदीचे सरपंच ब्रह्मजी केंद्रे, श्यराम डावळे, सर्जेराव भांगे, डॉ.गंगाधर पारगे, संतोष परगे, सतीश केंद्रे, समीर परगे, विशाल कोतागडे, रामेश्वर पाटील, अमोल बिरादार, राजकुमार बिरादार, बालाजी मादळे, संजय फुले, विष्णु फुले, सत्यवान बिरादार, जगु परगे, विठ्ठल फुले, सुरेश केंद्रे, विश्वनाथ बिरादार, दिपक तोंडारे, युवराज कांडगिरे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी आपल्या सर्वांना धार्मिक वारसा आहे. दया आणि कृपा ही ईश्र्वराची देण आहे. 'भक्ती हीच सर्वश्रेष्ठ शक्ती आहे' आणि ही भक्ती आम्हाला गुरुंनी शिकवली म्हणूनच आज या परिसरात भक्तीचा सुगंध पसरला आहे. आपण सर्वजन ईश्र्वराच्या भक्तीत तल्लीन होतो व ईश्र्वराचेच नामस्मरण करतो असे केल्याने आपल्या मनाला समाधान लाभुन ईश्र्वराच्या नामस्मरणाने ऊर्जा मिळत असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

मतदार संघातील सर्व जनतेच्या सुखासाठी श्री मलयाप्पा मंदिरात आपण दर्शन घेवुन त्यांच्या चरणी साकडे घातले आहे.

आपण सर्व माझ्या माता भगिनी व माझ्या बांधवांनी माझ्यावर मोठा विश्र्वास दाखवून दुसऱ्यांदा मोठे मताधिक्य देवुन निवडून दिलात म्हणून मी 'जे जे नव ते ते उदगीरला हवं' या ब्रीद वाक्याप्रमाणे आपल्या उदगीरचा विकास केला आहे असुन यापुढे ही विकासाची गंगा तुमच्या दारापर्यंत पोहचवणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी उदगीर सह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०४ एप्रिल :**महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभा, लातूरच्या वतीने जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सभापती दयानंद सुरवसे यांना शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले. या वेळी दयानंद सुरवसे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या समन्वयातून हा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

पदवीधर प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिक मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांना पदोनतीनंतर मिळणारी एक वेतनवाढ अद्याप मिळालेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याबाबत पत्र काढूनही प्रश्न मार्गी लागलेला नाही,प्रलंबित असलेली वेतनवाढ तात्काळ देण्यात यावी.पदोनतीनंतर ८०% शिक्षकांच्या सेवापुस्तिकेवर सातवा वेतन आयोगाची नोंद पूर्ण करण्यात यावी. मोडकळीस आलेल्या शाळा इमारती तात्काळ पाडण्यासाठी आदेश द्यावेत.समायोजन प्रक्रियेसाठी जिल्हाभर एकसमान नियमावली जाहीर करावी.आंतरजिल्हा बदलीसाठी रिक्त जागांची माहिती द्यावी. निवडश्रेणी यादी प्रसिद्ध करावी.

सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांचा तात्काळ निपटारा करावा. तसेच अनेक शिक्षक वेतनवाढी शिवाय सेवानिवृत्त होत असल्याची खंत सभेच्या वतीने व्यक्त केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष दयानंद बिराजदार, राज्य सरचिटणीस आर के.जाधव, राज्य कार्याध्यक्ष डी.सी.गायकवाड सचिव काकासाहेब ठोके आदींची उपस्थिती होती.

# MPSC पास महसूल सहाय्यक आस्मा शेख यांचा शिवसेना नेते बालाजी रेड्डी यांनी केला सत्कार



तभा वृत्तसेवा

**अहमदपूर , दि. ०४ एप्रिल :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, नगरसेवक तथा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सभापती प्रतिक रेड्डी यांच्या हस्ते चझडउ परीक्षेत घवघवीत यश मिळवून महसूल सहाय्यक अधिकारी या पदावर नियुक्ती झाल्या बद्दल आस्मा शेख यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार करण्यात आला.

तालुक्यातील खंडाळी येथील दस्तगीर शेख यांची मुलगी कु. आस्मा शेख यांनी चझडउ परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्या मुळे त्यांची महसूल सहाय्यक पदावर नियुक्ती झाली आहे. आस्मा शेख यांनी कोणत्याही खाजगी क्लासेस मध्ये न जाता अभ्यासिकेत प्रवेश घेऊन या परीक्षेची तयारी केली होती. त्यांची जिद्द, चिकाटी, मेहनत कामी आली आणि त्यांची निवड महसूल सहाय्यक अधिकारी या पदावर झाली आहे. सत्कारा वेळी आस्मा शेख यांनी भविष्यात अनेक परीक्षेत भाग घेऊन या पेक्षा मोठ्या पदावर रुजू होण्याची जिद्द त्यांनी बोलून दाखवली. माझी महसूल सहाय्यक अधिकारी या पदावर नियुक्ती झाली आहे याच सर्व श्रेय आजोबा नवाजमियाँ शेख, आई राशदबी शेख, वडील दस्तगीर शेख यांना जाते अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, शिवसेना तालुका संघटक तथा एस टी कामगार सेना प्रमुख मार्गदर्शक अनिकेत फुलारी,नगरसेवक तथा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सभापती प्रतिक रेड्डी, सपत्नीक प्रा.दुलेखाँ पठाण, सोमनाथ नवटक्के, दिलीप भालेराव उपस्थिती होती.

# कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन अभियान यशस्वी करावे –किरीट सोमय्या

तभा वृत्तसेवा

**औसा, दि. ०४ एप्रिल :** मतदार यादी अचूक व पारदर्शक ठेवण्याचे महत्व अधोरेखित करुन मतदार यादी अचूक आणि सक्षम करणे हीच लोकशाहीची मजबूत पायाभरणी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभागी होवून अभियान यशस्वी करावे. असे आवाहन भाजपा नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केले.



औसा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने औसा येथे आयोजित विधानसभास्तरीय कार्यशाळेत मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन (SIR) अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले. यावेळी भाजपा नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या बोलत होते. बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा, भिमाशंकर राचट्टे, पंचायत समितीच्या सभापती गंगाबाई कोदळीकर, भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, माजी नगराध्यक्ष सुनील मिटकरी, माजी शहराध्यक्ष सुनील उटगे, रवी चिलमे, सुभाष जाधव, नाना धुमाळ, काकासाहेब मोरे उपस्थित होते.

किरीट सोमय्या म्हणाले, गेल्या १५ ते २० वर्षात वाढलेल्या मतदान टक्केवारीचा संदर्भ देत काही गंभीर मुद्दे उपस्थित केले. काही ठिकाणी बोगस मतदानाचा वापर झाल्याचा दावा करत, बांगलादेशी, पाकिस्तानी व रोहिंग्या घुसखोरांची नावे मतदार यादीत समाविष्ट होऊ नयेत, यासाठी मतदार यादी विशेष पुनरावलोकन (SIR)' अभियान प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच, आपल्या भागात खरे भारतीय मतदार आहेत का, याची सखोल पाहणी या अभियानांतर्गत करणे आवश्यक आहे. याबाबत सखोल मार्गदर्शन माजी खा. किरीट सोमय्या यांनी केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी देशात शत-प्रतिशत भाजप सत्तेची आवश्यकता असल्याचे ठाम मत व्यक्त केले.कार्यक्रमात औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी देशाच्या विकासासाठी राज्य व केंद्रात भाजपची सत्ता कायम ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. देशाचा पंतप्रधान आणि राज्याचा मुख्यमंत्री निवडण्याचा अधिकार केवळ भारतीय नागरिकांना आहे. रोहिंग्या, बांगलादेशी किंवा पाकिस्तानी घुसखोरांना हा अधिकार नाही, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

या कार्यशाळेमुळे औसा मतदारसंघात मतदार यादी शुद्धीकरण अभियानाला अधिक गती मिळणार असून, कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भीमाशंकर राच्चाटे यांनी तर आभार सुनील मिटकरी यांनी व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर डेंग यांनी केले.

### महिला धोरण व जागरूकता कार्यक्रम उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** दयानंद कला महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने दिनांक २८ मार्च २०२६ रोजी मुलींसाठी महिला धोरण आणि जागरूकता या विषयावर एक माहितीपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी भूषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महिलांच्या सुरक्षा, शिक्षण आणि सशक्तीकरणासाठी शासनाच्या विविध धोरणांचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःची ओळख निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

# भक्ती आणि तंत्रज्ञानाचा संगम: नावंदी येथील अखंड हरिनाम सप्ताहात 'डिजिटल शेतीशाळा' उत्साहात

तभा वृत्तसेवा

**उदगीर, दि. ०४ एप्रिल :** नावंदी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने, कृषी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'विशेष डिजिटल शेतीशाळा' मोठ्या उत्साहात पार पडली. अध्यात्माच्या व्यासपीठावरून आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा अभिनव प्रयोग यशस्वी ठरला असून, उपस्थित शेकडो शेतकऱ्यांनी याचे स्वागत केले आहे.

या कार्यक्रमासाठी उपविभागीय कृषी अधिकारी श्री. श्रेयश यादव, तालुका कृषी अधिकारी श्री. संदीप वळकुंडे, मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी श्री. चव्हाण, तंत्रज्ञान समन्वयक श्री. शेंडगे आणि नावंदी गावचे सरपंच श्री. ब्रम्हाजी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या डिजिटल शेतीशाळेत , पहिल्या सत्रात 'पेरणीपूर्व तंत्रज्ञान' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने: बेड पद्धती: पेरणीसाठी बेड तयार करणे आणि त्यावर टोकण पद्धतीने लागवड करण्याचे फायदे समजावून सांगण्यात आले.

आंतरपीक पद्धत: जोखीम कमी करण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. बीजप्रक्रिया व चाचणी: पीक सुरक्षिततेसाठी बीज उगवण क्षमता चाचणी आणि बीजप्रक्रिया याचे महत्व डिजिटल माध्यमातून दाखवण्यात आले.

कीर्तनाच्या वेळी तंत्रज्ञानाचा जागर:

गावातील सामूहिक ठिकाणी मोठ्या स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. सप्ताहातील कीर्तनासाठी जमलेल्या भाविक-शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. उपविभागीय कृषी अधिकारी श्री. यादव यांचे मनोगत

श्री. यादव यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, हवामान बदलाच्या काळात शाश्र्वत उत्पन्नासाठी अशा तंत्रज्ञानाची जोड देणे काळाची गरज आहे तरी या प्रकल्पामधील विविध घटकांचा लाभ घेणे व हवामान अनुकूल तंत्रज्ञान वापर करणे बाबत आवाहन कार्यात आले.तालुका कृषी अधिकारी श्री. संदीप वळकुंडे यांचे मनोगत:

याप्रसंगी बोलताना तालुका कृषी अधिकारी श्री. संदीप वळकुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले की, अखंड हरिनाम सप्ताह हा आपल्या संस्कृतीचा आणि श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. या पवित्र व्यासपीठावरून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान देणे, हा भक्ती आणि शक्तीचा संगम आहे. आजच्या डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून आम्ही 'पेरणीपूर्व तंत्रज्ञान' थेट तुमच्यापर्यंत पोहोचवले आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी आवर्जून बीजप्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादनात घट येणार नाही. कृषी विभाग तुमच्या प्रगतीसाठी कटिबद्ध आहे.



समारोप:

या मनोगतानंतर तंत्रज्ञान समन्वयक श्री. शेंडगे यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. सरपंच श्री. ब्रम्हाजी केंद्रे यांनी कृषी विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करून आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी विभागाचे कर्मचारी आणि सप्ताहातील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे नावंदी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेतीबाबत नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

# कामाची मंजुरी एकीकडे आणि प्रत्यक्षात काम मात्र दुसरीकडे

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३ एप्रिल -**

लघुपाटबंधारे विभागाच्या माध्यमातून इस्लापूर येथील इस्लापूर किनवट हायवे रोडवरील पूल ते कोसमेट रेल्वे ब्रिज या दोन किलोमीटर अंतरावरील नाल्याच्या सरळीकरणासाठी करण्यासाठी जिल्हा विकास निधीच्या माध्यमातून लाखो रुपयांच्या निधीची मंजुरी प्राप्त झाली. सदरील नाल्यावर सरळीकरणाच्या कामास संबंधित गुत्तेदारांनी सुरुवात केली पण या नाल्यांमध्ये कुठेही दीड मीटर खोदकाम होत नसल्याने या नालासरळीकरणाच्या कामासाठी बाहेरून मटेरियल वाहनाने आणावे लागणार व नाला सरळीकरणासाठी टाकावे लागणार त्यामध्ये आपणास काही उरणार नाही हे गुत्तेदारास कळाल्यानंतर त्या गुत्तेदारांनी एक आगळीवेगळी शक्कल लढवली. व मंजूर असलेल्या नाल्यावरील काम प्रत्यक्षात बंद करून टाकले. व अचानकरीत्या ज्या नाल्याची सरळीकरण दोन वर्षांपूर्वी करण्यात आले होते त्या नाल्याकडे जेसीबी घेऊन आपला मोर्चा वळवल्याचे एक चर्चेचा विषय बनला. स्वतः गुत्तेदारांनी आपला पैसा वाचवण्यासाठी व अगोदरच झालेल्या नालासरळीकरण केलेल्या नाल्यावर काम करून पैसा झटपट कमवण्यासाठी या मार्गाचा अवलंब केल्याचे प्रत्येक्षात पहावयास मिळाल्याचे जिवंत उदाहरण



आज घडीला इस्लापूर जनतेस पहावयास मिळत आहे? एकाच रात्रीत मंजूर असलेल्या नाल्याचे काम बंद करून प्रत्येक्षात दुसऱ्या नाल्यावर च्या कामाला कशा पद्धतीने मंजुरी मिळाली हे सुद्धा न उलगडणारे कोडे आहे ?

**आदीवासी दुर्गम भागात असे प्रकार**

रातोरात कामाच्या जागेची अदलाबदल करून त्या ठिकाणी तात्काळ दुसऱ्या कामांना मंजुरी देण्याचे धाडस हे किनवट विभागाच्या अधिकाऱ्याने केले हे नवलच म्हणावे लागेल. प्रत्यक्षात कामाची अदलाबदल झालेल्या ठिकाणी कुठलेही नाला सरळीकरण करण्याच्या कामाचा फलक पहावयास मिळाला नाही अंदाजे त्यासाठी किती रक्कम मंजूर झाले हे सुद्धा पहावयास मिळाले नाही कुठेही शासकीय कामांना मान्यता मिळाली असताना व काम चालू करत असताना त्या ठिकाणी त्या कामाचे नाव फलक व अंदाजीत रक्कम नमूद केलेला फलक लावणे अपेक्षित असते पण या नाला सरळीकरण करण्याच्या कामांमध्ये कुठेही हे फलक पाहाव्यास मिळाले नाही महाराष्ट्रात अद्याप पर्यंत कुठेही अशी घटना ऐकावयास मिळाली नाही पण प्रत्यक्षात आदिवासी दुर्गम भाग असलेल्या किनवट तालुक्यात ही घटना पाहावयास मिळाली.

**इस्लापूर येथील नालासरळीकरण कामाचे चौकशीची मागणी**

**गुत्तेदार व अभियंत्यांचा पैसे कमविण्याचा नवीन फंडा**

एकंदरीत एका रात्रीत कामाची अदलाबदल करून दुसरीकडे मंजुरी देणाऱ्या त्या अभियंत्यास शासनाच्या माध्यमातून खुद मुख्यमंत्र्याच्या हस्ते पारितोषिक देण्यात यावे व खऱ्या अर्थाने कर्तव्यदक्ष असणाऱ्या व एक मुखाने भ्रष्टाचार करण्यासाठी मूकसंमती देणाऱ्या या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात यावा अशा स्वरूपाची मागणी सुद्धा या निमित्ताने या आदिवासी भागातून समोर येत आहे. अशाच पद्धतीचे या अभियंत्याने बनावट कामी कुठे कुठे करण्यास गुत्तेदारांना प्रोत्साहन दिले हे सुद्धा शोधणे आता गरजेचे बनले आहे. रातोरात गुत्तेदार व अभियंते मालामाल बनण्याचा हा नवीन तर फंडा नाही ? ना अशा स्वरूपाची चर्चा या निमित्ताने तालुका भर ऐकावयास मिळत आहेत. संबंधित गुत्तेदार व अभियंताची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशा स्वरूपाची मागणी यानिमित्ताने जनतेमधून पुढे येत आहे.

## मुदखेडचा तरुण राजू हावळे बेपत्ता

**मुदखेड-** शहरातील भीमनगर भागातील रहिवासी असलेले राजू देवराव हावळे हे मागील दोन दिवसांपासून बेपत्ता झाले असून त्यांचा सर्वत्र शोध घेऊनही अद्याप त्यांचा कोणताही पत्ता लागलेला नाही. याप्रकरणी कुटुंबातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली असून कोणालाही माहिती मिळाल्यास संपर्क साधण्याचे नम्र आवाहन केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, राजू हावळे हे दि. ३ मार्च २०२६ रोजी बारड येथून ऑटोने दुपारी १:३० वाजताच्या सुमारास मुदखेड येथे आले होते. मुदखेडात आल्यानंतर त्यांनी आपल्या एका ऑटो चालक मित्राला जेवणासाठी हॉटेलमध्ये सोबत चलण्यास सांगितले. मात्र, मित्राला काम असल्याने त्याने येण्यास असमर्थता दर्शवली. त्यानंतर राजू हावळे हे एकटेच जेवण करण्यासाठी शहरातील रेल्वे अंडर ब्रिजच्या दिशेने पायी गेले. त्यावेळेपासून ते अद्याप घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी मित्र परिवार, नातेवाईक आणि सर्व संभाव्य ठिकाणी त्यांची शोध मोहीम राबवली, परंतु अद्याप कोणतीही माहिती हाती लागलेली नाही. राजू देवराव हावळे याचे वय ३५ वर्ष, उंची ६ फुट, रंग सावळा,शर्ट पांढरा,निळी जीन्स या वर्णाबद्दल कोणालाही काही माहिती मिळाल्यास किंवा ते कुठे दिसल्यास खालील संपर्क क्रमांक: ९९२१५८४५३३ या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## देशहित आणि जनसेवेचा संकल्प; भाजप स्थापना दिनानिमित्त केराम यांचे आवाहन

**किनवट-** भारतीय जनता पक्षाच्या ४४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भाजपचे खंबीर नेतृत्व भीमराव केराम यांनी पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पक्षाची विचारधारा ही केवळ राजकारण नसून ती राष्ट्रसेवेचे माध्यम आहे, अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. यावेळी बोलताना आमदार भीमराव केराम म्हणाले की, आज भारतीय जनता पक्ष जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे, याचे संपूर्ण श्रेय हे बूथ स्तरावर अहोरात्र कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांना जाते. सामान्य माणसाच्या सुख-दुःखात धावून जाणारा कार्यकर्ता हीच पक्षाची खरी ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राबवलेल्या लोककल्याणकारी योजनांचा उल्लेख करत केराम यांनी सांगितले की, उज्ज्वला योजना, किसान सन्मान निधी आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजनांमुळे गरिबांच्या जीवनात परिवर्तन आले आहे. या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू व्यक्तीला मिळवून देणे हीच खऱ्या अर्थाने पक्षाची सेवा ठरेल. 'एकात्म मानववाद' हाच आमचा आत्मा पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला 'एकात्म मानववाद' आणि 'अंत्योदय' अर्थात शेवटच्या माणसाचा उदय हा विचार घेऊनच आपल्याला पुढे जायचे आहे. समाजातील वंचित, शोषित आणि पीडित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

## नांदेडमध्ये आज राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

शिक्षणाचे वाढते खाजगीकरण आणि बाजारीकरण यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे बदल होत असून शिक्षण ही सेवा न राहता नफ्याचे साधन बनत चालले आहे. खाजगी शाळांमधील वाढत्या शुल्कामुळे सर्वसामान्यांना शिक्षण घेणे कठीण झाले असून यामुळे शैक्षणिक विषमता वाढत आहे. गुणवत्तेपेक्षा आर्थिक क्षमता महत्त्वाची ठरत असल्याने शिक्षण क्षेत्रात कॉर्पोरेट वर्चस्व वाढत असल्याची चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. उच्च शिक्षणासमोरील प्रमुख आव्हानांमध्ये दर्जेदार शिक्षणाची कमतरता, वाढता खर्च, बाजाराधिष्ठित शिक्षण पद्धती, कालबाह्य अभ्यासक्रम, अंधश्रद्धांना चालना, संशोधनाचा अभाव, अपुऱ्या पायाभूत सुविधा तसेच ऑनलाईन शिक्षणातील डिजिटल दरी या बाबींचा समावेश होतो. या सर्व परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावरही मोठा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे.

भारतीय पिछडा शोषित संघटन, लसाकम, सप्तरंगी साहित्य मंडळ आणि बीसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शिवाजीनगरस्थित हॉटेल विसावा पॅलेसच्या कॉन्फरन्स हॉल, येथे आज रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६, रोजी सकाळी १०:०० वाजता चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे उद्घाटन होईल. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार हे राहणार असून उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक नेते डी. एम. हनुमंते यांची उपस्थिती लाभणार आहे. ही परिषद तीन सत्रांमध्ये पार पडणार आहे. पहिल्या सत्रात शिक्षणाचे बाजारीकरण आणि बहुजन समाजावर होणारे दुष्परिणाम या विषयावर फारूक अहमद मार्गदर्शन करतील. या सत्राचे अध्यक्ष एस. जी. माचनवार असून प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अमोल काळे उपस्थित राहतील. दुसऱ्या सत्रात उच्च शिक्षणासमोरील आव्हाने या विषयावर प्रा. डॉ. दिलीप चव्हाण आपले विचार मांडतील. या सत्राचे अध्यक्ष डॉ. हेमंत कार्ले असून प्रमुख उपस्थिती कॉ. उज्वला पडलवार व ॲड. एस. एम. गोरे यांची राहणार आहे.

नांदेडमधील जास्तीत जास्त नागरिक, शिक्षणप्रेमी व विद्यार्थ्यांनी या परिषदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# आदिवासींवर अन्याय होऊ देणार नाही : आ.भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ एप्रिल -**



आदिवासी पेसा शिरपूर शिवारात निर्माण होणाऱ्या स्टोन क्रेशर प्रकल्पाला आजूबाजूच्या आदिवासी शेतकऱ्यांचा विरोध आहे. या स्टोन क्रेशर ला वीज पुरवठा करण्यासाठी नियमबाह्य पद्धतीने आदिवासीच्या शेतात विजेचे बारा खंबे रातोरात उभे केले.यासाठी आदिवासी शेतकऱ्यांची साधी परवानगी किंवा संमती सुद्धा घेण्यात आली नाही. बेकायदेशीर काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल झाले याविषयीं आज मांडवीचे सरपंच सुमनबाई पेंदोर व माजी सरपंच कमलबाई पेंदोर यांच्या शिष्टमंडळाने आज आ.भीमराव केराम यांची भेट घेऊन सर्व वृत्तांत सांगितले त्यामुळे क्रेशर चे प्रकरण आ. केराम यांच्या कोर्टात आले. आदिवासी हा जल, जंगल,जमीन चा मालक असून त्याच्या किंवा त्याच्या मालमत्तेवर कुणी जबरदस्ती अन्याय करीत असेल तर ते होऊ देणार नाही अशी स्पष्ट भूमिका आ.भीमरावजी केराम यांनी मांडली व या बाबत उप विभागीय अधीकारी, तहसीलदार, वीज वितरणसह संबंधित अधिकाऱ्यांशी बोलूत असे आश्वासन दिले.

शिष्टमंडळात सरपंच सुमनबाई पेंदोर, माजी सरपंच कमल बाई पेंदोर, ग्रा.प. सदस्य रेणुका राजू कुडमिते, कौसल्याबाई रमेश मेश्राम, विमलबाई तुकाराम मेश्राम, विनोद मेश्राम, संजय मडावी, प्रतीक मेश्राम, कोसबा मेश्राम इत्यादी आदिवासी बांधव उपस्थित होते.

स्टोन क्रेशरच्या रोज उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी होतील पिके नष्ट होतील. वायू व ध्वनी प्रदूषण वाढून पर्यावरणाचा व शेतकऱ्यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होईल. ब्लास्टिंग मुळे लिंगी तांड्यातील घरांना तडे जाणार त्यामुळे हा प्लांट अन्यत्र हलवावे एवढीच आमची मागणी आहे अन्यथा जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कार्यालयापुढे कुटुंबासह आमरण उपोषण करण्यात येईल असा निर्णय मांडवीच्या आदिवासी बांधवांनी घेतला.

# घरकुल लाभार्थ्यांना पहिला आर्थिक हप्ता द्या; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ एप्रिल -**

मुदखेड शहरातील घरकुल योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना अद्याप पहिला आर्थिक हप्ता मिळालेला नसल्यामुळे अनेक कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरातील सर्व पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पहिला आर्थिक हप्ता मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष मोहम्मद बुरहान अब्दुल मजीद यांनी नगर परिषदचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांची भेट घेत निवेदन सादर केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुदखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या घरकुल योजनेतून अनेक गरजू कुटुंबांना घर बांधण्यासाठी मंजुरी मिळाली असली तरी प्रत्यक्षात पहिला आर्थिक हप्ता मिळण्यात मोठा विलंब होत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी घरबांधणीसाठी केलेली तयारी रखडली असून त्यांच्यावर आर्थिक ताण वाढत आहे.

घरकुल योजना ही शासनाची अत्यंत महत्त्वाची योजना असून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घर उपलब्ध करून देण्याचा तिचा उद्देश आहे. मात्र पहिला हप्ता वेळेत न मिळाल्याने अनेक लाभार्थ्यांचे नियोजन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन मुदखेड शहरातील सर्व पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पहिला आर्थिक हप्ता मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने या मागणीची दखल न घेतल्यास संबंधित लाभार्थ्यांसोबत लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

**निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात : जगदीश दळवी**

मुदखेड नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना (PMY 2.0) अंतर्गत एकूण ३९२ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १७७ लाभार्थ्यांचे पहिले हप्त्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असून ६० लाभार्थ्यांचे दुसऱ्या हप्त्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.शासनाच्या नव्या धोरणानुसार आता हे निधी वितरण थेट PMY Housing मंत्रालय मार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधी तसेच नगरपरिषदेने लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली आहे. परिणामी, आता लाभार्थ्यांना निधी थेट त्यांच्या खात्यात मिळत असून यामुळे पारदर्शकता वाढली आहे तसेच निधी वितरण प्रक्रियेला गती मिळाली आहे. नगरपरिषद भविष्यातही लाभार्थ्यांना वेळेत व पारदर्शक पद्धतीने लाभ मिळावा यासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्याधिकारी जगदीश दळवी म्हणाले.

# भिम जयंतीनिमित्त सिडकोत रोषणाई व रस्ते दुरुस्तीची मनपा आयुक्ताकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ एप्रिल -**

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सिडको-हडको नवीन नांदेड परिसरात विद्युत रोषणाई, स्वच्छता मोहीम व रस्त्यांची तात्काळ डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव यांनी सिडकोतील समाज बांधवांच्या वतीने एका निवेदनाद्वारे मनपाचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार व मनपाचे महापौर कविताताई मुळे यांच्याकडे दिनांक १ एप्रिल रोजी करण्यात आली.




महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक सिडकोतील मुख्य रस्त्याने काढली जाते. यावेळी हजारो नागरिक अभिवादनासाठी उपस्थित राहतात. त्यामुळे जयंतीपूर्वी परिसराची सुयोग्य तयारी करण्याची मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव यांनी मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, गुरुवार बाजार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरात एलईडी फोकस लाईट, विद्युत रोषणाई, स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच लातूर फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व माता रमाई आंबेडकर चौक परिसर रंगरंगोटी करून स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

यासोबतच वस्ताद लहुजी साळवे नगर, वाघाळा हडको ते सिडको परिसरातील मुख्य रस्त्यांची तात्काळ डागडुजी करून मजबुतीकरण करावे व बंद असलेले सर्व स्ट्रीट लाईट सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सिडको-हडको परिसरातील सर्व बुद्ध विहार व स्मारक परिसरात महानगरपालिकेमार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.भिम जन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेसह स्वच्छ व प्रकाशमान वातावरण उपलब्ध करून देण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# उमरीत कैलास गोरठेकर आणि उद्योजक कवळे गुरुजी यांच्यात राडा

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ४ एप्रिल -**

जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक पदासाठी ठराव सेवा सहकारी सोसायटीचा बिन विरोद्ध ठराव घेण्यासाठी उमरीत गोरठेकर व कवळे गुरुजी गटात राडा झाला असून उमरीच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे .

उमरी नगरपरिषद व खरेदी विक्री संघ निवडनुकीत गोरठेकर यांच्ये बहुमताने विजयाचे वर्चस्व मिळाले आहे. आमदार .कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांच्या काळात बिनविरोद्ध ठरावानुसार निवडणूक होत होत्या त्याच धर्तीवर कांही काळ आ . कै बापुसाहेब देशमुख गोरठेकर काळात झाल्या पण युती असतांना नांदेड जिल्हात गोरठेकर विरुद्ध अशोकराव चव्हाण असे समिकरण प्रत्येक निवडणूकीत चालूच होते . परवाच्या नगर परिषद निवडवूकीत राष्ट्रवादी गोरठेकर उमरी के डी बॉस यांचा विजयाचा जयजयकार झाल्याने उदोजक कवळे गुरुजी आणि कैलास गोरठेकर यांच्या कार्यकर्ते मध्ये वाद झाल्याने दोन्ही गटात शाब्दिक चकामक धापड बुक्याचे घटना घडली होती दोन्ही गटाचे व्हिडीओ व्हॉयरस झाले होते परंतु वरिष्ट राजकीय नेत्याच्या सत्लानुसार दोन्ही पार्टीचे गटनेते त्या घटनेला पुर्णविराम दिला होता . . आता हीच निवडणूच अटीतटीची होत असून उमरी तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी सदस्यानां बनवा बनवी व पळवा पळवी करून पुन्हा गोरठेकर विरुद्ध कवळे गुरुजी राजकीय रणनिती हा चर्चेचा विषय बनला असुन कोणला वाड्यावर तर कोणाला गोवा तर कोणाला देवदर्शन नेण्याचा अटीतटीचा प्रकार सुरू झाल्याने ठराव घेण्यावरून वाद निर्माण झाला आहे हिरडगाव - उमरी खरेदी विक्री संघातील एका मतदारांसाठी गोरठेकर विरुद्ध राजकीय संघर्ष पेटला असून तु तु मै मै असा राडा झाला आहे अशी चर्चा तालुक्यात जोरदार सुरु आहे.

# भव्य हिंदू संमेलनाचे आज आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

सकल हिंदू समाज विसावानगर, बी.के. हॉल परिसर, पाटनूरकरनगर, कैलासनगर, सहयोगनगर, अशोकनगर, उदयनगर, भाग्यनगर यांच्या वतीने रविवार, दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ७.३० या वेळेत प्रतिभा निकेतन हायस्कूल मैदान, कैलासनगर नांदेड येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख वक्ते सुभाष जोशी-बीड (प्रांत सहसचिव सेवाभारती) यांचे सखोल मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वे.शा.सं. विश्वासशास्त्री घोडजकर, संचालक श्री दुर्गा वेद पाठशाळा नांदेड यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन संयोजक सकल हिंदू समाज यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील ओपन जिमचे साहित्य दुरुस्त; दिलीप ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या ओपन जिममधील नादुरुस्त साहित्य अखेर दुरुस्त करण्यात आले असून, धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे. याबद्दल अमरनाथ यात्री संघातर्फे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांचे आभार मानण्यात आले, तर जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचा सत्कार करण्यात आला.*

दरवर्षीप्रमाणे यंदाही अमरनाथ यात्रेकरूंच्या चालण्याचा व प्राणायामाचा सराव संघाचे अध्यक्ष दिलीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीराम सेतू, गोवर्धन घाट येथे घेतला जात आहे. येत्या ३ जुलै रोजी होणाऱ्या २७ व्या अमरनाथ यात्रेसाठी जाणारे यात्रेकरू मागील एक महिन्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सराव करत आहेत. मात्र, येथे ओपन जिमचे साहित्य नादुरुस्त असल्याने नियमित व्यायाम करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत होती.ही बाब लक्षात येताच दिलीप ठाकूर यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना लेखी निवेदन देऊन तसेच निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांची चार वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन तातडीने कारवाईची मागणी केली.

जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी आवश्यक ती कार्यवाही केली. ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर हनुमान जयंतीच्या दिवशी ओपन जिममधील सर्व नादुरुस्त साहित्य दुरुस्त करण्यात आले.यामध्ये एअर वॉकर, सायकलिंग मशीन, ट्विस्टर, पुल-अप बार, लेग प्रेस, सीट-अप बेंच, सिंगल-डबल बार, बेंच प्रेस आदी साहित्यांचा समावेश आहे. या कार्याबद्दल जयकुमार टेंभरे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मदनेश्वरी व सुभाष देवकते, साईप्रसाद व गौरी, राम भुतडा, मंगला व नामदेव पांचाळ, मिरा येवले, रामदास मुदिराज, मेधा पिंपरखेडे, रजनी फुलारी, निता उपलंचवार, अनिता माळोदे, श्वेता वट्टमवार, बालाजी शिंदे, प्रकाश नागेश्वर, ज्ञानू गुरव, प्रकाश जालणेकर, सुभाष कोटा, मनोज यांनी सत्कार केला.

कार्यक्रमात योग शिक्षिका उर्मिला साजणे व जगन्नाथ अमिलकंठवार यांनी पावसाळ्यात योगाभ्यासासाठी शेड उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.सत्काराला उत्तर देताना जयकुमार टेंभरे यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मैदानात दररोज व्यायाम करणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता लवकरच आणखी एक ओपन जिम संच बसविण्यात येईल. तसेच नागरिकांनी आपल्या पाल्यांना क्रीडा क्षेत्राकडे वळवावे, जेणेकरून नोकरीतील क्रीडा राखीव जागांचा लाभ घेता येईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर अंकरला यांनी केले, तर आभार अर्जुन हुरणे यांनी मानले. यावेळी प्रणाली जिल्हेवार, अनिता गोडबोले, संजय बुजुर्गे, संतोष कॅंद्रकुंटे, विजय केला यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ओपन जिमचे साहित्य दुरुस्त करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल दिलीप ठाकूर यांचे सत्यभामा व रामकृष्ण चक्रावार, अरुण रेणके, सुरेखा शर्मा, राजश्री शर्मा, राजश्री हुरणे, गायत्री मेहता, शोभा व नारायणसिंह चौहान, राम पाठक, वंदना चव्हाण, मिना व विश्वनाथ झुंझारे, शर्मिला व प्रशांत होट्टे, छाया व अशोक दलपे, प्रशांत जोशी, पिंटू बियाणी यांच्यासह नियमित वॉकिंगसाठी येणाऱ्या नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दापत्याला मारहाण करून ४५,५०० रुपयांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ एप्रिल -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत गडदेवधरी पाटीजवळील पेट्रोल पंप परिसरात चार अज्ञात इसमांनी मोटरसायकलस्वार दाम्पत्यावर हल्ला करून रोख रक्कम व दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी फिर्यादी लक्ष्मण अशोक करवंदे (वय ३१, रा. अंकुशनगर, गुरुकृपा कॉलनी, बीड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते व त्यांची पत्नी मोटरसायकलवरून जात असताना चार अनोळखी इसम मोटरसायकलवरून आले.



त्यांनी फिर्यादीच्या मोटरसायकलला लाथ मारून खाली पाडले व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यानंतर आरोपींनी जबरदस्तीने रोख रक्कम ३,५०० रुपये, ओपो कंपनीचा मोबाईल व सुमारे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ४५,५०० रुपयांचा ऐवज हिसकावून नेला.

या घटनेप्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### लोहारा खुर्द येथे विविध मान्यवरांचा सत्कार

**लोहारा, दि.४ एप्रिल -**

लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द येथे गयाबाई रावसाहेब पाटील सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विविध मान्यवरांचा वाढदिवस व विशेष कामगिरीबद्दल सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात अशोक दुबे, यशवंत भुसारे तसेच विष्णू लोखंडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. याचबरोबर पोलीस अंमलदार संजय जट्टे यांचा उत्कृष्ट सेवेसाठी विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आफ प्रवीण स्वामी यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते तसेच संस्थेचे अध्यक्ष शेखर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सचिव शोभा शेखर पाटील, उपसरपंच सचिन बाळू रसाळ, पोलीस पाटील बिरुदेव सूर्यवंशी, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेखर पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन रसाळ यांनी मानले.



### आंदोरा येथे मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंब, दि.४ एप्रिल -**

तालुक्यातील आंदोरा येथे तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ (नवी मुंबई) यांच्या वतीने आयोजित मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात आंदोरा तसेच परिसरातील गावांमधील नागरिकांनी सहभाग घेत तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून घेतली. दिवसभरात एकूण सुमारे ४०० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी नेरूळ येथील तेरणा हॉस्पिटलमध्ये नेऊन विनामूल्य उपचार करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या उपक्रमामुळे गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत तपासणी व औषधोपचार मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत तेरणा हॉस्पिटल, डॉ. पद्मसिंह पाटील तसेच मान्यवरांचे आभार मानले.

### अभिजीत चव्हाण यांची युवक काँग्रेसच्या प्रदेश महासचिवपदी नियुक्ती

**नळदुर्ग, दि.४ एप्रिल -**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या नव्या कार्यकारणीत अभिजीत बाबुराव चव्हाण यांची प्रदेश महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी १३० सदस्यीय कार्यकारणी जाहीर केली. तळागाळातून कार्य करत स्वतःची ओळख निर्माण केलेल्या चव्हाण यांच्या निवडीचे कार्यकर्त्यांकडून स्वागत होत असून त्यांच्या नेतृत्वामुळे संघटनेत नवचैतन्य येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भारतीय युवक काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मान्यतेने ही नियुक्ती झाली आहे. यापूर्वी २०२२ मध्येही चव्हाण यांनी महासचिव निवडणुकीत महाराष्ट्रातून सर्वाधिक मताधिक्याने विजय मिळवला होता.



### मोहेकर महाविद्यालयाचे गांधी विचार परीक्षेत यश

**कळंब, दि.४ एप्रिल -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या वतीने आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा (२०२५-२६) मध्ये महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत महाविद्यालयातील ८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्कृष्ट गुण मिळवले. यामध्ये भराटे पांडुरंग बापूराव (तृतीय वर्ष) यांनी धाराशिव जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला, तर गोरे राधा युवराज (बारावी) यांनी तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढवला. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. अशोक मोहेकर, प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, संचालक डॉ. संजय कांबळे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. परीक्षा समन्वयक म्हणून डॉ.के.डब्ल्यू. पावडे व डॉ. वर्षा सरवदे यांनी काम पाहिले.

### आलूर येथे गावठी दारू जप्त

**मुरूम, दि.४ एप्रिल -**

आलूर (ता. उमरगा) येथे पोलिसांनी कारवाई करत ३,९०० रुपयांच्या ३९ लिटर गावठी दारूसह एका इसमास ताब्यात घेतले. आरोपी रमेश रामचंद्र राठोड (वय ४२, रा. आलूर) हा अवैध विक्रीच्या उद्देशाने दारू जवळ बाळगत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# येडेश्वरी यात्रेत दागिण्यांवर चोरट्याचा डल्ला; १.३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ एप्रिल -**

येथील येडेश्वरी यात्रेत गर्दीचा फायदा घेत चोरी करण्याच्या तयारीत असलेल्या दोन महिला व एका इसमाला दि.३ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्या अंगझडतीत १ लाख ३१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले.

पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार (स्थागुशा, धाराशिव) यांच्या आदेशान्वये पथक यात्रेतील गर्दीच्या ठिकाणी पायी पेट्रोलिंग करत होते.

त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत आमराई परिसरातील मंदिराजवळ संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोन महिला व एका पुरुषाबाबत माहिती मिळाली. पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन त्यांच्यावर पाळत ठेवली असता ते गर्दीत चोरीचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले.

त्यानुसार तिघांना ताब्यात घेऊन पोलीस ठाणे येरमाळा येथे चौकशी करण्यात आली. चौकशीत त्यांनी आपली नावे अनिल शेषेराव शिंदे (वय ३४), सुनिता अनिल शिंदे (वय २९), हिराबाई रमेश शिंदे (वय ४०), सर्व रा. इंदिरानगर, पाथरी ता. पाथरी जि. परभणी अशी सांगितली.

पंचासमक्ष अंगझडती घेतली असता अनिल शिंदे याच्या खिशात चार वेगवेगळी सोन्याची मनी मंगळसूत्र आढळून आली.



### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

चौकशीत आरोपींनी कबुली दिली की, येरमाळा-बीड महामार्गावरील पुलाजवळ यात्रेकरूंसाठी केलेल्या अंघोळीच्या ठिकाणी गर्दीत महिलांच्या गळ्यातील दागिने चोरी करून ते अनिल शिंदे याच्याकडे देत होते.

या कारवाईत एकूण चार मंगळसूत्रे, अंदाजे १,३१,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, महिला पोह. शोभा बांगर, चापोह. महेबूब अरब व रोहित दंडनाईक यांच्या पथकाने पार पाडली.

## भुम येथे कौटुंबिक वादातून मारहाण; महिलांसह १० जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.४ एप्रिल -**

भिमनगर (ता. भुम) येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी महिलांसह दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत फिर्यादी चंद्रकांत लिंबाजी शिंदे (वय ५५, रा. भिमनगर, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता आरोपींनी शिवीगाळ का केली या कारणावरून गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ केली.

त्यानंतर आरोपींनी फिर्यादी, त्यांची पत्नी, सून व मुलगा यांना लाथाबुक्यांनी तसेच दगड व फरशीने मारहाण करून जखमी केले.

तसेच जीवे ठार मारण्याची धमकीही दिली.

या प्रकरणी आरोपी चंद्रकला शिंदे, प्रांजली शिंदे, यशांजली शिंदे, रविना शिंदे, ऋतुराज शिंदे, यश शिंदे, कैलास शिंदे व इतर पाच इसमांविरुद्ध भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मुरुम येथे खंडणीसाठी मारहाण; सोन्याची साखळी हिसकावून नेली

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.४ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील मुरुम येथे शेतजमिनीच्या वादातून खंडणी मागत मारहाण करून सोन्याची साखळी लुटल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजय शामसुंदर मिणीयार (वय ६१, रा. बसवेश्वर चौक, मुरुम) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता शेत गट क्र. १४८/५ येथे आरोपी महेश विरेश गव्हाणे व भुवनेश्वर विरेश गव्हाणे (दोघे रा. मुरुम) यांनी बांधावर लोखंडी खांब रोवून ५० हजार रुपयांची खंडणी मागितली.

फिर्यादीने खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची साखळी जबरदस्तीने तोडून नेली. यावेळी तक्रार केल्यास तुझ्या मुलाला ठार मारू अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.

## लोहारा येथे भाजपाचे द्विदिवसीय प्रशिक्षण शिबिर

**संघटना बळकट करण्याचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे आवाहन**



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ एप्रिल -**

भाजपाची विचारधारा गावागावात, वाडी-वस्त्यांपर्यंत पोहोचवावी. कार्यकर्त्यांनी पदासाठी नव्हे, तर एकनिष्ठ शिलेदार म्हणून प्रामाणिकपणे काम करावे. संघटना एकसंध राहिली तरच तिचा विस्तार यशस्वी होतो, असे प्रतिपादन धाराशिव भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान अंतर्गत लोहारा मंडळाच्या वतीने शहरातील कन्या प्राथमिक शाळेत दि.२ व ३ मार्च रोजी द्विदिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या वर्गाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या शिबिरात प्रमुख वक्ते म्हणूनॲड. अनिल काळे यांनी कार्यपद्धती व कार्यविस्तार, तर रामदास कोळगे यांनी बूथ व्यवस्थापन व 'मन की बात' या विषयांवर मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय शिबिरास भाजपा नेते अनिल काळे, जिल्हा प्रभारी दत्ताभाऊ राजमाने, जिल्हा प्रशिक्षण प्रमुख साहेबराव घुगे, उमरगा-लोहारा विधानसभा अध्यक्ष राहुल पाटील, तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी, नगरसेवक, सरपंच व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयेश सूर्यवंशी यांनी केले.

## कदमवाडी शाळेतील चिमुकल्यांचा उपक्रम; पक्ष्यांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी (मा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एक प्रेरणादायी उपक्रम राबवत पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला आहे. इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या कडक तापमानामुळे त्रस्त झालेल्या पक्ष्यांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करून संवेदनशीलतेचे दर्शन घडवले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मातीची मडकी, प्लास्टिकच्या बाटल्या, ग्लास तसेच इतर उपलब्ध साहित्याचा वापर करून पक्ष्यांसाठी पाणी व



धान्य ठेवण्याची सोय तयार केली. या वस्तूंमध्ये पाणी व विविध धान्य भरून त्या शाळेच्या आवारातील झाडांवर लटकवण्यात आल्या.

त्यामुळे परिसरात विविध पक्ष्यांची वर्दळ वाढली असून ते पाणी पिताना व चारा खाताना दिसत आहेत, यामुळे शाळा परिसर अधिक जिवंत आणि आनंददायी झाला आहे.

या अनोख्या उपक्रमाचे गावातील पालक तसेच शिक्षकवर्गातून विशेष कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकांनीही मोलाची भूमिका बजावली.

### हिराबाई पाटील यांचे निधन

**नळदुर्ग, दि.४ एप्रिल -**

नळदुर्ग येथील सेवानिवृत्त आदर्श शिक्षिका हिराबाई हुडाजी पाटील यांचे



हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. १९७० पासून शिक्षकी सेवेत कार्यरत असलेल्या पाटील यांनी नळदुर्गच्या शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.

दि.१ एप्रिल रोजी त्यांचे निधन झाले असून त्यांच्यावर आलियाबाद स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नळदुर्ग येथे शालेय स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांची धमाल



**विविध सांस्कृतिक सादरीकरणांना दाद...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ एप्रिल -**

दमयंती महिला शिक्षक संस्था संचालित अंजनी प्रशाला, बालविकास विद्यामंदिर व जिजामाता बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी पोवाडा, एकांकिका, पाळणा गीत तसेच विविध गाण्यांवर नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी विस्तार अधिकारी बाळासाहेब महाबोले यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांना कला, संवादकौशल्य व नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी गीतांसह लोकगीत, भारूड, गवळण, देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने पालक व नागरिक भारावून गेले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## येरमाळा येथे पशुप्रदर्शन उत्साहात; ७९ पशुधनाचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ एप्रिल -**

येरमाळा येथील येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सवाचा तिसरा दिवस शनिवारी उत्साहात पार पडला. दि. ४ रोजी दुपारी १२ वाजता अंबराई परिसरात पशुसंवर्धन विभाग व ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात येरमाळा व परिसरातील एकूण ७९ पशुधनाचा सहभाग नोंदवण्यात आला.

मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या चैत्र पौर्णिमा महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच पशुप्रदर्शनानेही आकर्षण ठरवले. या प्रदर्शनाचे उद्घाटन धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी जि.प. उपाध्यक्षा उषाताई रविंद्र गायकवाड, कृषी व पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे, समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, कळंब पंचायत समिती सभापती राजश्री वरपे, उपसभापती प्रणिता वरपे, जि.प. सदस्या अनुजा कोकाटे, पं.स. सदस्या वृषाली पाटील, अलका खुणे, माजी सभापती विकास बारकुल, ग्रामपंचायत प्रशासक प्रिया बारकुल, प्रशासकीय सदस्य गणेश बारकुल, गटविकास अधिकारी सोपान अकेले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या पशुप्रदर्शनात संकरीत गायी व वासरांचा मेळावा भरविण्यात आला होता. यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून सुमारे दीड लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सहभागी पशुधनाचे सहा गटांत वर्गीकरण करून स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ५००० रुपये, द्वितीय ४००० रुपये, तृतीय ३००० रुपये तर सहभागासाठी प्रत्येक पशुपालकास ७९६ रुपये प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेच्या निवड समितीत डॉ. हनुमंत पराडे, डॉ. आशिष टेकाळे, डॉ. ज्ञानेश्वर बाबर व डॉ. संतोष तांबडे यांनी पंच म्हणून काम पाहिले.

**स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे...**

**एचएफ संकरीत दुधाळ गाय गट :** प्रथम- विजय बाबासाहेब देशमुख, द्वितीय- रेशमा कल्याण बांगर, तृतीय- नितीन अंकुश लाटे.
**एचएफ संकरीत गाभण गाय गट :** प्रथम- राजकुमार महादेव मोरे, द्वितीय- विकास जोतिबा माळी, तृतीय- प्रशांत बाबासाहेब बारकुल.
**जर्सी संकरीत दुधाळ गट :** प्रथम - संतोष लाटे, द्वितीय- अमित भांगे, तृतीय- अक्षय लाटे.
**जर्सी संकरीत गाभण गाय गट :** प्रथम- महादेव उमाप, द्वितीय- सचिन लाटे, तृतीय- संतोष लाटे.
**एक वर्षाखालील संकरीत गट :** प्रथम- राजकुमार मोरे, द्वितीय- विकास माळी, तृतीय- रेशमा बांगर.
**देशी गाय हौसी गट :** प्रथम- रविराज लाटे, द्वितीय- धिरज सोनवणे, तृतीय- वर्षा लाटे.

**जाहीरनामा**
**उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, उमरगा यांच्या न्यायालयात**

**मयत प्रतिवादीच्या कायदेशीर वारसास समन्स (नियम क्र. २२. नियम ४) (नमुना क्रमांक ६. परीशिष्ट ब. अनुसूची १.)**

**नियमित दिवाणी दावा क्र. २०१ / २०१८**
**पांडुरंग वि. अशोक व इतर**
**निशाणी क ८४**

**प्रति,**
**मयत प्रतिवादी क. १ अशोक ज्ञानोबा लवटे यांचे वारसदार,**
**१. संध्याराणी अशोक लवटे,रा. काशेगाव, औटी वस्ती, पंढरपुर, ता. पंढरपुर, जि. सोलापूर.**

याद्वारे आपणास कळविण्यात येत की, या न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क २०१/२०१८, पाडुरंग वि अशोक व इतर मध्ये वादीने आपणास सदर प्रकरणात प्रतिवादी क. १ चे वारस म्हणून समाविष्ट करण्याचा अर्ज दिलेला आहे त्या अर्जावर मे न्यायालयाने आपले म्हणणे मागितले आहे. तरी आपण (दिनांक २२ जून सन २०२६ रोजी मध्यान्हपुर्व १०.३० वाजता आपण स्वत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा तुमचे गैरहजेरीत सदरील प्रकरणात पुढील योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतील

**आज दिनांक ०४ ऑगस्ट सन २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या मोहरनिशी दिली.**

**स्वाक्षरित/-**
**(एस.एन. यमगर)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(अ.ज. सय्यद)**
**सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व स्तर, उमरगा**